म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. नं. ३५६९

चालविण्याकरितां

मंजूर केलेला

# महाराष्ट्राचा गोष्टीरूप इतिहास.

( मराठी चौथ्या इयत्तेकरितां )

गणपत बाळाजी बोरवणकर.

सोल एजंट

रावजी श्रीधर गोंधळेकर, बुकडेपो,

बुधवार पेठ, पुणें सिटी.

REFBK-0002552

क्र. 2442

REFBK-0002552

# THE HISTORY OF MAHARASHTRA

IN THE FORM OF STORIES.

( For the use of Marathi Standard IV. )

# महाराष्ट्राचा गोष्टीरूप इतिहास.

( मराठी चौथ्या इयत्तेकरितां. )

हें पुस्तक,

गणपत बाळाजी बोरवणकर,

असिस्टंट डे. ए. इन्स्पेक्टर, जिल्हा पुणें,

ह्यांनीं तयार केलें.

प्रकाशक,

रघुनाथ कृष्ण पिंपळेखरे,

नं. १००५ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

मुद्रक,

केशव रावजी गोंधळेकर,

'जगद्धितेच्छु प्रेस,' ५०७ शनवार पेठ, पुणें.

सतरावी आवृत्ति—प्रती १००००.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क कर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.

सन १९२४ इसवी.

किंमत ४ आणे.

# प्रस्तावना.

इतिहासाच्या उपयुक्ततेबद्दल विशेष सांगण्याची जरूरी नाहीं. इतिहासाच्या वाचनानें व मननानें मनाच्या निरनिराळ्या शक्ति प्रगल्भ दशेस येतात व आपले विचार उदात्त होतात. तसेंच पुष्कळ सद्गुणी माणसांचीं चरित्रें आपल्या अवलोकनांत आल्यामुळें, व पुष्कळ दुर्गुणी माणसांचा नाश कोणत्या कारणानें कसकसा होत गेला, हें समजल्यामुळें आपणांस उत्तम वळण लागतें, असे अनेक फायदे इतिहासापासून होतात; असें आहे तथापि शाळेंत जाणाऱ्या बहुतेक विद्यार्थ्यांचें लक्ष इतिहास शिकण्याकडे नीट लागत नाहीं. ह्याचें कारण, अगदीं आरंभीं हा विषय मुलांस ज्या पद्धतीनें शिकविला पाहिजे त्या पद्धतीनें तो शिकविला जात नाहीं, हें होय. मुलांचें लक्ष इतिहासाकडे लावण्यासाठीं आरंभीं त्यांना ऐतिहासिक सोप्या व मनोरंजक गोष्टी सांगितल्या पाहिजेत. मुलांना लहानपणीं गोष्टी फार आवडतात. ह्या त्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा उपयोग आपण करून घेतला पाहिजे.

नवीन अभ्यासपत्रकामध्यें व मे. कान्हन्टन्‌साहेबांच्या सूचनापत्रकांत याच तत्त्वाचा (चौथ्या इयत्तेंत सोप्या व मनोरंजक गोष्टींच्या द्वारें इतिहास शिकवावा याचा) उल्लेख केला आहे. परंतु तशा प्रकारचें पुस्तक नसल्यामुळें त्या तत्त्वाची अंमल-बजावणी व्हावी तशी झाली नाहीं. ही गोष्ट ध्यानांत आणून मीं हा प्रयत्न केला आहे.

ह्या पुस्तकांत महाराष्ट्राच्या इतिहासांतील ४० मनोरंजक गोष्टी लिहिल्या आहेत. गोष्टींची मनोरंजकता कमी न होऊं देतां शक्य तितकी संगति त्यांमध्यें राखिली आहे.

हें पुस्तक चौथ्या इयत्तेंतील मुलांसाठीं लिहिलें आहे आहे. प्रथम शिक्षकानें मनोरंजक रीतीनें समग्र गोष्ट सांगितल्यावर ती वाचून ध्यानांत ठेवण्यासाठीं मुलांनीं ह्या पुस्तकाचा उपयोग करावा असा उद्देश आहे. शिक्षकानें आपली सर्व भिस्त केवळ या पुस्तकावरच ठेवूं नये, तर महाराष्ट्राच्या इतिहासासंबंधीं इतर

पुस्तकें वाचून प्रत्येक गोष्टीची समग्र कार्यकारणरूप माहिती मिळवावी व नंतर उल्हासानें व प्रसंगास उचित असे हावभाव करून ती गोष्ट सावकाशपणें मध्यें न थांबतां किंवा सांगितलेल्या भागांतले प्रश्न मध्येंच न विचारतां सांगावी. समग्र गोष्ट सांगून झाल्यावर मग त्या गोष्टीसंबंधानें मुलांस प्रश्न करावे व शेवटीं ती त्यांजकडून सांगून घ्यावी. पण अशा रीतीनें कोणतीही गोष्ट प्रथम समजून सांगितल्याशिवाय ती तयार करून येण्यास मुलांना कधींही सांगूं नये.

हें पुस्तक लिहितांना कॅप्टन् ग्रँटडफसाहेब, रा. सा. साने, रा. रा. सरदेसाई इत्यादि गृहस्थांच्या कृतींचा मला फार उपयोग झाला म्हणून मी त्यांचा फार ऋणी आहे.

ता. २० आगष्ट सन १९०९. ग. बा. बोरवणकर.

---

## आवृत्ति सतरावी.

मागील आवृत्तींत शुद्धलेखन वगैरेच्या ज्या चुका राहिल्या होत्या त्यांची दुरुस्ती करून ही आवृत्ति जशीच्या तशीच काढिली आहे.

ता. १७ मार्च १९२४. ग. बा. बोरवणकर.

---

# गोष्टींची अनुक्रमणिका.


| गोष्टीचें नांव. | पृष्ठांक. |
|---|---|
| दंडकारण्याचा महाराष्ट्रदेश बनला ... ... | १ |
| देवगिरीवर हल्ला ... | ३ |
| रंकाचा राव बनला ... | ५ |
| शूर चांदबिबी ... ... | ८ |
| विनोदाचे बोल खरे झाले | १० |
| बालशिवाजी ... ... | १२ |
| तुकाराममहाराज ... | १५ |
| रामदास व दासबोध ... | १८ |
| आरंभींची धामधूम ... | २१ |
| शहाजीस कैद केलें ... | २३ |
| अफझुलखानाचा वध ... | २५ |
| सरदार बाजीराव देशपांडे | २८ |
| प्राणावर आलें होतें पण बोटावरच निभावलें ! | ३० |
| मुरारबाजी देशपांडे ... | ३२ |
| जशास तसें ... ... | ३५ |
| गड आला पण सिंह गेला | ३७ |
| राज्याभिषेक व राज्यव्यवस्था | ४० |
| औरंगजेबाची दक्षिणेंत स्वारी | ४२ |
| स्वामिनिष्ठ खंडो बल्लाळ चिटणीस ... ... | ४५ |
| आपसांत फूट झाली !... | ४७ |
| कुळकर्ण्याचा पेशवा झाला | ५० |
| बाजीराव व निजाम ह्यांची भेट | ५२ |
| उजव्या व डाव्या हातांमधील लढा ... | ५४ |

| गोष्टीचें नांव. | पृष्ठांक. |
|---|---|
| बाजीरावाचे सरदार ... | ५६ |
| दिल्लीचा बादशाह चकित झाला ! ... ... | ५९ |
| चिमाजी अप्पाचा पक्का निर्धार ... ... | ६१ |
| राज्याच्या मुखत्यारीची सनद | ६३ |
| महादाजीपंताचा थोरपणा | ६६ |
| लेखणी व तरवार ह्यांची अदलाबदल ... | ६८ |
| पानपतची भयंकर लढाई | ७० |
| माधवराव बल्लाळ ... | ७२ |
| नारायणराव पेशव्याचा खून | ७४ |
| रामशास्त्री प्रभुणे ... | ७६ |
| बारभाईंचें कारस्थान ... | ७९ |
| नाना फडणवीस ... | ८१ |
| महादजी शिंदे... ... | ८४ |
| खर्ड्याची लढाई ... | ८६ |
| वसईचा तह ... ... | ८८ |
| पेशवाईचा शेवट ... | ९१ |
| ब्रिटिश-अंमल... ... | ९३ |



### चित्रें.


| | |
|---|---|
| शिवाजी ... ... | १४ |
| औरंगजेब ... ... | ४२ |
| एल्फिन्स्टन साहेब ... | ९५ |


### नकाशे.


१ महाराष्ट्र देशाचा.

२ हिंदुस्तान देशाचा.





राष्ट्रदेश
तें एक
मसत.
इत्यादि
राहात
ारराचा
ानांतील
ांचें अन्न
ऽमठा हें
गारेचा

र उत्तर
ी काढीत
असून
ठ व दंड-
दे नांवें
ळगणें हे
शिजवून
एकंदरीत

ांतील क्रूर

गोष्टीचें नांव

हिंदुस्तानचा नकाशा




दंडकारण्याचा
बनला
देवगिरीवर ह
ंकाचा राव
शूर चांदबिबी
विनोदाचे बो
बालशिवाजी
तुकाराममहार
रामदास व द
आरंभींची घा
शहाजीस कैद
अफझुलखाना
सरदार बाजी
प्राणावर आले
बोटावरच
मुरारबाजी दे
जशास तसें
गड आला प
राज्याभिषेक
औरंगजेबाची
स्वामिनिष्ठ
णीस
आपसांत फूट
कुळकर्ण्यांचा
बाजीराव व नि
उजव्या व डा
मधील ल

# महाराष्ट्राचा गोष्टीरूप इतिहास.

ता. क्र. २५५२

## १. दंडकारण्याचा महाराष्ट्रदेश बनला.

मुलांनो, हल्लीं आपण ज्या भागांत राहातों तो महाराष्ट्रदेश फार पूर्वीं हल्लींप्रमाणें माणसांनीं गजबजलेला नव्हता. तें एक दाट अरण्य असून त्याला दंडकारण्य असें म्हणत असत.

दंडकारण्यांतील दाट झाडींत लांडगे, वाघ, साप इत्यादि प्राणी आणि ह्या प्राण्यांइतकेच क्रूर असे रानटी लोक राहात असत. हे लोक दांडगट व धिप्पाड असून त्यांच्या शरिराचा रंग काळा असे. हे लोक शेती मुळींच करीत नसत. रानांतील फळें व हरिण, ससे, डुकरें इत्यादि प्राण्यांचें मांस हें त्यांचें अन्न व त्या प्राण्यांचीं कातडीं हें त्यांचें पांघरूण असे. तीरकमठा हें त्यांचें हत्यार असून तिराच्या शेवटीं लोखंडाऐवजीं गारेचा अणकुचीदार फाळ बसविलेला असे.

इ० स० पूर्वीं निदान चारपांचशें वर्षांच्या अगोदर उत्तर हिंदुस्तानांतून कांहीं लोक विंध्याद्रीच्या खिंडींतून मार्ग काढीत काढीत दंडकारण्यापर्यंत आले. हे दिसण्यांत सुंदर असून रंगानें गोरे होते. ते आपणांस आर्य (श्रेष्ठ) म्हणत, व दंडकारण्यांतील मूळच्या लोकास अनार्य, राक्षस इत्यादि नांवें देत. आर्यलोक सुधारलेले होते. शेती करणें व गुरें बाळगणें हे त्यांचे मुख्य धंदे असत. ते धान्य, भाजीपाला व मांस शिजवून खात; व कापूस, लोंकर, व रेशीम यांचीं वस्त्रें पांघरीत. एकंदरींत ते हुशार व पराक्रमी होते.

आर्यलोक दंडकारण्यांत आल्यानंतर ते हळूहळू त्यांतील क्रूर

पशूंना व अनार्यांना ठार मारूं लागले. त्यांचीं हत्यारें अनार्यांच्या हत्यारांपेक्षां चांगलीं असल्यामुळें त्यांच्यापुढें अनार्यांचा टिकाव लागेना. त्यामुळें बरेच अनार्य लोक लढाईत पडले, कांहीं भिऊन डोंगरांत लपून राहिले व बाकीचे आर्यांस शरण येऊन त्यांचे चाकर बनले.

नंतर आर्यलोकांनीं तेथील झाडी तोडून जमीन साफ केली व तींत लागवड करण्यास सुरुवात केली. तेथें त्यांनीं गांवें व शहरें बसवून व्यापारउदीम चालविला. अशा प्रकारें कांहीं काळानंतर दंडकारण्याचें पूर्वीचें भयाण रूप जाऊन तो एक सुंदर देश बनला!

आर्यलोकांच्या ज्या टोळीनें अनार्यांस जिंकून दंडकारण्याचा देश बनविला तिचें नांव महाराष्ट्रिक किंवा महारठ्ठे असें होतें, म्हणून त्या देशास महाराष्ट्र व त्यांतील लोकांस मराठे अशीं नांवें पडलीं असावीं, असें कांहीं विद्वानांचें मत आहे.

महाराष्ट्रिक राजांनंतर ह्या देशांत इ० सनाच्या आरंभीं शालिवाहन राजे झाले. त्यांच्या कारकीर्दींत देशाची सुधारणा झाली. कार्ले व जेजुरी येथील कोरींव लेणीं ह्याच वेळीं तयार झालीं, असें म्हणतात. हल्लीं महाराष्ट्रांत शालिवाहन शक चालू आहे, तो ह्या राजांचें स्मारक होय. ह्या वेळीं व्यापारही मोठा चालत असे. भडोच, पैठण, नाशिक, कऱ्हाड व कोल्हापूर ह्या व्यापाराच्या मुख्य पेठा असून इमारतीचे दगड, कापसाचीं वस्त्रें वगैरे व्यापाराचे जिन्नस असत.

शालिवाहन राजांनंतर महाराष्ट्रांत राष्ट्रकूट, चालुक्य व यादव हीं राजघराणीं झालीं. चालुक्य घराण्याचें राज्य असतां ह्युएनशांग

१. ह्याचे उत्तरेस सातपुडा पर्वत, पश्चिमेस अरबी समुद्र, पूर्वेस वाईनगंगा नदी व दक्षिणेस गोवेंप्रांत आहे. (सोबतचा नकाशा पहा.)

नांवाचा एक चिनी प्रवासी इ. स० ६४० च्या सुमारास हिंदुस्तानांत आला होता. त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, ' महाराष्ट्राची जमीन सुपीक; हवा उष्ण; लोकांची राहणी साधी. ते शरीरानें उंच व स्वभावानें मानी व हट्टी आहेत. ते शूर, कृतज्ञ व स्वतांच्या प्राणांची पर्वा न करतां दुसऱ्यास मदत करणारे आहेत. शत्रूस सांगून पाठविल्याशिवाय ते त्याजवर केव्हांही चालून जात नाहींत. शत्रु शरण आल्यावर ते त्याजवर कधींच शस्त्र धरीत नाहींत. लढाईतून पळून झालेल्यांचा ते फारच अपमान करितात.'

---

## २. देवगिरीवर हल्ला—इ० स० १२९४.

मुलांनो, इ. स. १२९४ पर्यंत महाराष्ट्रांत हिंदुलोकांचेंच राज्य होतें. ह्या काळापर्यंत दक्षिणहिंदुस्तानांत मुसलमान लोक आलेले नव्हते. परंतु इ० स० १२९४ सालीं अल्लाउद्दीन नांवाच्या एका धाडसी पुरुषानें ८००० स्वारांनिशीं दक्षिणेंत येऊन देवगिरी नांवाचें संपन्न शहर लुटलें; तो प्रकार असा:—

तेराव्या * शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रांत देवगिरी येथें रामदेवराव यादव नांवाचा राजा राज्य करीत होता. देवगिरीस हल्लीं दौलताबाद म्हणतात. देवगिरींत अपार संपत्ति आहे, असा लौकिक सर्वत्र पसरला होता. तो ऐकून दिल्लीच्या सुलतानाचा पुतण्या अल्लाउद्दीन यानें तें शहर लुटण्याचा निश्चय केला.

हल्लींप्रमाणें त्या काळीं प्रवास सुखानें करतां येईल अशीं आगबोट, आगगाडी इत्यादि साधनें तर नव्हतींच, पण चांगल्या सडकाही नव्हत्या. अशा स्थितींत अल्लाउद्दीन फार लांबीचा व अडचणीचा प्रवास करण्यास सिद्ध झाला. याचें नांव दृढनिश्चय!

---

* १२०१ पासून १३०० पर्यंत तेरावें शतक.

देवगिरीस जात असतां वाटेंत आपणास अटकाव होऊं नये म्हणून अलाउद्दीन लोकांस असें सांगूं लागला कीं, 'मी आपल्या चुलत्याशीं भांडून राजमहेंद्रीच्या राजाकडे रोजगारास जात आहे.' ह्या बोलण्यावर विश्वास ठेवून, दुसऱ्याच्या आश्रयास जाणाऱ्या मनुष्यास अटकाव करणें ठीक नाहीं असें जाणून मार्गांत कोणीही त्याच्या आड आलें नाहीं.

अशा रीतीनें अलाउद्दीन देवगिरीस येऊन पोहोंचला. एकाएकीं आलेलें हें संकट पाहून राजा प्रथम घाबरला. कारण, त्याचा मुलगा शंकरदेव बहुतेक सैन्य घेऊन राजधानीपासून दूर कामगिरीला गेला होता. तथापि राजानें प्रसंग जाणून, शिल्लक असलेल्या लोकांनिशीं शत्रूवर चाल केली. पण तींत त्याचा पराभव होऊन तो देवगिरीच्या किल्ल्यांत शिरला. तेव्हां अलाउद्दिनानें किल्ल्यास वेढा घातला.

तथापि किल्ला मजबूत असल्यामुळें तो लवकर हातीं येण्याचें चिन्ह दिसेना. आणि शंकरदेव परत येण्यापूर्वीं तर किल्ला सर करणें अवश्य होतें. कारण, मग किल्ला घेणें विशेष कठीण होतें, तेव्हां अलाउद्दिनानें अशी कंडी उठविली कीं, 'मजबरोबरचें सैन्य हें दिल्लीच्या सुलतानाच्या सैन्याची फक्त आघाडीची तुकडी आहे. मागून फार मोठें सैन्य येत आहे'. हें ऐकून राजा घाबरला. कारण सर्व सैन्य आल्यावर आपला मुळींच निभाव लागणार नाहीं, असें त्यास वाटलें, शिवाय किल्ल्यांतील अन्न-सामुग्रीहि संपली होती, कारण किल्ल्यांत पूर्वीं सामुग्री भरतांना धान्याऐवजीं चुकून मिठाचीं पोतीं भरलीं गेलीं होतीं. तेव्हां राजानें अलाउद्दिनाशीं तहाचें बोलणें लाविलें. इतक्यांत शंकरदेव सैन्यासह देवगिरीस आला, त्यानें राजाच्या इच्छेविरुद्ध मुसलमानावर हल्ला केला. तो मोठ्या शौर्यानें लढला. त्याच्यापुढें शत्रूंचा टिकाव लागेना. ते माघार घेऊं लागले. इतक्यांत सहज

घडून आलेल्या एका गोष्टीवरून लढाईचें पारडें फिरलें. शंकरदेवाशीं लढाई सुरू करण्यापूर्वीं अलाउद्दिनानें १००० स्वार राजानें कांहीं हालचाल करूं नये म्हणून किल्ल्याचे तोंडाशीं ठेविले होते. ते ह्या ऐनवेळीं मराठ्यांवर दौडत आले. त्यांच्या दौडीमुळें आकाशांत धुळीचे लोट दिसूं लागले. ते पाहून शंकरदेवाच्या सैन्यास वाटलें कीं, दिल्लीहून येणारें बडें सैन्य तें हेंच. आतां आपला निभाव लागणें कठीण; तेव्हां तें सैन्य वाट फुटेल तिकडे पळत सुटलें.

आतां अलाउद्दिनाची समजूत करण्यासाठीं राजाला पहिल्यापेक्षां पुष्कळ द्रव्य त्यास द्यावें लागून तो म्हणेल तशा तहाच्या अटी कबूल कराव्या लागल्या.

ह्या प्रकारें रामदेवराव दिल्लीच्या सुलतानाचा मांडलिक झाला तो दरसाल दिल्लीस खंडणी पाठवीत असे. त्याच्यामागें शंकरदेवाकडून खंडणी जाण्याचें बंद झाल्यामुळें दिल्लीच्या सुलतानानें इ०स० १३१२ मध्यें आपला सरदार पाठविला. त्यानें शंकरदेवास युद्धांत ठार करून यादवांचें राज्य खालसा केलें. तेव्हांपासून महाराष्ट्राचा कारभार चालविण्यास सुलतानानें नेमिलेले सुभेदार येऊं लागले.

---

## ३. रंकाचा राव बनला.

मुलांनो, महाराष्ट्रांतील हिंदुराज्य मोडून तेथें सुभेदारांमार्फत दिल्लीच्या सुलतानाचा अंमल सुरू झाला हें तुम्हांस मागील गोष्टीवरून समजलें आहे. आतां ज्या पराक्रमी पुरुषानें महाराष्ट्रांत स्वतंत्र मुसलमानी गादी स्थापिली, त्याची हकिकत अशी:—

ह्या पराक्रमी पुरुषाचें नांव हसन. हा लहानपणा दिल्लीशहरांत गंगू (गंगाधर) नांवाच्या एका ब्राह्मणाच्या घरा गुलाम

होता. हसन यानें आपल्या धन्याची इमानेंइतबारें चाकरी केल्यामुळें त्याचा धनी त्याच्यावर खूष होऊन त्यानें त्याची गुलामगिरींतून सुटका केली, आणि त्याला दिल्लीच्या सुलतानाच्या लष्करांत नोकरी लावून दिली.

लष्करांत असतां हसन यानें हुशारीनें काम केल्यामुळें त्याची दिवसानुदिवस भरभराट होत गेली. पुढें कांहीं काळानंतर सुलतानानें हसन याची दौलताबादेच्या सुभेदाराच्या हाताखालीं नेमणूक केली. ह्या ठिकाणीं हसन वाढतां वाढतां एक मोठा सरदार बनला.

हा दिल्लीचा सुलतान स्वभावानें क्रूर, जुलमी व स्वच्छंदी होता. ह्याचें नांव महंमद तघलख. असल्या स्वभावामुळें महंमदावर त्याची प्रजा नेहमीं नाखुष असे,इतकेंच नव्हे, तर त्याचे नोकरसुद्धां त्याच्याविरुद्ध असत. ह्यामुळें राज्यांत वारंवार बंडें होत. अशा प्रकारचें एक बंड इ०स० १३४४ मध्यें गुजराथेंत झालें. ह्या बंडाचा मोड स्वतः सुलतानानें केला. तेव्हां बंडांतील कांहीं लोक पळून दौलताबादेस आले. त्यांस तेथील सुभेदारानें आश्रय दिला. त्यामुळें सुलतानास राग येऊन त्यानें त्या सुभेदारास कामावरून दूर केलें. तेव्हां महाराष्ट्रांत नवें बंड उत्पन्न झालें.या बंडास सुलतानाच्या अंमलास त्रासलेले पुष्कळ हिंदुमुसलमान मिळाले. हसनही त्यांच्यांत सामील झाला. ह्या सर्व बंडखोरांनीं दौलताबाद किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन तेथेंच आपल्यापैकीं एका सरदाराची राजा म्हणून गादीवर स्थापना केली.

ही हकिकत महंमदास समजतांच तो सैन्यासह महाराष्ट्रांत आला. त्याच्यापुढें बंडखोरांचा टिकाव न लागून त्यांची चोहोंकडे फांकाफांक झाली, आणि त्यांचा राजा कांहीं लोकां-

सह दौलताबादेच्या किल्लयांत जाऊन राहिला. तेव्हां सुलतानानें त्या किल्लयास वेढा घातला.

इतक्यांत खुद्द दिल्लीस बंड झाल्यामुळें महंमद वेढा घालण्याचें काम एका सरदाराकडे सोंपवून तिकडे निघून गेला. तेव्हां त्या सरदारावर फांकाफांक झालेल्या बंडखोरांनीं एकवट होऊन हल्ला केला व त्याला नर्मदापार हांकून लाविलें.

अशा प्रकारें ह्या बंडखोरांनीं दिल्लीच्या सुलतानाचा अंमल झुगारून दिला. ह्या कृत्यांत हसन यानें मोठा पराक्रम केला होता. तेव्हां बंडखोरांच्या राजानें एक दिवस मोठा दरबार भरवून त्यांत सर्व सरदारांच्या पुढें हसनच्या पराक्रमाचें वर्णन केलें. व महाराष्ट्राचा राजा होण्यास आपणापेक्षां हाच योग्य आहे, असें सांगितलें. ती गोष्ट सर्वांस मान्य होऊन हसन हा सर्वांच्या मतें इ०स० १३४७ सालीं महाराष्ट्राचा स्वतंत्र राजा बनला.

आपल्या जुन्या धन्याच्या कृपेमुळें आपणांस हें वैभव प्राप्त झालें ही गोष्ट हसन विसरला नाहीं. त्यानें त्या ब्राह्मणास बोलावून आणून खजिन्यावरील मुख्य अधिकारी नेमिलें,आणि आपल्या नांवापुढें कृतज्ञता बुद्धीनें 'गंगू' असें पद जोडिलें. ह्या राजाचें पूर्ण नांव 'अलाउद्दीन हसन गंगू बहामनी' असें होतें. ह्यांच्या वंशांतील राजास 'बहामनी राजे' व या राज्यास 'बहामनी राज्य' असें नांव पडलेलें आहे.

अशा प्रकारें जो हसन लहानपणीं गरीब गुलाम होता, तो पुढें आपल्या पराक्रमावर महाराष्ट्राचा राजा बनला!

---

१. इराणचा प्रख्यात बादशाह बहामनी याच्याशीं संबंध जोडण्यासाठीं हसन यानें आपल्या नांवापुढें बहामनी असें पद जोडिलें, 'ब्राम्हणी,' असें कित्येक म्हणतात, पण त्याला मुसलमानी ग्रंथांत आधार नाहीं.

देवगिरीस जात असतां वाटेंत आपणास अटकाव होऊं नये म्हणून अलाउद्दीन लोकांस असें सांगूं लागला कीं, 'मी आपल्या चुलत्याशीं भांडून राजमहेंद्रीच्या राजाकडे रोजगारास जात आहे.' ह्या बोलण्यावर विश्वास ठेवून, दुसऱ्याच्या आश्रयास जाणाऱ्या मनुष्यास अटकाव करणें ठीक नाहीं असें जाणून मार्गांत कोणीही त्याच्या आड आलें नाहीं.

अशा रीतीनें अलाउद्दीन देवगिरीस येऊन पोहोंचला. एकाएकी आलेलें हें संकट पाहून राजा प्रथम घाबरला. कारण, त्याचा मुलगा शंकरदेव बहुतेक सैन्य घेऊन राजधानीपासून दूर कामगिरीला गेला होता. तथापि राजानें प्रसंग जाणून, शिल्लक असलेल्या लोकांनिशीं शत्रूवर चाल केली. पण तींत त्याचा पराभव होऊन तो देवगिरीच्या किल्ल्यांत शिरला. तेव्हां अलाउद्दिनानें किल्ल्यास वेढा घातला.

तथापि किल्ला मजबूत असल्यामुळें तो लवकर हातीं येण्याचें चिन्ह दिसेना. आणि शंकरदेव परत येण्यापूर्वीं तर किल्ला सर करणें अवश्य होतें. कारण, मग किल्ला घेणें विशेष कठीण होतें, तेव्हां अलाउद्दिनानें अशी कंडी उठविली कीं, 'मजबरोबरचें सैन्य हें दिल्लीच्या सुलतानाच्या सैन्याची फक्त आघाडीची तुकडी आहे. मागून फार मोठें सैन्य येत आहे'. हें ऐकून राजा घाबरला. कारण सर्व सैन्य आल्यावर आपला मुळींच निभाव लागणार नाहीं, असें त्यास वाटलें, शिवाय किल्ल्यांतील अन्न-सामुग्रीहि संपली होती, कारण किल्ल्यांत पूर्वीं सामुग्री भरतांना धान्याऐवजीं चुकून मिठाचीं पोतीं भरलीं गेलीं होतीं. तेव्हां राजानें अलाउद्दिनाशीं तहाचें बोलणें लाविलें. इतक्यांत शंकरदेव सैन्यासह देवगिरीस आला, त्यानें राजाच्या इच्छेविरुद्ध मुसलमानावर हल्ला केला. तो मोठ्या शौर्यानें लढला. त्याच्यापुढें शत्रूंचा टिकाव लागेना. ते माघार घेऊं लागले. इतक्यांत सहज

घडून आलेल्या एका गोष्टीवरून लढाईचें पारडें फिरलें. शंकरदेवाशीं लढाई सुरू करण्यापूर्वीं अलाउद्दिनानें १००० स्वार राजानें कांहीं हालचाल करूं नये म्हणून किल्ल्याचे तोंडाशीं ठेविले होते. ते ह्या ऐनवेळीं मराठ्यांवर दौडत आले. त्यांच्या दौडीमुळें आकाशांत धुळीचे लोट दिसूं लागले. ते पाहून शंकरदेवाच्या सैन्यास वाटलें कीं, दिल्लीहून येणारें बडें सैन्य तें हेंच. आतां आपला निभाव लागणें कठीण; तेव्हां तें सैन्य वाट फुटेल तिकडे पळत सुटलें.

आतां अलाउद्दिनाची समजूत करण्यासाठीं राजाला पहिल्यापेक्षां पुष्कळ द्रव्य त्यास द्यावें लागून तो म्हणेल तशा तहाच्या अटी कबूल कराव्या लागल्या.

ह्या प्रकारें रामदेवराव दिल्लीच्या सुलतानाचा मांडलिक झाला तो दरसाल दिल्लीस खंडणी पाठवीत असे. त्याच्यामागें शंकरदेवाकडून खंडणी जाण्याचें बंद झाल्यामुळें दिल्लीच्या सुलतानानें इ०स० १३१२ मध्यें आपला सरदार पाठविला. त्यानें शंकरदेवास युद्धांत ठार करून यादवांचें राज्य खालसा केलें. तेव्हांपासून महाराष्ट्राचा कारभार चालविण्यास सुलतानानें नेमिलेले सुभेदार येऊं लागले.

---

## ३. रंकाचा राव बनला.

मुलांनो, महाराष्ट्रांतील हिंदुराज्य मोडून तेथें सुभेदारांमार्फत दिल्लीच्या सुलतानाचा अंमल सुरू झाला हें तुम्हांस मागील गोष्टीवरून समजलें आहे. आतां ज्या पराक्रमी पुरुषानें महाराष्ट्रांत स्वतंत्र मुसलमानी गादी स्थापिली, त्याची हकिकत अशी:—

ह्या पराक्रमी पुरुषाचें नांव हसन. हा लहानपणा दिल्लीशहरांत गंगू (गंगाधर) नांवाच्या एका ब्राह्मणाच्या घरा गुलाम

होता. हसन यानें आपल्या धन्याची इमानेंइतबारें चाकरी केल्यामुळें त्याचा धनी त्याच्यावर खूष होऊन त्यानें त्याची गुलामगिरींतून सुटका केली, आणि त्याला दिल्लीच्या सुलतानाच्या लष्करांत नोकरी लावून दिली.

लष्करांत असतां हसन यानें हुशारीनें काम केल्यामुळें त्याची दिवसानुदिवस भरभराट होत गेली. पुढें कांहीं काळानंतर सुलतानानें हसन याची दौलताबादेच्या सुभेदाराच्या हाताखालीं नेमणूक केली. ह्या ठिकाणीं हसन वाढतां वाढतां एक मोठा सरदार बनला.

हा दिल्लीचा सुलतान स्वभावानें क्रूर, जुलमी व स्वच्छंदी होता. ह्याचें नांव महंमद तघलख. असलया स्वभावामुळें महंमदावर त्याची प्रजा नेहमीं नाखुष असे,इतकेंच नव्हे, तर त्याचे नोकरसुद्धां त्याच्याविरुद्ध असत. ह्यामुळें राज्यांत वारंवार बंडें होत. अशा प्रकारचें एक बंड इ०स० १३४४ मध्यें गुजराथेंत झालें. ह्या बंडाचा मोड स्वतः सुलतानानें केला. तेव्हां बंडांतील कांहीं लोक पळून दौलताबादेस आले. त्यांस तेथील सुभेदारानें आश्रय दिला. त्यामुळें सुलतानास राग येऊन त्यानें त्या सुभेदारास कामावरून दूर केलें. तेव्हां महाराष्ट्रांत नवें बंड उत्पन्न झालें.या बंडास सुलतानाच्या अंमलास त्रासलेले पुष्कळ हिंदुमुसलमान मिळाले. हसनही त्यांच्यांत सामील झाला. ह्या सर्व बंडखोरांनीं दौलताबाद किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन तेथेंच आपल्यापैकीं एका सरदाराची राजा म्हणून गादीवर स्थापना केली.

ही हकिकत महंमदास समजतांच तो सैन्यासह महाराष्ट्रांत आला. त्याच्यापुढें बंडखोरांचा टिकाव न लागून त्यांची चोहोंकडे फांकाफांक झाली, आणि त्यांचा राजा कांहीं लोकां-

सह दौलताबादेच्या किल्लयांत जाऊन राहिला. तेव्हां सुलतानानें त्या किल्लयास वेढा घातला.

इतक्यांत खुद्द दिल्लीस बंड झाल्यामुळें महंमद वेढा घालण्याचें काम एका सरदाराकडे सोंपवून तिकडे निघून गेला. तेव्हां त्या सरदारावर फांकाफांक झालेल्या बंडखोरांनीं एकवट होऊन हल्ला केला व त्याला नर्मदापार हांकून लाविलें.

अशा प्रकारें ह्या बंडखोरांनीं दिल्लीच्या सुलतानाचा अंमल झुगारून दिला. ह्या कृत्यांत हसन यानें मोठा पराक्रम केला होता. तेव्हां बंडखोरांच्या राजानें एक दिवस मोठा दरबार भरवून त्यांत सर्व सरदारांच्या पुढें हसनच्या पराक्रमाचें वर्णन केलें. व महाराष्ट्राचा राजा होण्यास आपणापेक्षां हाच योग्य आहे, असें सांगितलें. ती गोष्ट सर्वांस मान्य होऊन हसन हा सर्वांच्या मतें इ०स० १३४७ सालीं महाराष्ट्राचा स्वतंत्र राजा बनला.

आपल्या जुन्या धन्याच्या कृपेमुळें आपणांस हें वैभव प्राप्त झालें ही गोष्ट हसन विसरला नाहीं. त्यानें त्या ब्राह्मणास बोलावून आणून खजिन्यावरील मुख्य अधिकारी नेमिलें, आणि आपल्या नांवापुढें कृतज्ञता बुद्धीनें 'गंगू' असें पद जोडिलें. ह्या राजाचें पूर्ण नांव 'अलाउद्दीन हसन गंगू बहामनी' असें होतें. ह्यांच्या वंशांतील राजास 'बहामनी राजे' व या राज्यास 'बहामनी राज्य' असें नांव पडलेलें आहे.

अशा प्रकारें जो हसन लहानपणीं गरीब गुलाम होता, तो पुढें आपल्या पराक्रमावर महाराष्ट्राचा राजा बनला!

---

१. इराणचा प्रख्यात बादशाह बहामनी याच्याशीं संबंध जोडण्यासाठीं हसन यानें आपल्या नांवापुढें बहामनी असें पद जोडिलें, 'ब्राम्हणी,' असें कित्येक म्हणतात, पण त्याला मुसलमानी ग्रंथांत आधार नाहीं.

## ४. शूर चांदबिबी.

जिनें आपल्या शौर्यानें व राज्यकारभारांतील हुशारीनें आपलें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत कायमचें करून ठेविलें आहे त्या चांदबिबी नांवाच्या मुसलमान स्त्रियेचें चरित्र पुढें लिहिल्याप्रमाणें आहेः—

ह्या थोर स्त्रियेचा जन्म अहमदनगर येथील बादशाहाच्या कुळांत झाला, व इ. स. १५६३ सालीं हिचें विजापूरच्या बादशाहाशीं लग्न झालें. लग्नानंतर १७ वर्षांनीं हिचा नवरा वारला. हिला मूलबाळ कांहीं नव्हतें.

चांदबिबी जात्या फार हुशार होती. नवऱ्याच्यामागें तिनें आपल्या अल्पवयी पुतण्यास तक्तावर बसवून स्वतः राज्यकारभार चालविला. पण दरबारच्या लोकांशीं तिचा बेबनाव झाल्यामुळें आपसांत भांडणें लागूं नयेत म्हणून कारभार सोडून ती अहमदनगरास आपल्या माहेरीं येऊन राहिली.

पुढें इ०स० १५९५ सालीं अहमदनगरचा बादशाह मरण पावला, त्यावेळीं तेथील दरबारच्या लोकांत चार तट होते, तेव्हां प्रत्येक तटांतील पुढाऱ्यानें आपल्या पक्षाचा एक एक राजपुत्र गादीला वारस म्हणून पुढें केला; व त्याला गादी मिळवून देण्याचा यत्न चालविला.

प्रथम वजिरानें आपल्या पक्षाच्या मुलास तक्तावर बसवून इतर कटांतील लोकांचा बंदोबस्त करण्यासाठीं दिल्लीचा बादशाह अकबर ह्याच्यापाशीं मदत मागितली. तो मदत देण्यास मोठ्या खुषीनें तयार झाला. कारण, दक्षिणेंतल्या राजकार-

---

१. इ०स० १५२६च्या सुमारास ब्रहामनी राज्य मोडून विजापूरचें (आदिलशाही), गोवळकोंड्याचें (कुतुबशाही), अहमदनगरचें ( निजामशाही ), बेदरचें (बरीदशाही) व वऱ्हाडचें (इमादशाही) अशीं पांच राज्यें झालीं होतीं. ( सोबतचा नकाशा पहा. )

भारांत आपला हात शिरावा असें त्यास फार दिवस वाटत होतें. म्हणून त्यानें आपला पुत्र मुराद माळव्याच्या सुभेदारीवर होता, त्यास सैन्यासह वजिराच्या मदतीस पाठविलें.

वास्तविक राजपुत्र बहादूर हाच गादीचा खरा वारस होता. चांदबिबीनें त्याचाच पक्ष धरिला. ह्यावरून तिची सत्याविषयीं प्रीति दिसून येते. तिनें मुराद येण्यापूर्वींच वजीर व त्यानें गादीवर बसविलेला मुलगा यांस हांकून लावून बहादुरास तक्तावर स्थापिलें आणि इतर तटांतील लोकांचा मोड करण्यासाठीं विजापूरच्या आदिलशाहाकडे मदत मागितली.

इतक्यांत मुराद अहमदनगरास येऊन त्यानें किल्ल्यास वेढा दिला. विजापुराहून आदिलशाहाचें सैन्य चांदबिबीच्या मदतीसाठीं रवाना झाल्याची बातमी त्याला लागतांच तें सैन्य नगरास येण्यापूर्वींच किल्ला सर करण्याचा त्यानें निश्चय केला. नगरचा किल्ला फार मजबूत; तो लवकर हातीं येण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां बुरुजाखालीं सुरुंग लावून तटास खिंडार पाडण्याचा प्रयत्न त्यानें चालविला. चांदबिबीनें आपली पराकाष्ठा करून शत्रूचे दोन सुरुंग वायां घालविले. पण तिसऱ्या सुरुंगानें तटास एक भलें मोठें खिंडार पडलें !

खिंडार पाहातांच किल्ल्यांतील लोक घाबरले. खिंडारावाटे मुरादाचे लोक आंत येत आहेत व आपले लोक माघार घेत आहेत, हें पाहातांच चांदबिबीनें अंगांत चिलखत चढविलें, हातांत नागवी तरवार घेतली आणि आवेशानें पुढें सरून ती आपल्या लोकांस म्हणाली, ‘ मर्दहो, भिऊं नका. धैर्य धरा. बायकांप्रमाणें पळून गेल्यानें मरण थोडेंच चुकणार आहे ! शौर्यानें लढाल तर कीर्ति तरी होईल. चला, फिरा मागें. मी जिवंत असतां शत्रु आंत येऊ शकणार नाहीं. ’ ह्या भाषणानें सैन्यास त्वेष येऊन त्यानें शत्रूवर दगड, गोळ्या व तीर

यांचा पाऊस पाडिला. मुरादानेंही आंत शिरण्याविषयीं शिकस्त केली; पण व्यर्थ. शेवटीं काळोख पडल्यामुळें मुरादानें हल्ला थांबविला.

सकाळीं पाहातो तों खिंडार बुजालेलें! चांदबिबीनें रातोरात खिंडाराच्या आंतील बाजूस सहा हात जाडीची भिंत बांधून काढविली! ही तिची समयसूचकता व धैर्य पाहून मुराद थक्क झाला व हिच्यापुढें आपलें कांहीं चालणार नाहीं असें जाणून तिच्याशीं तह करून तो परत गेला.

अशा प्रकारें चांदबिबीनें आपल्या शौर्यानें अहमदनगरच्या राज्याचा इ० स० १५९५ सालीं बचाव केला.

---

## ५. विनोदाचे बोल खरे झाले.

मराठ्यांचें राज्य स्थापन करणारे शिवाजीमहाराज जिच्या पोटीं जन्मास आले त्या वीरमाता जिजाबाईचें लग्न शहाजीराजे भोंसले यांच्याशीं झालें, तो प्रकार असाः—

निजामसरकारच्या राज्यांत शिंदखेड म्हणून एक गांव आहे. तेथें पूर्वीं लखूजी जाधवराव नांवाचे देशमूख राहात असत. जाधवराव हे कांहीं सामान्य पुरुष नव्हते. निजामशाहींतील ते एक मातबर सरदार असून त्यांच्या हाताखालीं १२००० स्वार होते. शिवाय त्यांची जहागीरही मोठी होती.

इ० स० १५९९ सालीं शिमग्याचे सणांत रंगपंचमीचे दिवशीं जाधवरावांनीं आसपासच्या मराठे लोकांस आपणाकडे पानसुपारीस बोलाविलें होतें. तेव्हां वेरूळचा पाटील मालोजी भोंसले हा सुद्धां आपल्या शहाजी नांवाच्या मुलासह तेथें आला होता. ह्या वेळीं शहाजी पांच वर्षांचा होता.

जाधवराव व भोंसले यांचा पूर्वींपासून फार घरोबा होता. त्यांत शहाजी हा देखणा व तरतरीत असल्यामुळें जाधव-

रावांनीं ममतेनें त्यास आपणाजवळ बोलावून शेजारीं बसवून घेतलें. ह्या वेळीं त्यांची मुलगी जिजाबाई तेथेंच होती. ती सुमारें तीन वर्षांची होती.

तीं दोन मुलें तेथें खेळत असतां जाधवराव आपल्या मुलीकडे पाहून विनोदानें बोलले, ' जिजाऊ, तुला हा नवरा पाहिजे का ? ' लागलेच ते मंडळीकडे पाहूनही म्हणाले, ' कायहो, हा जोडा फार नामी शोभतो, नाहीं ! ' इतक्यांत तीं मुलें एकमेकांवर गुलाल उधळूं लागलीं. तें पाहून तर सर्वांस फार कौतुक वाटलें.

हा विनोद चालला असतां मालोजी उभा राहून बोलला, ' ऐकाहो, आजपासून जिजाबाई आमची सून झाली. ह्याला तुम्ही साक्ष आहां. '

जाधवरावांस हें मालोजीचें भाषण आवडलें नाहीं. मालोजीचें घराणें कुलशीलानें कमी होतें अशांतला भाग नव्हता. पण देशमुखाची मुलगी पाटलाच्या मुलास कशी द्यावी ? हा विचार त्यांच्या मनांत येऊन, आपण विनोदानें सहज बोललों त्याचा मालोजीनें भलताच अर्थ करून चार लोकांदेखत सोयरिकीची गोष्ट काढिली, ह्याचा त्यांना फार राग आला. तथापि बाहेरून त्यांनीं तें सर्व हांसण्यावर नेलें.

मालोजीला ह्या गोष्टीची मोठी रुखरुख लागली. दुसरे दिवशीं जाधवरावांनीं इतरांबरोबर मालोजीस मेजवानीस बोलाविलें असतां त्यानें सांगून पाठविलें कीं, ' आपणांस सोयरीक कबूल असेल तर मी जेवणास येतों, नाहीं तर येत नाहीं. ' ह्याचा त्याला कांहींच जबाब मिळाला नाहीं. तेव्हां यांत आपला मोठा अपमान झाला असें मालोजीस वाटलें.

मालोजी मोठा बाणेदार होता, तो अपमान गिळून थोडाच स्वस्थ बसणार ! जाधवरावांशीं सोयरीक करीनच करीन अशा

निश्चयानें तो आपली योग्यता वाढविण्याच्या उद्योगास लागला. असें सांगतात कीं, ‘ मालोजीस तुळजापूरच्या भवानीच्या प्रसादानें एका जागीं द्रव्याचा मोठा ठेवा सांपडला.’ तें द्रव्य खर्च करून त्यानें आपल्या हाताखालीं पुष्कळ स्वार ठेविले; आणि आपला मेहुणा, फलटणचे निंबाळकर सरदार, ह्यांचे वशिल्यानें तो निजामशाहाच्या चाकरीस राहिला. तेथें मालोजीनें मोठा पराक्रम केल्यामुळें त्याला निजामशाहाकडून पांच हजार स्वरांची सरदारी, राजे अशी पदवी, आणि पुणें, सुपें हे दोन परगणे व शिवनेरी, चाकण हे दोन किल्ले अशी जहागीर मिळाली. नंतर मालोजी राजे भोंसले यांनीं जिजाबाईला पुन्हां मागणी घातली. या वेळीं त्यांचा दर्जा वाढलेला होता. शिवाय निजामशाहाचीहि भीड पडली म्हणून जाधवरावांना, मनांत नव्हतें तरी, उघडपणें नाहीं म्हणवेना. तेव्हां सन १६०४ सालीं दौलताबादेस मोठ्या थाटानें शहाजी व जिजाबाई ह्यांचें लग्न झालें. अशा प्रकारें ‘ विनोदाचे बोल खरे झाले.’

---

## ६. बालशिवाजी.

मुलांनो, मराठ्यांच्या राज्याचा पाया घालणारे शिवाजीमहाराज यांच्या बालपणची हकीकत आज सांगावयाची आहे.

मागील गोष्टींत शहाजी व जिजाबाई ह्यांच्या लग्नाची हकिकत आली आहेच. जिजाबाईस दोन मुलगे झाले. वडील मुलगा संभाजी व धाकटा शिवाजी. संभाजी तरुण वयांत विजापुरकरातर्फे एक किल्ला काबीज करीत असतां मारला गेला व शिवाजी आपल्या पराक्रमानें नांवलौकिकास चढला.

इ० स० १६२९ च्या सुमारास निजामशाही राज्यावर मोठें संकट आलें होतें. त्या राज्यावर दिल्लीचा बादशाह

सैन्यामागून सैन्य पाठवीत होता. अशा स्थितींत त्या राज्यास शहाजीराजाचाच काय तो टेंका होता. एका प्रसंगीं शहाजीच्या मागें मोंगलांचें सैन्य लागून तो पळत असतां त्याच्याबरोबर जिजाबाईही होती. त्या वेळीं ती सात महिन्यांची गरोदर असल्यामुळें तिला प्रवासाचा फार त्रास होऊं लागला. तेव्हां आपला पाठलाग करणाऱ्या सैन्याचा मुख्य आपला सासरा असल्यामुळें त्याजकडून जिजाबाईस अपाय होणार नाहीं असें जाणून शहाजी तिला वाटेंत सोडून पुढें चालता झाला. तेव्हां जिजाबाई आपल्या बापाच्या हातीं लागली. त्यानें तिला तिच्या इच्छेप्रमाणें शिवनेरी किल्ल्यावर पोहोंचती केली.

शिवनेरी किल्ला शहाजीच्या जहागिरीपैकींच एक ठिकाण होतें. तेथील कारभार पाहण्यासाठीं शहाजीनें दादोजी कोंड-देव नांवाचे एक सुशील व प्रामाणिक कारकून नेमिले होते.

ह्या ठिकाणीं जिजाबाईला नऊ महिने पूर्ण होऊन ता. १० एप्रिल इ० स० १६२७ रोजीं मुलगा झाला. हाच मुलगा प्रतापी शिवाजी महाराज होय. ह्याचें शिवाजी असें नांव ठेवण्याचें कारण असें सांगतात कीं, जिजाबाई शिवनेरीस आल्यावर तिनें किल्ल्यांतील शिवाई देवीला नवस केला कीं, 'माते, मला पराक्रमी मुलगा होवो, मी त्याला तुझें नांव ठेवीन.' देवी नवसास पावून तिला मुलगाच झाला. म्हणून तिनें त्याचें नांव शिवाजी ठेविलें.

निश्चयानें तो आपली योग्यता वाढविण्याच्या उद्योगास लागला. असें सांगतात कीं, ' मालोजीस तुळजापूरच्या भवानीच्या प्रसादानें एका जागीं द्रव्याचा मोठा ठेवा सांपडला. ' तें द्रव्य खर्च करून त्यानें आपल्या हाताखालीं पुष्कळ स्वार ठेविले; आणि आपला मेहुणा, फलटणचे निंबाळकर सरदार, ह्यांचे वशिल्यानें तो निजामशाहाच्या चाकरीस राहिला. तेथें मालोजीनें मोठा पराक्रम केल्यामुळें त्याला निजामशाहाकडून पांच हजार स्वरांची सरदारी, राजे अशी पदवी, आणि पुणें, सुपें हे दोन परगणे व शिवनेरी, चाकण हे दोन किल्ले अशी जहागीर मिळाली. नंतर मालोजी राजे भोंसले यांनीं जिजाबाईला पुन्हां मागणी घातली. या वेळीं त्यांचा दर्जा वाढलेला होता. शिवाय निजामशाहाचीहि भीड पडली म्हणून जाधवरावांना, मनांत नव्हतें तरी, उघडपणें नाहीं म्हणवेना. तेव्हां सन १६०४ सालीं दौलताबादेस मोठ्या थाटानें शहाजी व जिजाबाई ह्यांचें लग्न झालें. अशा प्रकारें ' विनोदाचे बोल खरे झाले. '

---

## ६. बालशिवाजी.

*मुलांनो, मराठ्यांच्या राज्याचा पाया घालणारे शिवाजीमहाराज यांच्या बालपणची हकीकत आज सांगावयाची आहे.*

*मागील गोष्टींत शहाजी व जिजाबाई ह्यांच्या लग्नाची हकिकत आली आहेच. जिजाबाईस दोन मुलगे झाले. वडील* मुलगा संभाजी व धाकटा शिवाजी. संभाजी तरुण वयांत विजापुरकरातर्फे एक किल्ला काबीज करीत असतां मारला गेला व शिवाजी आपल्या पराक्रमानें नांवलौकिकास चढला.

इ० स० १६२९ च्या सुमारास निजामशाही राज्यावर मोठें संकट आलें होतें. त्या राज्यावर दिल्लीचा बादशाह

सैन्यामागून सैन्य पाठवीत होता. अशा स्थितींत त्या राज्यास शहाजीराजाचाच काय तो टेंका होता. एका प्रसंगीं शहाजीच्या मागें मोंगलांनें सैन्य लागून तो पळत असतां त्याच्याबरोबर जिजाबाईही होती. त्या वेळीं ती सात महिन्यांची गरोदर असल्यामुळें तिला प्रवासाचा फार त्रास होऊं लागला. तेव्हां आपला पाठलाग करणाऱ्या सैन्याचा मुख्य आपला सासरा असल्यामुळें त्याजकडून जिजाबाईस अपाय होणार नाहीं असें जाणून शहाजी तिला वाटेंत सोडून पुढें चालता झाला. तेव्हां जिजाबाई आपल्या बापाच्या हातीं लागली. त्यानें तिला तिच्या इच्छेप्रमाणें शिवनेरी किल्ल्यावर पोहोंचती केली.

शिवनेरी किल्ला शहाजीच्या जहागिरीपैकींच एक ठिकाण होतें. तेथील कारभार पाहण्यासाठीं शहाजीनें दादोजी कोंडदेव नांवाचे एक सुशील व प्रामाणिक कारकून नेमिले होते.

ह्या ठिकाणीं जिजाबाईला नऊ महिने पूर्ण होऊन ता. १० एप्रिल इ० स० १६२७ रोजीं मुलगा झाला. हाच मुलगा प्रतापी शिवाजी महाराज होय. ह्याचें शिवाजी असें नांव ठेवण्याचें कारण असें सांगतात कीं, जिजाबाई शिवनेरीस आल्यावर तिनें किल्ल्यांतील शिवाई देवीला नवस केला कीं, 'माते, मला पराक्रमी मुलगा होवो, मी त्याला तुझें नांव ठेवीन.' देवी नवसास पावून तिला मुलगाच झाला. म्हणून तिनें त्याचें नांव शिवाजी ठेविलें.

निश्चयानें तो आपली योग्यता वाढविण्याच्या उद्योगास लागला. असें सांगतात कीं, ' मालोजीस तुळजापूरच्या भवानीच्या प्रसादानें एका जागीं द्रव्याचा मोठा ठेवा सांपडला. ' तें द्रव्य खर्च करून त्यानें आपल्या हाताखालीं पुष्कळ स्वार ठेविले; आणि आपला मेहुणा, फलटणचे निंबाळकर सरदार, ह्यांचे वशिल्यानें तो निजामशाहाच्या चाकरीस राहिला. तेथें मालोजीनें मोठा पराक्रम केल्यामुळें त्याला निजामशाहाकडून पांच हजार स्वरांची सरदारी, राजे अशी पदवी, आणि पुणें, सुपें हे दोन परगणे व शिवनेरी, चाकण हे दोन किल्ले अशी जहागीर मिळाली. नंतर मालोजी राजे भोंसले यांनीं जिजाबाईला पुन्हां मागणी घातली. या वेळीं त्यांचा दर्जा वाढलेला होता. शिवाय निजामशाहाचीहि भीड पडली म्हणून जाधवरावांना, मनांत नव्हतें तरी, उघडपणें नाहीं म्हणवेना. तेव्हां सन १६०४ सालीं दौलताबादेस मोठ्या थाटानें शहाजी व जिजाबाई ह्यांचें लग्न झालें. अशा प्रकारें ' विनोदाचे बोल खरे झाले. '

---

## ६. बालशिवाजी.

मुलांनो, मराठ्यांच्या राज्याचा पाया घालणारे शिवाजीमहाराज यांच्या बालपणची हकीकत आज सांगावयाची आहे.

मागील गोष्टींत शहाजी व जिजाबाई ह्यांच्या लग्नाची हकिकत आली आहेच. जिजाबाईस दोन मुलगे झाले. वडील मुलगा संभाजी व धाकटा शिवाजी. संभाजी तरुण वयांत विजापुरकरातर्फे एक किल्ला काबीज करीत असतां मारला गेला व शिवाजी आपल्या पराक्रमानें नांवलौकिकास चढला.

इ० स० १६२९ च्या सुमारास निजामशाही राज्यावर मोठें संकट आलें होतें. त्या राज्यावर दिल्लीचा बादशाह

सैन्यामागून सैन्य पाठवीत होता. अशा स्थितींत त्या राज्यास शहाजीराजाचाच काय तो टेंका होता. एका प्रसंगीं शहाजीच्या मागें मोंगलांचें सैन्य लागून तो पळत असतां त्याच्याबरोबर जिजाबाईही होती. त्या वेळीं ती सात महिन्यांची गरोदर असल्यामुळें तिला प्रवासाचा फार त्रास होऊं लागला. तेव्हां आपला पाठलाग करणाऱ्या सैन्याचा मुख्य आपला सासरा असल्यामुळें त्याजकडून जिजाबाईस अपाय होणार नाहीं असें जाणून शहाजी तिला वाटेंत सोडून पुढें चालता झाला. तेव्हां जिजाबाई आपल्या बापाच्या हातीं लागली. त्यानें तिला तिच्या इच्छेप्रमाणें शिवनेरी किल्ल्यावर पोहोंचती केली.

शिवनेरी किल्ला शहाजीच्या जहागिरीपैकींच एक ठिकाण होतें. तेथील कारभार पाहण्यासाठीं शहाजीनें दादोजी कोंडदेव नांवाचे एक सुशील व प्रामाणिक कारकून नेमिले होते.

ह्या ठिकाणीं जिजाबाईला नऊ महिने पूर्ण होऊन ता. १० एप्रिल इ० स० १६२७ रोजीं मुलगा झाला. हाच मुलगा प्रतापी शिवाजी महाराज होय. ह्याचें शिवाजी असें नांव ठेवण्याचें कारण असें सांगतात कीं, जिजाबाई शिवनेरीस आल्यावर तिनें किल्ल्यांतील शिवाई देवीला नवस केला कीं, ' माते, मला पराक्रमी मुलगा होवो, मी त्याला तुझें नांव ठेवीन. ' देवी नवसास पावून तिला मुलगाच झाला. म्हणून तिनें त्याचें नांव शिवाजी ठेविलें.

## शिवाजी.



शिवाजी तीन वर्षांचा होतांच जिजाबाई मुलासह पुण्यास येऊन राहिली. शिवाजी ज्या वाड्यांत लहानाचा मोठा झाला तो वाडा पुण्यांतील कसबा पेठेंत होता.

शिवाजीवर जिजाबाईचें फार प्रेम होतें. परंतु ती इतर सामान्य आयांप्रमाणें आपल्या मुलाचे नुसते लाड पुरवीत न राहतां तो सुशील व पराक्रमी निपजावा म्हणून तिनें व दादोजीनें फार खबरदारी घेतली.

शिवाजी पंधरा वर्षांचा होतो तोंच त्याला घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें, भाला फेंकणें, निशाण मारणें, दांडपट्टा खेळणें इत्यादि सरदाराच्या मुलास अवश्य अशा गोष्टी सफाईनें करितां येऊं लागल्या. शिवाजीनें मोठमोठे पराक्रम करावे म्हणून त्यास जिजाबाई आपल्या दोन्ही कुळांतील पूर्वजांच्या मर्दुमकीच्या गोष्टी सांगत असे. त्याला कसें वागावें याची

माहिती होण्यासाठीं रामायण, महाभारत इत्यादि पवित्र ग्रंथांतील गोष्टी सांगवीत असे. त्याला जहागिरीच्या व्यवस्थेचें—राज्यकारभाराचें—ज्ञान होण्यासाठीं स्वतः दादोजी कारभार कारितांना त्याला आपणाजवळ बसवीत व लहान लहान कामें त्याजकडूनच करून घेत.

अशा प्रकारें लहानपणापासून योग्य काळजी घेतल्यामुळें शिवाजीच्या ठायीं धाडस, शौर्य, मर्दुमकी, सदाचारप्रीति, स्वधर्मनिष्ठा इत्यादि सद्गुण चांगल्या प्रकारें दिसूं लागले. शिवाजी शरिरानें बळकट असून देखणा होता. त्याला लिहितां वाचतां येत होतें कीं नव्हतें, याबद्दल निश्चित कांहीं सांगतां येत नाहीं.*तरी त्यानें पुढें विद्येस बरेंच उत्तेजन दिल्याचें दिसून येतें.

अशा प्रकारचा शिवाजीचा लहानपणीं वर्तनक्रम होता.

---

## ७. तुकाराममहाराज.

मुलांनो, शिवाजीच्या काळीं महाराष्ट्रामध्यें शूर व पराक्रमी पुरुषांप्रमाणें साधुपुरुषही पुष्कळ होऊन गेले. त्यांनीं आपल्या उपदेशानें व चांगल्या आचरणानें ह्या प्रांतांतील असंख्य लोकांचीं मनें सन्मार्गाकडे वळविलीं. अशा पुरुषांमध्यें तुकाराममहाराज हे मुख्य होते.

इ०स० १६११ सालीं पुण्याजवळ देहू गांवीं तुकारामाचा जन्म झाला. ह्याच्या बापाचें नांव बोल्होबा मोरे. तो जातीचा कुणबी असून किराण्या जिनसांचा व्यापार करीत असे. त्याला

---

* कोणी म्हणतात, 'त्याला लिहितां वाचतां येत नव्हतें.' दुसऱ्यांचें मत असें आहे कीं, 'त्याला मराठी चांगलें लिहितां वाचतां येत असून उर्दू, फारशी व थोडें संस्कृतही कळत असे.'

सावजी, तुकाराम व कान्होबा असे तीन मुलगे होते. सावजीचें लहानपणापासून संसाराकडे लक्ष नव्हतें.

तुकाराम सतरा वर्षांचा होतो, तों त्याचीं मातापितरें मरण पावलीं, आणि कुटुंबपोषणाचें काम त्याच्यावर येऊन पडलें. पुढें लवकरच एक मोठा दुष्काळ पडला. त्यांत त्याच्या घरचीं कांहीं माणसें व गुरेंढोरें अन्नपाण्यावांचून तडफडून मरण पावलीं ! त्यामुळें त्याला संसाराचा वीट येऊन त्याचें लक्ष ईश्वरभजनाकडे लागलें, तें शेवटपर्यंत टिकलें.

तुकाराम ईश्वरभजनास लागला खरा, पण त्यानें आपल्या चरितार्थाचा भार दुसऱ्यावर मुळींच टाकला नाहीं. त्यानें आपल्या गरजा कमी केल्या. केवळ मोटेंथोटें अन्नवस्त्र मिळण्यापुरतें त्याला शेताचें उत्पन्न येत असे. परोपकारासाठीं क्वचित् द्रव्य लागल्यास तो नोकरीही करी; पण भिक्षा कधींही मागत नसे. 'भिक्षापात्र अवलंबणें जळो जिणें लाजिरवाणें' अशी त्याची पक्की समजूत होती.

भक्तीनें ईश्वरभजन करून हातून होईल तेवढा परोपकार करावा आणि लोकांस ईश्वरभक्ति करण्याचा व नीतीनें वागण्याचा उपदेश करावा, हा तुकारामाचा मुख्य उद्योग असे. तो कीर्तन करी व त्या वेळीं सांगावयाच्या गोष्टी पद्यांमध्यें म्हणून दाखवी. ह्या पद्यांना अभंग असें म्हणत. त्याचे सुमारें ४६०० अभंग सांपडले असून ते सर्व 'तुकारामाची गाथा' या नांवानें प्रसिद्ध आहेत. ते सर्वांनीं अवश्य वाचावे. अभंगांची भाषा सरळ असून त्यांत प्रसंगास योग्य असा उपदेश मोठ्या कळवळ्यानें व प्रेमानें केला आहे. विषय सुबोध होण्याकरितां जागोजाग व्यवहारांतील दृष्टांत दिले आहेत.

तुकारामाच्या साधुपणाची कीर्ति शिवाजीच्या कानीं जातांच त्यानें त्यास मोठ्या समारंभानें आपणाकडे आणण्यासाठीं

देहूस माणसें पाठविलीं. त्यानें तुकारामास नजर करण्याकरितां पुष्कळ द्रव्यही त्यांच्यापाशीं दिलें होतें. ह्या वेळीं तुकारामाची निर्लोभ-बुद्धि व निस्पृहता चांगलीच कसाला लागली. त्यानें तें सर्व द्रव्य परत करून शिवाजीस उलट निरोप पाठविला कीं, 'आम्हास तुम्हाकडे येऊन काय मागावयाचें आहे? चालण्याचे फुकट श्रम मात्र होतील. तुम्ही रामदासचरणीं सर्व लक्ष ठेवून अनाथांचें व धर्माचें रक्षण करावें, त्यांत आम्हांस आनंद आहे.' तेव्हां स्वतः शिवाजी देहूस जाऊन तुकारामाचें दर्शन घेऊन आला.

तुकारामाच्या अंगीं सहनशीलता हा गुण विशेष होता. दुसऱ्यानें त्रास दिला अगर निंदा केली तरी त्याला राग कसा तो येतच नसे. उलट, अपकाराची फेड तो उपकारानें करी. ह्याविषयीं अशी एक गोष्ट सांगतात कीं, 'देहू गांवीं मंबाजीबुवा नांवाचा एक ढोंगी साधु राहात असे. दिवसानुदिवस तुकारामाची कीर्ति वाढत चाललेली पाहून मंबाजी त्याचा द्वेष करूं लागला, व लोकांत त्याची अप्रतिष्ठा व्हावी म्हणून त्यानें पुष्कळ नीच प्रयत्नही करून पाहिले; पण सर्व व्यर्थ. तेव्हां सरतेशेवटीं त्यानें तुकारामास एका अगदीं क्षुल्लक कारणावरून खूप मारिलें. पण तुकारामाच्या मनाची शांति तिळमात्र ढळली नाहीं. त्यानें मंबाजीला बोटही लाविलें नाहीं अगर दुरुत्तरही केलें नाहीं. तथापि सज्जनाच्या छळाबद्दल ईश्वराकडून शासन हें व्हावयाचेंच. दुसऱ्या दिवशीं मंबाजीचें सर्व अंग ठणकूं लागून फार वेदना होऊं लागल्या. हें तुकारामास समजतांच तो त्याच्या समाचारास गेला, व त्याचें अंग रगडूं लागला. काय आश्चर्य सांगावें, तुकारामाचा हात लागतांच सर्व वेदना नाहींतशा होऊन मंबाजी ठणठणीत बरा झाला!

तुकारामावर ईश्वराची फार कृपा होती. त्याच्यासाठीं ईश्वरानें कित्येक चमत्कार दाखविले. असें म्हणतात कीं, 'एकदां देहूच्या कांहीं लोकांनीं दुष्टबुद्धीनें तुकारामाच्या अभंगांच्या वह्या डोहांत बुडविल्या, परंतु वह्या चौदा दिवस पाण्यांत होत्या तरी आपल्या कोरड्या ठणठणीत' !

अशा प्रकारचा हा थोर पुरुष इ. स. १६४९साली देहू गांवीं मरण पावला. तुकारामाचा स्वभाव फारच प्रेमळ व परोपकारी होता. ऐहिक फायद्याकडे त्याची मुळींच दृष्टि नसे. परमेश्वराच्या ठिकाणीं त्याचें खरें प्रेम असून तें नेहमीं कायम राहावें म्हणून ईश्वरापाशीं 'तुझा विसर न व्हावा' असें त्याचें सदैव मागणें असे. त्याच्या अलौकिक गुणांमुळें वारकरी हिंदू-लोक 'तुकाराममहाराज' असा त्याच्या नांवाचा घोष करून त्याचें भजन करीत असतात व देहूस फाल्गुन वद्य २ रोजीं दरसाल मोठा उत्सव करितात.

---

## ८. रामदास व दासबोध.

मुलांनो, जिजाबाईप्रमाणें ज्यानें शिवाजीस उपदेश केला त्या रामदासस्वामींची व त्यानीं केलेल्या दासबोध नांवाच्या प्रसिद्ध ग्रंथाची थोडीशी माहिती आज तुम्हांस सांगावयाची आहे.

गोदावरीच्या कांठीं जामगांव नांवाचें एक खेडें आहे. तेथें इ. स. १६०० च्या सुमारास सूर्याजीपंत ठोसर नांवाचे गृहस्थ राहात होते. ह्यांच्या पत्नीचें नांव राणूबाई. हीं दोघेंही फार सुशील, धर्मनिष्ठ व भक्तिमान होतीं. नेहमीं रामाचें चिंतन व भजन ह्यांत तीं दोघें रंगून गेलेलीं असत. ह्यांना गंगाधर व नारायण असे दोन मुलगे होते. हे सुद्धा आपल्या आईबापां-प्रमाणें रामभक्त निपजले. विशेषतः नारायणाचें लक्ष रामाची भक्ति करण्याकडे फार होतें, लग्नकार्य करून संसारांत न पडतां

मरेपर्यंत अविवाहित राहावें, नाना देश व पवित्र तीर्थें पाहावीं, साधुसंतांच्या भेटी घ्याव्या व त्यांच्या संगतींत राहून ईश्वराचें भजनपूजन करावें, हे विचार त्याच्या मनांत लहानपणापासून घोळत असत; व पुढें ते इतके दृढ झालें कीं, नारायणाचें लग्न त्याच्या इच्छेविरुद्ध चाललें असतां मंगलाष्टकें म्हणण्याच्या ऐन वेळीं तो घरांतून पळून गेला. ह्या समयीं तो केवळ बारा वर्षांचा होता. इतक्या लहान वयांत केवढा हा दृढनिश्चय !

नारायण घरांतून निघाला तो नाशकास आला, व त्याचें कुळदैवत जो राम त्याची उपासना करूं लागला. दररोज पंचवटींत माधुकरी मागावी, श्रीरामचंद्रास नैवेद्य दाखवावा व नंतर स्वतः भोजन करावें असा त्याचा नित्यक्रम होता. रामाच्या या दृढभक्तीवरून लोक नारायणास रामदास म्हणूं लागले.

ह्या स्थितींत रामदासानें बारा वर्षें काढून उत्तम विद्या संपादन केली. नंतर तो तीर्थयात्रेस निघाला. काशी, अयोध्या, जगन्नाथ, रामेश्वर, द्वारका इत्यादि हिंदुस्तानांतील सर्व प्रसिद्ध तीर्थें पाहात पाहात व ठिकाठिकाणीं मारुतीची स्थापना करीत करीत तो दोन वर्षांनीं परत आला. त्यामुळें त्याला बहुत माहिती झाली. कित्येक मुख्य मुख्य ठिकाणीं त्यानें रामदासी मठांची स्थापना करून तेथें शिष्य ठेविले. असें सांगतात कीं, रामदासाचे मरणसमयीं सुमारें ८०० ठिकाणीं रामदासी मठ होते.

तीर्थयात्रेनंतर रामदास कृष्णातीरीं माहुलीस येऊन राहिला. तेथें त्याची विशेष कीर्ति होऊन लोक त्याला समर्थरामदासस्वामी म्हणूं लागले. पुढें स्वामी साताऱ्यानजीक चाफळगांवीं येऊन राहिले.

इ० स० १६४९ च्या सुमारास स्वामींची कीर्ति शिवा-

जीच्या कानीं गेली. तेव्हां त्यानें त्यांची भेट घेऊन त्यांस आपला गुरु केलें. स्वामींनीं त्याला "मनुष्यानें जन्मास येऊन काय केलें पाहिजे" याचा उपदेश करून त्याच्याठिकाणीं कर्तव्यनिष्ठा उत्पन्न केली व पुढेंही हरएक प्रसंगीं स्वामी त्याला योग्य सल्ला देऊन आपल्या हातून होईल ती मदत करीत. शिवाजीची स्वामींच्या ठिकाणीं बहुत निष्ठा होती. त्यांच्या खर्चासाठीं त्यानें त्यांस एक गांव इनाम करून दिला आणि पुढें सर्व राज्य त्यांना अर्पण केलें. स्वामी बालपणापासून निरिच्छ त्यांना राज्य घेऊन काय करावयाचें होतें! तथापि शिवाजीच्या समजुतीखातर स्वीकारल्यासारखें करून तें फिरून शिवाजीस देऊन स्वामींनीं म्हटलें, "शिवबा, हें माझें राज्य तूं संभाळ. मात्र माझ्या स्वामित्वाची खूण म्हणून तूं आपल्या फौजेचा झेंडा भगवा कर." हल्लीं रामराम करण्याची जी पद्धत आहे ती स्वामींच्या आज्ञेवरून शिवाजीनें सुरू केली. त्याच्या पूर्वीं परस्परांस जोहार करण्याचा परिपाठ होता.

स्वामी इ० स० १६८१ सालीं समाधिस्थ झाले. ते महासाधु होते. त्यांना व्यवहार व परमार्थ ह्यांचें उत्तम ज्ञान असून ते चांगले कविही होते, हें त्यांनीं रचिलेल्या दासबोधावरून स्पष्ट होतें. दासबोध हा विस्तृत ग्रंथ आहे. त्याचे वीस दशक (प्रकरणें) असून प्रत्येक दशकांत दहा पोटप्रकरणें आहेत. या ग्रंथांत संसार व परमार्थ ह्या दोहोंचीही संगति घालून दिली आहे. 'ज्याला संसार चालविण्याचें ज्ञान नाहीं त्याला परमार्थ कसा साधेल,' असें समर्थांचें म्हणणें असे. म्हणूनच या ग्रंथामध्यें संसार व परमार्थ यासंबंधीं भरपूर ज्ञान भरलें आहे. तो सर्वांनीं अवश्य वाचावा. दासबोधाशिवाय स्वामींनी पुष्कळ स्फुट कविता केली आहे. तींत 'मनाचे श्लोक' प्रसिद्ध आहेत.

२५५८

## ९ आरंभींची धामधूम.

मुलांनो, जिजाबाईनें आपल्या चांगल्या उपदेशाच्या योगानें शिवाजीच्या मनामध्यें 'आपण मोठमोठे पराक्रम करावे' म्हणून जें बीज लाविलें होतें, त्याला इ० स० १६४६ पासून अंकुर फुटूं लागला; तो प्रकार असाः—

शिवाजीचा स्वभाव मनमिळाऊ असून त्याचें भाषण दुसऱ्याचें मन वळविणारें होतें. त्यामुळें जिवास जीव देणारे कित्येक मित्र त्याच्या भोंवतीं गोळा झाले. ह्या मित्रमंडळींत तानाजी मालुसरे, येसाजी कंक व बाजी फसलकर हे मुख्य होते. ह्या मित्रमंडळींच्या साह्यानें व सह्याद्रींतल्या मावळे लोकांच्या बळावर त्यानें राज्य स्थापण्याचा आपला बेत तडीस नेला.

शहाजीच्या जहागिरीच्या डोंगराळ प्रदेशांत मावळे लोकांची वस्ती होती. हे लोक मुख्यत्वेंकरून शेतकी व रानांतील कंदमुळें आणि फळें ह्यांवर आपला निर्वाह करीत असत. विश्वासूपणा व प्रामाणिकपणा हे त्यांच्यामधील मुख्य दोन गुण होत; शिवाय खडकाळ प्रदेशांतच यांचा जन्म झाला असल्यामुळें ह्यांच्या आंगीं काटकपणा फार असे. हे अल्पसंतुष्ट असून ह्यांची राहणीही फार साधी असे. ह्यांना डोंगरांतील चोरवाटा चांगल्या माहीत असत. ह्या सर्व गुणांमुळें हे लोक शिवाजीच्या फार उपयोगीं पडले.

शहाजीच्या जहागिरीच्या भोंवतीं विजापूरच्या बादशाहाचा मुलूख होता. हा मुलूख फार डोंगराळ व विजापुरापासून फार दूर असल्यामुळें इकडे त्या बादशाहाचा फारसा बंदोबस्त नव्हता. तेव्हां हा मुलूख कोणत्या तरी उपायानें आपल्या ताब्यांत आणावा व आपलें सामर्थ्य हळूहळू वाढवावें, असा शिवाजीनें बेत केला.

त्याप्रमाणें इ० स० १६४६ सालीं त्यानें तोरणा नांवाचा

किल्ला तेथील किल्लेदारास वश करून घेतला. हा किल्ला पुण्याचे नैर्ऋत्येस वीस मैल अंतरावर आहे.

हा किल्ला ताब्यांत येतांच शिवाजीनें विजापुरास वकील पाठवून बादशाहास कळविलें कीं, "येथील किल्लेदार ह्या मुलुखाचा वसूल सरकारांत सुरळीतपणें भरीत नव्हता, असें समजल्यावरून आम्हीं सरकारचे विश्वासू नोकर या नात्यानें तो किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. आम्ही या पुढें वसूल नियमितपणें पाठवीत जाऊं." ह्या बोलण्याचा बादशाहास खरेपणा वाटण्यासाठीं शिवाजीनें त्या वकिलाबरोबर त्यास एक मोठा नजराणा पाठविला.

तोरणा किल्ल्याचा कांहीं भाग पडलेला होता. त्याची दुरुस्ती चालली असतां शिवाजीस एके ठिकाणीं द्रव्याचा ठेवा सांपडला. ह्या द्रव्याच्या योगानें त्यानें तोरणा किल्ल्यावर दारूगोळा व सैन्य यांचा पुरवठा केला, आणि जवळचा राजगड नांवाचा किल्ला बांधण्यास सुरुवात केली.

इ० स० १६४७ सालीं दादोजी कोंडदेव मरण पावले. नंतर शिवाजीच सर्व जहागिरीचा कारभार मुखत्यारीनें पाहूं लागला; तेव्हां चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळे व सुप्याचा सुभेदार बाजी मोहिते हे त्याच्या विरुद्ध जाऊं लागले, तेव्हां हा आपसांतला कलह आधीं मिटविला पाहिजे असें जाणून शिवाजीनें पहिल्यास गोडीगुलाबीनें वळविलें आणि दुसरा ऐकेना म्हणून एकाएकीं त्याच्यावर छापा घालून त्यास कैद केले!

इ० स० १६४८ सालीं त्यानें पुरंदर व सिंहगड हे किल्ले तेथील किल्लेदारांचें मन वळवून घेतले. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही कीं, उत्तरकोंकणांतील कल्याण प्रांत हा विजापूरच्या राज्यांतील एक सुभा होता. एक दिवस बराच मोठा खजिना

कल्याणाहून विजापुरास जात होता. त्याची बातमी शिवाजीस लागतांच त्यानें एकाएकीं खजिना नेणाऱ्या लोकांवर हल्ला करून सर्व पैसा लुटून नेला. आणि पुढें लवकरच त्या प्रांतावर त्याच्या लोकांनीं स्वारी करून तो काबीज केला; व येथील सुभेदारास मुलांमाणसांसह कैद केलें !

शिवाजी उदार मनाचा माणूस होता; लढाईंत पकडलेल्या लोकांशीं तो ममतेनें वागत असे. त्यानें त्या सुभेदारास मोकळें केलें, आणि त्याच्या सर्व माणसांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें पोषाक देऊन सर्वांची विजापुरास रवानगी केली.

ह्यानंतर शिवाजीनें जंजिऱ्याच्या सिद्दीवर स्वारी करून रायगड वगैरे किल्ले घेतले व कोंकणांतील समुद्रकांठचा बराच मुलूख व राजापूर बंदर काबीज केलें.

---

## १०. शहाजीस कैद केलें ( १६४९ ).

मुलांनो, मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें शिवाजीनें चालविलेल्या धामधुमीचा परिणाम प्रथम शहाजीस भोगावा लागला. तो प्रकार असा:—

शिवाजीनें आज हा किल्ला घेतला, उद्यां सरकारी खजिना लुटला, परवां तो परगणा काबीज केला इत्यादि बातम्या विजापूरच्या दरबारांत येऊन थडकूं लागल्या. त्यामुळें दरबारांत एकच धांदल उडाली ! इतक्यांत कल्याणचा सुभेदार विजापुरास येऊन दाखल झाला. त्यानें भर दरबारांत शिवाजीनें चालविलेल्या पुंडाईचें वर्णन केलें, तेव्हां तर मोठीच चळवळ उडाली. ‘शिवाजीचें पारिपत्य तात्काळ केलें पाहिजे, त्याला प्रबळ होऊं देतां कामा नये,’ अशा प्रकारचे उद्गार सरदारांच्या तोंडून निघूं लागले. परंतु खुद्द बादशाहास वाटलें कीं, “ शिवाजीस शहाजीची फूस असावी. त्याच्या पाठबळा-

वांचून ही पुंडाई चालली नसावी. तेव्हां शहाजीचाच बंदोबस्त करावा म्हणजे शिवाजी जागच्या जागींच स्वस्थ बसेल. त्याचें बंड मोडण्यासाठीं इतक्या दूरच्या पल्ल्यावर फौज पाठविण्याची जरूर नाहीं."

ह्या वेळीं शहाजी विजापूरकरांच्या पदरीं सरदार असून तो कर्नाटकांत कामगिरीवर होता. तेव्हां बादशाहानें मुधोळ येथलि बाजी घोरपडे नांवाच्या आपल्या सरदारास गुप्तपणें हुकूम पाठविला कीं, 'तुम्ही कसेंही करून शहाजीस कैद करून त्याच्यासह विजापुरास दाखल होणें.' हुकुमाप्रमाणें त्या सरदारानें एक दिवस शहाजीस आपल्याकडे बोलाविलें आणि विश्वासघातानें त्यास पकडून तो त्यास घेऊन बादशाहापुढें हजर झाला.

शहाजीस दरबारांत बादशाहासमोर उभें केल्यावर बादशाह त्यास म्हणाला, "तुमच्या मुलानें पुण्याकडे मोठा दंगा मांडला आहे, ही गोष्ट तुमच्या कानांवर आली असली पाहिजे, आम्हांस वाटतें कीं, या कामीं तुमचें अंग निःसंशय आहे. तेव्हां तुम्ही त्याचा बंदोबस्त ताबडतोब केला पाहिजे."शहाजीनें उत्तर केलें, "खाविंद, यांत माझा बिलकूल संबंध नाहीं, उलट 'तूं असें करूं नकोस' म्हणून मीं शिवाजीला ह्यापूर्वीं अनेक वेळां लिहिलें आहे पण तो माझें मुळींच ऐकत नाहीं, ह्यासाठीं सरकारानेंच त्यांजवर फौज पाठवून त्याचा बंदोबस्त करावा."

ह्या उत्तरानें बादशाहाचें समाधान न होतां त्याला जास्तच राग आला. त्यानें शहाजीला एका तळघरांत कोंडून ठेवण्याविषयीं हुकूम केला, आणि त्यास बजावून सांगितलें कीं, "थोड्याच दिवसांत शिवाजी ताळ्यावर आला नाहीं तर तळघराचे दारास हवा येण्यासाठीं असलेलें भोंकही बंद केलें जाईल."

वडिलांवर आलेल्या ह्या भयंकर प्रसंगाची हकीकत शिवा-

जीस समजली तेव्हां त्यास फार वाईट वाटलें. पण तो भीतीनें गांगरून गेला नाहीं. त्याला प्रसंगावधान होतें. बापाची सुटका होण्यासाठीं त्यानें एक फार नामी तोड काढिली; तीवरून त्याचें चातुर्य दिसून येतें. ती तोड अशीः—

विजापूरच्या बादशाहापेक्षां दिल्लीचा बादशाह शहाजहान हा फार बलिष्ट असून त्याच्या मनांत विजापूरचें राज्य खालसा करावयाचें होतें, ही गोष्ट शिवाजी पक्की जाणत होता. तेव्हां त्यानें ताबडतोब दिल्लीस वकील पाठविला आणि 'विजापुरकरांकडून बापाची सुटका करविल्यास मी आपली चाकरी करण्यास तयार आहे,' अशी त्यानें शहाजहानास विनंति केली.

शहाजी, शिवाजी ह्यांसारखे सरदार वश झाल्यास दक्षिणेंतील राज्यें हां हां म्हणतां जिंकितां येतील, ह्या धोरणावर शहाजहानानें शिवाजीची विनंति मान्य केली व शहाजीस ताबडतोब मोकळें करण्याविषयीं विजापुरास खलिता पाठविला. अशा प्रकारें विजापूरच्या बादशाहास शह लागतांच त्यानें शहाजीस तात्काळ मोकळें केलें व हुकुमावांचून विजापूर सोडून जाऊं नये असें सांगितलें. तेव्हां 'युक्तींत बळ आहे' असें म्हणतात तें अगदीं खरें होय. शिवाजीनें युक्तीच्या बळावर बापाची सुटका केली.

---

## ११. अफझुलखानाचा वध. ( इ. स. १६५९. )

मुलांनो, कोणताही बिकट प्रसंग येवो त्यावेळीं न डगमगतां त्या प्रसंगास धैर्यानें तोंड देईल तोच खरा शूर होय अशा प्रकारचें शौर्य शिवाजीच्या ठायीं होतें. त्याचें एक उदाहरण असें आहेः—

शहाजीची तळघरांतून सुटका झाल्यावर तो सुमारें चार वर्षें विजापुरांतच होता. पुढें कर्नाटकांत अव्यवस्था झाल्यामुळें

बादशाहानें इ. स. १६५२ साली त्यास त्याच्या पहिल्या हुद्यावर पाठविलें.

ह्या चार वर्षांत शिवाजीनें कांहीं हालचाल केली नव्हती. पण शहाजी कर्नाटकांत जातांच शिवाजीनें जावळी परगणा घेतला आणि कृष्णा नदीच्या उगमाजवळ एका उंच व अवघड ठिकाणीं प्रतापगड नांवाचा किल्ला बांधिला. त्यामुळें बादशाहास फार राग आला. त्यानें शिवाजीच्या बंदोबस्तासाठी अफझुलखान नामें सरदार पाठविला. ह्या सरदाराची शक्ति एवढी मोठी होती कीं, तो लोखंडी पहार वाकवीत असे, असें सांगतात. त्याचा पराक्रमही तसाच मोठा होता. निघतेवेळीं त्यानें दरबारांत अशी प्रतिज्ञा केली कीं, ‘ शिवाजी म्हणजे डोंगरांतला एक क्षुल्लक उंदीर आहे. त्याला हांहां म्हणतां धरून आणितों. ’

खान मोठ्या सैन्यासह निघाला तो वाईस येऊन दाखल झाला. खानासारख्या मातबर सरदाराशीं लढाई करणें आपणास जड जाईल; निदान लढाई करणें झाल्यास अगदीं अवघड जागीं केली पाहिजे, हें शिवाजी पूर्णपणें जाणत होता, म्हणून तो प्रतापगडावर येऊन राहिला.

खानास स्वतांची स्तुति फार आवडते हें शिवाजीस माहीत असल्यामुळें त्यानें वकिलामार्फत खानास अशी विनंति केली कीं, “ मला आपल्यासारख्या मोठ्या सरदाराशीं लढण्यास मुळींच हिंमत नाहीं. मीं बादशाहाचा मोठा गुन्हा केला आहे. ह्या वेळीं आपण मला पदरांत घ्याल तरच माझा बचाव आहे. मी सर्व मुलूख सोडून आपल्या स्वाधीन होण्यास तयार आहे. ”

ह्या मायावी भाषणानें खान बहुत खूष झाला. आतां शिवाजी आपल्या ताब्यांत सहज येणार असें त्यास वाटलें. त्यानें शिवाजीस परत निरोप पाठविला कीं, “ तुमच्या वडि-

लांचा व आमचा स्नेह आहे, तेव्हां तुम्ही आम्हांस कांहीं परके नाहींत. तुम्हांस क्षमा मिळण्यासाठीं आम्ही बादशाहापाशीं रदबदली करूं व वरती एक खाशी जहागीरही मिळवून देऊं."

नंतर खान व शिवाजी ह्यांची समक्ष भेट होण्याचें ठरलें. तेव्हां खान सैन्यासह वाईहून जावळीस आला. शिवाजीनें प्रतापगडाच्या पायथ्याशीं भेटीची जागा तयार केली. येथें येण्यासाठीं खान १५०० लोकांसह निघाला. शिवाजीनें खानाच्या वकिलाशीं पूर्वींच संधान जुळविलें होतें. तेव्हां वकील खानास म्हणाला, 'शिवाजी फार भित्रा आहे, त्यानें इतके लोक पाहिले तर तो भेटीसही येणार नाहीं!' तेव्हां खान सर्व लोकांस तेथेंच ठेवून फक्त एका हत्यारबंद शिपायासह भेटीच्या जागीं आला.

इकडे शिवाजीनें संकेताची खूण होतांच खानाच्या सैन्यावर छापा घालण्याची पूर्ण तयारी करून ठेविली; आणि स्वतांच्या बचावासाठीं आंगांत चिलखत चढवून वरतीं आंगरखा घातला; डोक्यास शिरस्त्राण घालून वरून फेटा गुंडाळला, उजव्या हाताच्या बाहींत बिचवा झांकून घेऊन डाव्या हाताच्या बोटांत वाघनख चढविलें. अशा तयारीनें शिवाजी देवी भवानी व माता जिजाबाई ह्यांस नमस्कार करून निघाला. बरोबर फक्त तानाजी होता.

भेटीच्या जागीं येतांच शिवाजीनें खानाचा हत्यारबंद शिपाई पाहून भ्याल्यासारखें दाखविलें. तेव्हा त्या वकिलाच्या सांगण्यावरून खानानें त्या शिपायासही दूर जाण्यास सांगितलें. नंतर शिवाजी पुढें आला. खान त्यास सामोरा गेला. त्यांचे कुशल प्रश्न होऊन ते दोघे एकमेकांस भेटत असतां त्यांच्यामध्यें झटापट सुरू झाली, व एका क्षणांत खान मरून पडला! ही गोष्ट इ०स० १६५९ त झाली.

खानास मारल्याबद्दल संकेताच्या तोफा होतांच शिवाजीचे लोकांनीं खानाच्या फौजेवर एकदम तुटून पडून तिची अगदीं धुळधाण उडविली! ह्या वेळीं शिवाजीच्या हातीं शत्रूचा मुबलक खजिना व पुष्कळ सामानसुमान लागलें.

---

## १२. सरदार बाजीराव देशपांडे.

मुलांनो, शिवाजीच्या बचावासाठीं ज्या असंख्य वीरपुरुषांनीं आपले प्राण खर्ची घातले अशा पुरुषांमध्यें सरदार बाजीराव देशपांडे याची गणना होते.

बाजीराव हा जातीचा कायस्थ प्रभू. कुलाबा जिल्ह्यांतील पोलादपूर गांवीं ह्याचा जन्म झाला. हा आरंभीं भोर संस्थानांतील हिरडस गांवच्या देशमुखाच्या पदरीं चाकरीस होता. शिवाजीनें जावळी परगणा घेतल्यानंतर हिरडसचा देशमुख व शिवाजी ह्यांच्यामध्यें एक मोठी चकमक झडली, तींत बाजीराव देशमुखाच्या वतीनें मोठ्या शौर्यानें लढला. तें त्याचें शौर्य शिवाजीच्या नजरेस पूर्णपणें आलें होतें. शेवटीं देशमुखाचा पराभव झाल्यावर शिवाजीनें बाजीरावाचा बहुमान करून त्याला आपल्या पदरीं ठेवून घेतलें. ह्यावरून शिवाजी गुणांचा मोठा चाहता होता, हें स्पष्टपणें दिसून येतें.

अफझुलखानाच्या वधानंतर शिवाजीनें विजापुरकरांच्या राज्यांत फारच दंगल उडवून दिली. तेव्हां इ. स. १६६० सालीं बादशाहानें शिवाजीच्या पारिपत्यासाठीं सीदी जोहर नांवाचा सरदार पाठविला. ह्याच्याबरोबर अफझुलखानाचा मुलगा फाजलखान बापाच्या मरणाबद्दल शिवाजीचा सूड घेण्यासाठीं आला होता.

ह्या वेळीं शिवाजीचा मुक्काम पन्हाळगडावर होता, म्हणून सीदी जोहर थेट पन्हाळ्यास येऊन त्यानें किल्ल्यास वेढा

घातला. शिवाजीनें तीन महिनेपर्यंत त्यास दाद दिली नाहीं. पण पुढें बाहेरचें दळणवळण बंद पडल्यामुळें धान्य, वैरण वगैरेची किल्ल्यांत तूट पडली. तेव्हां निरुपाय होऊन शिवाजीनें 'किल्ला स्वाधीन करून देतों व अभयवचन दिल्यास स्वतां किल्ल्याखालीं आपली भेट घेतों' असें खानाशीं बोलणें लाविलें.

नंतर आणा शपथा झाल्यावर त्या दोघांची भेट झाली. तहाच्या मुख्य मुख्य कलमांचा ठराव होऊन संध्याकाळ झाल्यामुळें कांहीं किरकोळ कलमांचा विचार करणें दुसऱ्या दिवसावर टाकून शिवाजी परत किल्ल्यांत आला.

बहुतेक तह ठरला असें जाणून रात्रीं पाहारेकरी बेसावध राहिले. ती संधी साधून मध्यरात्रीच्या सुमारास शिवाजी निवडक मावळे लोकांच्या एका टोळीनिशीं किल्ल्यावरून निसटून रांगणा किल्ल्याकडे चालता झाला. ह्या वेळीं त्याचे-बरोबर बाजीराव होता.

बऱ्याच वेळानें शिवाजी फरारी झाल्याचें वर्तमान शत्रूस समजलें. लागलेंच सीदीचा मुलगा व फाजलखान असे दोघे-जण बरोबर घोडेस्वारांची एक तुकडी घेऊन पाठलागास निघाले. सकाळीं दहा वाजण्याच्या सुमारास शिवाजी रांगणा किल्ल्याचा घाट चढतांना त्यांना दिसला. तेव्हां तर त्यांनीं विशेषच दौड चालविली.

शत्रू जवळ आलेला पाहातांच शिवाजीनें बाजीरावाच्या हाताखालीं बरोबरचे लोक देऊन शत्रूस थोपवून धरण्यासाठीं गडाजवळील खिंडीच्या तोंडाशीं त्यास ठेविलें, आणि सांगि-तलें कीं, 'मी गडावरून तोफांचे पांच अवाज सोडीपर्यंत तुम्हीं शत्रूस वाट देऊं नये.'

बाजीरावानें उत्तर केलें, 'महाराज, आपण निर्धास्त चलावें. मी जिवंत असेपर्यंत शत्रूला एक पाऊलही पुढें सरकूं

देत नाहीं.' नंतर बोलल्याप्रमाणें त्या शूर सरदारानें जिवावर उदार होऊन शत्रूचे चारपांच निकराचे हल्ले मागें परतविले. शेवटीं भर दुपार होऊन कडक उन्ह पडलें आहे अशा वेळीं रक्तानें न्हालेला बाजीराव खिंडीच्या तोंडाशीं मोठ्या उत्सुकतेनें तोफांची वाट पाहात उभा असतां त्याला एक गोळी लागून तो खालीं पडला! आपली कामगिरी पुरी होण्यापूर्वींच आपणास मरण येणार याबद्दल त्या स्वामिनिष्ठ वीरास पराकाष्ठेचें वाईट वाटून तो दुःख करीत आहे तोंच तोफांचे पांच आवाज त्याच्या कानीं पडले. त्यामुळें त्याला मोठा आनंद होऊन 'मीं आपलें कर्तव्य बजाविलें.' असें म्हणून त्यानें प्राण सोडिला!

ह्या स्वामिनिष्ठ सरदाराच्या मृत्यूबद्दल शिवाजी किती तरी हळहळला!

---

## १३. प्राणावर आलें होतें पण बोटावरच निभावलें!

मुलांनो, विजापूरच्या मोठमोठ्या सरदारांची शिवाजीपुढें दाद लागली नाहीं हें तुम्हांस मागील कांहीं गोष्टींवरून समजलेंच आहे. शिवाजीपुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें जाणून विजापूरच्या बादशाहानें इ. स. १६६२ सालीं शिवाजीशीं मैत्रीचा तह केला.

ह्यानंतर शिवाजी दिल्लीच्या औरंगजेब बादशाहाच्या मुलखावर स्वाऱ्या करूं लागला. तेव्हां त्याच्या पारिपत्याकरितां त्या बादशाहानें इ. स. १६६२ सालीं शाहिस्तेखान नांवाचा सरदार पाठविला. ह्या सरदारास शिवाजीनें हांहां म्हणतां फसविलें; त्यावरून शिवाजीचें चातुर्य व धाडस हीं उत्तम प्रकारें दिसून येतात. ती हकीकत अशीः—

शाहिस्तेखान हा औरंगजेब बादशाहाचा मामा. हा औरंगाबादेस सुभेदार होता. बादशाहाचा हुकूम होतांच तो बरोबर मोठी फौज घेऊन अहमदनगरच्या रस्त्यानें निघाला. वाटेंत त्यानें चाकणचा किल्ला घेतला, आणि नंतर तो पुण्यास येऊन शिवाजीच्याच वाड्यांत तळ देऊन राहिला. ह्या वेळीं शिवाजी सिंहगडास होता.

अफझुलखानाप्रमाणें आपला दग्यानें घात करतां येऊं नये म्हणून खानानें पुण्याची नाकेबंदी केली व कोणाही हत्यारबंद मराठ्यास आपल्या परवानगीवांचून शहरांत सोडूं नये अशी सक्त ताकीद दिली.

इतका बंदोबस्त असतांही खानावर छापा घालण्याचा शिवाजीनें बेत केला, व तो तडीस नेण्याकरतां एक सुंदर तोड योजिली; ती तोड अशी:—

प्रथम शिवाजीनें दोन हुशार ब्राह्मण शहरांत पाठवून खानानें केलेल्या व्यवस्थेची बारकाईनें माहिती आणविली; व नंतर खानाच्या फौजेतलि एका मराठे सरदारास वश करून त्याजकडून लग्नाची वरात रात्रीं शहरांत वाजत गाजत नेण्याविषयीं खानाची परवानगी काढविली. इतकी तयारी झाल्यावर शिवाजीनें सिंहगडापासून पुण्य पर्यंत जागोजाग थोडेथोडे लोक ठेविले; आणि पुण्याहून कात्रजकडे जाणाऱ्या रस्त्याला ठिकठिकाणीं झाडांस पोत बांधवून इशारतीचा कर्णा होतांच ते पोत पेटवून देण्याची व्यवस्था करून ठेविली.

इतकी सर्व व्यवस्था झाली, परंतु कोणास नुसता संशयही आला नाहीं. असो. नंतर शिवाजी आपल्या तानाजी, येसाजी वगैरे निवडक पंचवीस लोकांसह त्या रात्रीं त्या वरातीच्या घोळक्यांत जाऊन मिसळला, आणि त्यांच्याबरोबर शहरांत आला. नंतर सर्व सामसूम झाल्यावर ज्या वाड्यांत खान उत-

रला होता त्यांतील सैंपाकघराच्या भिंतीस भोंक पाडून तो कांहीं लोकांसह वाड्यांत शिरला.

घरांत कोणीतरी शिरल्याची चाहूल बायकामाणसांस लागतांच त्यांनीं खानास जागें केलें. खान उठून बसतो इतक्यांत शिवाजी व दुसरे कांहीं लोक नागव्या तरवारींनिशीं त्याच्यापुढें एकदम येऊन उभे राहिले! खानाची गाळणच उडाली. तो खिडकीवाटें कसाबसा निसटून जाऊं लागला तोंच शिवाजीनें त्याजवर केलेला वार निसटता लागून त्याच्या योगानें त्याचें एक बोट मात्र तुटून पडलें! ह्या छाप्यांत खानाचा मुलगा मारला गेला.

शिवाजी तसाच मागें वळून सिंहगडास जाण्यास निघाला. संकेताप्रमाणें कर्णा वाजतांच कात्रजच्या वाटेस दिवट्या पेटल्या. त्या पाहतांच शिवाजीचा पाठलाग करणाऱ्या फौजेस शिवाजी त्या वाटेनेंच जात आहे असें वाटून ती कात्रजकडेच जाऊं लागली. त्यामुळें शिवाजी सुखरूपपणें सिंहगडास गेला!

पुढें कांहीं वेळानें दिवट्या लावण्यांतील कपट त्या फौजेच्या लक्षांत आलें. तेव्हां ती परत फिरून सिंहगडाच्या रोखानें निघाली. परंतु ती सिंहगडाच्या पायथ्याशीं येण्यापूर्वींच शिवाजी गडावर पोहोंचला होता. ती फौज जवळ येतांच किल्ल्यावरून तोफांचा भडिमार चालू झाला. प्रत्यक्ष खानाच्या हत्तीस एक गोळा लागून तो ठार झाला. तेव्हां खान माघारा पुण्यास आला, हें वर्तमान औरंगजेबास समजतांच त्यानें खानास परत बोलाविलें.

---

## १४. मुरारबाजी देशपांडे.

मुलांनो, शिवाजीनें शाहिस्तेखानाची तारांबळ कशी उडविली हें मागील गोष्टीवरून तुम्हांला समजलेंच आहे. त्यानंतर

औरंगजेबानें दिलीरखान नांवाचा सरदार शिवाजीवर पाठ-विला. तो व पुरंदरचा किल्लेदार मुरारबाजी ह्यांचा जो सामना झाला, त्याची हकीकत अशी आहे:—

मुरारबाजी हा जातीचा कायस्थ प्रभू. तो पूर्वी जावळीचे सरदार चंद्रराव मोरे ह्यांच्या पदरीं चाकरीस होता. शिवाजीनें जावळी घेतली त्या वेळीं हा शिवाजीशीं मोठ्या शौर्यानें लढला. तें त्याचें शौर्य पाहून शिवाजीनें त्याचा बहुमान केला व मोठ्या आग्रहानें त्यास आपणाकडे बोलावून त्याला पुरंदरची किल्लेदारी सांगितली.

इ. स. १६६५ सालीं दिलीरखान नर्मदा उतरून पुण्याचे रोखानें दक्षिणेंत आला आणि त्यानें पुरंदर किल्ल्यास वेढा घातला. महाराष्ट्रांतील मजबूत डोंगरी किल्ल्यांपैकीं हा एक किल्ला आहे. किल्ल्यास वरचा व खालचा असे दोन तट आहेत. ह्या वेळीं किल्ल्यावर दारूगोळा व अन्नसामुग्री भरपूर असून निवडक दोन हजार गडकरी होते व त्यांच्यावर मुरार-बाजी मुख्य होता.

दिलीरखान हा सुद्धां कांहीं सामान्य सरदार नव्हता. दिल्लीच्या दरबारांत जे कांहीं पराक्रमी सरदार होते त्यांच्या-पैकींच हा एक होता, म्हणून दिवसानुदिवस बळावत चाल-लेल्या मराठ्यांची पक्की खोड मोडण्यासाठीं बादशाहानें ह्याची नेमणूक केली आणि त्याच्या हाताखालीं लढाईचा सरंजामही उत्तम दिला. असो. दिलीरखानानें मोठा मारा करून किल्ल्याचा खालचा कोट काबीज केला; तेव्हां सर्व मराठेलोक वरच्या कोटांत जाऊन राहिले.

ह्या वेळीं मुसलमान लोकांकडून एक मोठी चूक झाली, तिच्यामुळेंच त्यांचें ह्या वेढ्यांत मोठें नुकसान होऊन शिवाय माघार घ्यावी लागली, ती ही कीं, त्यांनीं खालचा

कोट काबीज करतांच तसाच मारा चालू ठेवून वरचाही कोट घ्यावयास पाहिजे होता, परंतु येथें त्यांना द्रव्यलोभ नडला. लोभाच्या भरीं पडून ते कर्तव्यास चुकले; खालचा तट हातीं येतांच ते लुटालूट करूं लागले. त्यामुळें त्यांची एकजूट होती ती मोडून अव्यवस्था झाली. ही संधि पाहून मुरारबाजीनें वरून गोळ्यांचा असा मारा केला कीं, त्यामुळें शत्रूकडील कांहीं लोक प्राणास मुकून बाकीच्यांस पळून जाणें भाग पडलें. तेव्हां पळणाऱ्या लोकांचा पाठलाग करीत मुरारबाजी दिलीर-खानाच्या गोटापर्यंत गेला.

आपल्या लोकांनी केलेल्या चुकीबद्दल खानास संताप आला होताच, त्यांत मुरारबाजीनें आपल्या सैन्याची अशी दाणादाण उडविलेली पाहून त्यास फारच त्वेष चढला. त्या आवेशांत तो आपल्या सर्व फौजेनिशीं मराठ्यांवर चालून गेला. त्या वेळीं त्या उभय सैन्यांमधें जी खडाजंगी उडाली तिचें काय वर्णन करावें! दोन्हीं सैन्यें हट्टास पेटलेलीं, तेव्हां लढाई फारच निकराची झाली. मराठ्यांकडील बरेच लोक पडले. शत्रूचाही बराच नाश झाला. सर्व रणांगण घायाळांचा आक्रोश व वीरांचें वीरश्रीचें भाषण यांनीं गजबजून गेलें होतें. मुरारबाजी तर जिवावर उदार होऊन लढत होता. स्वतः त्याची ढाल तुटली तेव्हां तो शूर गडी हातास शेला गुंडाळून त्यावर शत्रूंच्या तरवारीचे घांव झेलूं लागला! अशा प्रकारें बराच वेळ हातघाईची लढाई चालू असतां मुरारबाजीचें शीर तुटून खालीं पडलें. पण असें सांगतात कीं, ‘ त्या वेळीं मुरारबाजीस लढाईचें स्फुरण इतकें चढलें होतें कीं, त्याचें शीर गळून पडलें तरी त्याच्या धडानेंच तीनशें लोकांस ठार केलें! ’ रणांतला त्या वेळचा तो देखावा किती भयंकर असेल!

मुरारबाजी पडला तरी त्याच्या लोकांनीं किल्ला शत्रूच्या हातीं जाऊं दिला नाहीं. शेवटीं दिलीरखान निघून गेला.

मुरारबाजीसारखे स्वामिनिष्ठ लोक शिवाजीच्या पदरीं होते म्हणूनच राज्यस्थापनेचें अवघड काम त्याजकडून पार पडलें.

---

## १५. जशास तसें.

मुलांनो, औरंगजेब बादशाहाच्या दोघां सरदारांस शिवाजीनें दाद दिली नाहीं, हें मागील गोष्टींवरून तुम्हांस कळून चुकलें आहेच. परंतु एवढ्यानें बादशाह स्वस्थ बसणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्याचें सामर्थ्य मोठें असल्यामुळें, तो चिरडीस जाऊन फार मोठें सैन्य पाठवील, तेव्हां त्याशीं सतत लढण्याचें सामर्थ्य आपल्या आंगीं तूर्त नाहीं; ही गोष्ट शिवाजी पक्केपणीं जाणून होता. म्हणून त्यानें बादशाहाचा रजपूत सरदार जयसिंग ह्याच्यामार्फत इ. स. १६६६ सालीं तह केला, आणि पुरंदर, सिंहगड इत्यादि वीस किल्ले व त्यांच्याभोंवताळचा मुलूख मिळून सुमारें चाळीस लक्षांचा प्रदेश बादशाहाचे स्वाधीन केला.

ह्या तहामुळें शिवाजी औरंगजेबाच्या पदरचा एक सरदार बनला. पुढें लागलीच जयसिंगानें शिवाजीस मदतीस घेऊन विजापुरकरांवर स्वारी केली. त्या वेळीं शिवाजीनें जयसिंगास चांगली मदत केली, म्हणून त्यानें बादशाहास पत्र लिहून त्यांत शिवाजीच्या पराक्रमाचें वर्णन केलें. त्यामुळें बादशाह खूष होऊन त्यानें शिवाजीस आपल्या भेटीसाठीं दिल्लीस बोलाविलें.

बादशाहावर विश्वास ठेऊन त्याच्या भेटीस जाण्याचें धैर्य शिवाजीस होईना. पण जयसिंगाच्या आग्रहावरून शेवटीं तो जाण्यास निघाला. त्यानें आपणाबरोबर आपला पुत्र संभाजी आणि तानाजी, हिरोजी आदिकरून हजार पंधराशें लोक

घेतले; आणि तो मजल दरमजल इ. स. १६६६ त दिल्लीस जाऊन पोहोंचला.

दिल्लीस पोहोंल्यावर शिवाजी संभाजीसह दरबारांत बादशहाच्या भेटीसाठीं गेला. पण बादशाहानें त्याचा योग्य मानमरातब न ठेवितां त्यास चौथ्या पांचव्या दर्जाच्या सरदारांत उभे राहण्यास सांगितलें. ही गोष्ट त्या पाणीदार पुरुषास कशी सहन होणार? त्याला फार राग आला, आणि तो रागाच्या आवेशांत तसाच दरबारांतून निघून गेला !

शिवाजीच्या ह्या बाणेदारपणामुळें बादशाहास राग आला. त्यानें शिवाजीस हुकुमावांचून पुनः दरबारांत येण्याची मनाई केली आणि त्याच्या गोटाभोंवतीं सक्त पहारा ठेविला. परंतु शिवाजी त्यांतूनही मोठ्या युक्तीनें 'जशास तसें' वागून पार पडला. तो प्रकार असाः—

प्रथम त्यानें आपल्या लोकांस येथील हवा मानवत नाहीं, ह्या सबबीवर बादशाहाच्या परवानगीनें बहुतेक लोक पुण्यास पाठविले; आणि अगदीं निवडक असे थोडे लोक जवळ ठेविलें. नंतर तो बड्या बड्या अमीरउमरावांच्या भेटीस वारंवार जाऊं लागला, आणि मोठमोठ्या पेटाऱ्यांतून त्यांजकडे मेवामिठाई पाठवूं लागला. पहिल्यानें पहारेकरी पेटाऱ्यांत काय आहे तें पाहात, पण पुढें ते पाहीतनासे झाले.

हा प्रकार कांहीं दिवस चालल्यानंतर शिवाजीच्या जवळचे लोक कांहींना कांहीं बहाणा करून त्याला सोडून निघाले व गांवांत वेष पालटून राहिले. गोटांत शिवाजी, संभाजी व हिरोजी असे तिघेच कायते राहिले. नंतर शिवाजीनें प्रकृति बिघडल्याचें ढोंग केलें. हिरोजी बाहेरून कोणाचें औषध आणून देऊं लागला. ह्या स्थितींत कांहीं काळ लोटल्यावर एक दिवस संध्याकाळीं हिरोजीस मागें ठेवून ते बापलेक मिठाईच्या पेटाऱ्यांत

बसून गांवाबाहेर एका ठरलेल्या जागीं गेले. तेथें त्यांचे लोक तयार होतेच. त्या सर्वांसह शिवाजी मथुरेस गेला; तेथें एका विश्वासू गृहस्थाचे घरीं संभाजीस ठेवून तो बैराग्याचे वेषानें काशी, प्रयाग, गया, जगन्नाथ इत्यादि तीर्थें करीत करीत पुण्यास आला. नंतर संभाजीलाही त्यानें दक्षिणेंत आणिलें.

मागें हिरोजी ती रात्र व दुसऱ्या दिवशीं प्रहर दिवस येई-पर्यंत शिवाजीच्या आंथरुणावर डोक्यावरून पांघरूण घेऊन पडून राहिला; जवळ एक लहान मुलगा पाय चुरीत बसविला होताच! त्यामुळें शिवाजी फरारी झाल्याबद्दल कोणालाही शंका आली नाहीं. दहा वाजण्याच्या सुमारास हिरोजी नेहमींप्रमाणें 'औषध आणण्यासाठीं बाहेर जातों' असें पहारेकऱ्यास सांगून गेला तो गेला!

दुपारानंतर, आज आंत माणसांची कांहींच हालचाल दिसत नाहीं, म्हणून पहारेकरी तपास करितात तों शिवाजी पळून गेल्याचें कळून आलें.ही गोष्ट बादशाहाचे कानीं जातांच शिवा-जीच्या शोधासाठीं त्यानें चारी दिशांस स्वार पाठविले. परंतु कोणासही त्याचा पत्ता लागला नाहीं.

---

## १६. गड आला पण सिंह गेला.

मुलांनो, शिवाजी दिल्लीहून कोणत्या प्रकारें निसटून आला हें तुम्हांस मागील गोष्टीवरून कळलें आहेच. शिवाजीच्या गैरहजेरींत राज्यव्यवस्थेच्या कामांत त्याच्या लोकांनीं केस-भरही कमीपणा पडूं दिला नाहीं. उलट, औरंगजेब बादशाहा-बरोबर झालेल्या तहामुळें जो मुलूख कमी झाला होता तो परत घेण्याला शिवाजीचा पेशवा मोरोपंत पिंगळे व घोडे-स्वारावरील अधिपति नेताजी पालकर यानीं सुरवात केली होती. शिवाजी परत आल्यावर हा प्रयत्न विशेष नेटानें सुरू

झाला. आतां पुरंदर आणि सिंहगड हे दोनच किल्ले कायते बादशाहाकडे राहिले होते. त्यांपैकीं सिंहगड किल्ला सर करण्यासाठीं शिवाजीनें आपला जिवलग मित्र तानाजी मालुसरे यास इ.स. १६७० मध्यें पाठविलें. किल्ला घेतेवेळी उभयपक्षांचे सरदार मोठ्या शौर्यानें लढले. तो प्रकार असाः—

ह्या वेळीं सिंहगडास उदेभान नांवाचा रजपूत किल्लेदार होता. हा किल्लेदार फार बलवान व शूर होता. शिवाय तो बादशाहाचा एकनिष्ठ नोकर असून त्यांचे हाताखालीं कडवे रजपूत शिपाई होते. तेव्हां अशा मातबर सरदाराशीं सामना करण्यासाठीं शिवाजीनें तानाजीसारख्या निधड्या छातीच्या मनुष्याची नेमणूक केली हें अगदीं योग्य होतें.

तानाजी बरोबर एक हजार निवडक मावळे लोक घेऊन निघाला. सिंहगड किल्ला मजबूत असून त्याजवरील सरंजामही उत्तम आहे, हें तानाजी पक्कें ओळखून होता. तेव्हां शत्रू गैरसावध असतांनाच जर आपण हल्ला केला तर यश येण्याचा जास्त संभव आहे, असें जाणून तानाजी आपल्या लोकांसह प्रहर रात्रीच्या सुमारास किल्ल्याच्या नैर्ऋत्येकडील भागाच्या पायथ्याशीं आला. किल्ल्याची हीं बाजू भिंतीवजा असल्यामुळें चढण्यास फारच अवघड होती. त्यामुळें त्या बाजूनें शत्रूचा हल्ला होण्याचा संभव नाहीं, म्हणून तिकडे फारसा बंदोबस्तही नव्हता.

परंतु ज्या गोष्टीचा संभव नाहीं असें आपणास वाटतें त्या गोष्टी आपल्या देखत घडतांना आपणास पुष्कळ वेळां आढळून येतें. असो. तानाजीनें पांचपांचशें लोकांच्या दोन टोळ्या करून एक आपल्या हाताखालीं घेतली व दुसरी आपला भाऊ सूर्याजी ह्याच्या हाताखालीं दिली. नंतर तानाजीच्या टोळी-

पैकीं एक मनुष्य घोरपडीच्या साह्यानें तो तीस हात उंचीचा सरळ उंच कडा चढून किल्ल्यावर गेला, आणि त्यानें वरतीं जमिनींत मेखा टाकून दोर खालीं सोडिला. लागलीच त्या दोरावरून तानाजीसह पहिली टोळी वर गेली. इतक्यांत किल्ल्यांत गस्त घालणाऱ्या शिपायांस ह्या टोळीची चाहूल लागून त्यांनीं दगा असल्याचा पुकारा केला. तेव्हां एका दमाच्या एक हजार रजपूत शिपायांसह उदेभान युद्धास निघाला. लागलीच उभय पक्षांत खडाजंगीची लढाई सुरू झाली. खुद्द तानाजी व उदेभान यांची गांठ पडून त्या उभयतांचें बराच वेळपर्यंत युद्ध होऊन शेवटीं त्यांत तानाजी पडला !

तानाजी पडतांच मराठे लोक कचरले व माघार घेऊं लागले. पण ह्याच वेळीं सूर्याजी आपल्या टोळीसह किल्ल्यावर आला. आपल्या लोकांस पळतांना पाहून तो आवेशानें पुढें सरून बोलला, ' मूर्खांनो, तुम्हांस बापापेक्षांही आवडत्या अशा तानाजीरावाचें प्रेत येथेंच टाकून आणि त्यानें हातीं घेतलेलें काम पुरें करावयाचें सोडून असें भागुबाईसारखे पळता कोठें? शत्रूनें त्याचें प्रेत कोल्ह्याकुत्र्यांपुढें फेंकून दिलें तर तुम्हांस रुचेल काय ? शिवाय, तुम्ही जाणार कोठें ? कड्यावरून खालीं उड्या टाकून मरून जाणार ? कारण मीं दोर तर केव्हांच कापून टाकला आहे. तर मर्दहो मागें फिरा. लढतां लढतां मेला तरी नांवलौकिक मिळवाल. ' हें आवेशाचें भाषण ऐकताच व सूर्याजीसारखा नायक मिळतांच मावळ्यांना स्फुरण चढलें. ते चवताळून मागें फिरले, आणि त्यांनीं रजपुतांवर तानाजीबद्दल सूड उगविला. सूर्याजीनें किल्ला सर करून किल्ल्यावर मराठ्यांचें निशाण फडकाविलें.

ही पहाटेची वेळ होती; सूर्याजीनें एक मोठा जाळ करून संकेताप्रमाणें किल्ला सर केल्याची इशारत शिवाजीस दिली.

तेव्हां शिवाजीस मोठा आनंद झाला. पण दुसऱ्या दिवशीं आपला उजवा हात तानाजी पडला असें कळतांच तो फार कष्टी होऊन ' गड आला पण सिंह गेला ' असें म्हणाला.

---

## १९. राज्याभिषेक व राज्यव्यवस्था.

मुलांनो, मागील गोष्टींत वर्णन केल्याप्रमाणें शिवाजीनें पंचवीसतीस वर्षं सतत उद्योग करून महाराष्ट्राचा बराच भाग आपल्या ताब्यांत आणिला. नंतर त्यानें आपणास रायगड किल्ल्यावर तारीख ६ जून सन १६७४ रोजीं राज्याभिषेक करून घेतला. ह्या वेळेपासून पुढें कांहीं वर्षं रायगड किल्ला मराठ्यांच्या राजधानीचें ठिकाण होतें. राज्याभिषेकाचा विधि करण्यासाठीं त्यानें मुद्दाम काशीहून गागाभट्ट नांवाच्या विद्वान् ब्राह्मणास बोलावून आणिलें होतें. हा समारंभ साजरा करण्यासाठीं मोठमोठे सरदार, मानकरी, शास्त्री, पंडित, शेटसावकार, भटभिक्षुक इत्यादिकांचा मोठा जमाव रायगडावर जमला होता. ह्या वेळीं शिवाजीनें आपली सुवर्णतुला करून, म्हणजे आपल्या वजनाइतके सोन्याचे होन ( १६००० ) घेऊन, ते ब्राह्मणांस वांटून दिले. ह्याशिवाय गोरगरिबांस दानधर्मही बहुत केला. जिनें शिवाजीस लहानाचें मोठें केलें त्या जिजाबाईला शिवाजीच्या मस्तकावर छत्रचामरें पाहून किती आनंद झाला असेल ! पण हें सुख अनुभविण्यास ती भाग्यवान् स्त्री पुढें फार दिवस जगली नाहीं ! ह्या समारंभानंतर ती फक्त पंधरा दिवसांनींच मरण पावली !

शिवाजीनें आपला राज्यकारभार चालविण्यासाठीं आठ प्रधान नेमिले होते. राज्याभिषेकसमयीं जे प्रधान कारभार करीत होते त्यांचे हुद्दे व इतर माहिती पुढील कोष्टकावरून सहज कळेल.

| | हुद्दा. | पगार(होन). | काम. |
|---|---|---|---|
| १ | पंत प्रधान. | १५००० | सर्व कामांवर देखरेख. |
| २ | पंत अमात्य. | १२००० | राज्याची जमाबंदी. |
| ३ | पंत सचीव. | १०००० | दप्तरदारी व बारनिशी. |
| ४ | मंत्री. | ,, ,, | राजाचा खाजगी कारभार. |
| ५ | सेनापति. | ,, ,, | सैन्याची व्यवस्था. |
| ६ | सुमंत. | ,, ,, | परराज्यांशीं वकिली. |
| ७ | न्यायाधीश. | ,, ,, | न्याय करणें. |
| ८ | पंडितराव. | ,, ,, | शास्त्रार्थ सांगणें. |

वर सांगितलेल्या आठ प्रधानांपैकीं पहिले चार राजाच्या सिंहासनाच्या उजव्या बाजूस क्रमानें एकाखालीं एक बसत व राहिलेले चार डाव्या बाजूस त्याचप्रमाणें बसत.

शिवाजीच्या राज्याची बळकटी मुख्यत्वें त्याच्या किल्ल्यांवर होती. किल्ल्यांचे प्रकार तीन. १ डोंगरी, २ भुईकोट, ३ दुर्ग किंवा जंजिरा. किल्ल्यांवरील मुख्य अधिकाऱ्यास किल्लेदार असें नांव असे. प्रत्येक किल्ल्यावर दाणावैरण व दारूगोळा भरपूर ठेवण्याकडे शिवाजी नेहमीं विशेष लक्ष देत असे.

शिवाजीनें आपल्या लष्कराचा बंदोबस्त उत्तम ठेविला होता. लष्कराचे पायदळ व घोडेस्वार असे दोन प्रकार असत. पायदळांतील शिपाई मावळे व हेटकरी ह्या दोन जातीचे असत. घाटमाथ्यावर राहणारे ते मावळे व कोंकणांत राहणारे

ते हेटकरी. स्वारांमध्यें शिलेदार व बारगीर असे दोन प्रकार होते. शिलेदार म्हणजे घोडा व हत्यार स्वतांचें बाळगून चाकरी करणारे आणि बारगीर म्हणजे तीं दोन्हीं सरकारांतून घेऊन चाकरी करणारे. शिवाजी आपल्या सर्व लहानमोठ्या नोकरांस हल्लींप्रमाणें उक्ता पगार देत असे; मुशाहिऱ्याबद्दल जमीन तोडून देत नसे. शिवाजीच्या राज्याचें उत्पन्न सुमारें ९० लाख रुपये होतें.

अशा प्रकारच्या व्यवस्थित राज्याची स्थापना करून शिवाजी गुडघी नांवाचा रोग होऊन ता. ५ एप्रिल सन १६८० रोजीं मरण पावला. ह्याच्या आंगीं शौर्य, प्रसंगावधान, धारिष्ट, धर्मनिष्ठा, स्वदेशप्रीति, न्यायबुद्धि इत्यादि गुण पूर्णपणें वास करीत होते. ह्याला संभाजी व राजाराम असे दोन मुलगे होते. ह्या दोन मुलांमध्यें सावत्र बंधूंचें नातें होतें. शिवाजीच्या मागें वडील पुत्र संभाजी गादीवर बसला.

---

## १८. औरंगजेबाची दक्षिणेंत स्वारी ( इ. स १६८३ )

मुलांनो, अकबरापासून दिल्लीच्या मोंगल बादशाहांचा डोळा दक्षिण हिंदुस्तानावर होता, हें तुम्हांस मागील कांहीं गोष्टींवरून समजलें आहेच. औरंगजेब बादशाहानें तर दक्षिण काबीज करण्याच्या इराद्यानें पुष्कळ सरदार पाठवून पाहिले; पण त्यांचा विशेष उपयोग झाला नाहीं. तेव्हां इ० स० १६८३ सालीं तो स्वतः बरोबर अफाट सैन्य घेऊन दक्षिणेंत चाल करून आला.



औरंगजेब.

ह्या स्वारीचा थाट मोठा अपूर्व होता; सैन्यांतील लोक शरिरानें धिप्पाड व दांडगे होते. त्यांच्यापुढें मराठे लोक मुलांसारखे दिसत. ते लोक आंगांत चिलखतें चढवून वरून रूदार आंगरखे घालीत असत. बंदुका व तीरकमठे हीं त्यांचीं मुख्य हत्यारें असत. स्वारांचे घोडेही उंच व पुष्ट होते. सैन्या-बरोबर तोफा व लढाऊ हत्ती पुष्कळ होते. मोठमोठे व सुंदर असे तंबू, शोभेचे व ऐषआरामाचे पदार्थ ह्यांची अगदीं रेलचेल होती. एका मुक्कामाहून दुसऱ्या मुक्कामास जातांना तेथें कोणतीही गैरसोय अगर धांदल होऊं नये म्हणून सर्व सामान दुहेरी होतें. ह्या स्वारीचा तळ पाहिला म्हणजे एकाद्या सुंदर शहराचा भास होत असे.

अशा प्रकारच्या सरंजामानिशीं औरंगजेब बऱ्हाणपुरास

आला व तेथें कांहीं दिवस मुकाम करून राहिला. ह्या वेळीं दक्षिणेंत मराठे, आणि विजापूर व गोवळकोंडा येथील मुसलमान बादशाह असे तिघे सत्ताधारी होते. मराठ्यांचा राजा शिवाजी हा नुकताच मरण पावला होता. तेव्हां आतां मराठ्यांना तेव्हांच जीत करितां येईल असें जाणून औरंगजेबानें प्रथम मराठ्यांवर शस्त्र धरिलें. परंतु शिवाजीचा मुलगा संभाजी त्याच्याशीं इतक्या शौर्यानें लढला कीं, शिवाजीच्या मरणाबरोबर मराठ्यांचें तेज लोपलें नसून त्याचा मुलगाही तसाच पाणीदार आहे, असें बादशाहास कळून आलें; तेव्हां तो कांहीं दिवस मराठ्यांचा नाद सोडून विजापूर व गोंवळकोंडा येथील राज्यांकडे वळला.

मोंगल सरदार व मराठेलोक ह्यांच्या अनेक स्वाऱ्यांमुळें त्या दोन्ही राज्यांमध्यें कांहींच त्राण राहिलें नव्हतें. त्यामुळें औरंगजेबानें तीं दोन्हीं राज्यें अनुक्रमें इ. स. १६८६ व १६८७ सालीं सहज घेतली.

दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें घेतल्यावर औरंगजेब पुन्हां मराठ्यांकडे वळला. संभाजीनेंही त्याजबरोबर नेटानें लढाई चालविली, पण बादशाहाचें सामर्थ्य मोठें असल्यामुळें संभाजीला त्याच्याशीं उघड्या मैदानांत लढतां येईना. म्हणून औरंगजेबानें त्याचा बराच मैदानी मुलुख घेतला. तथापि त्याच्या डोंगरी किल्ल्यांशीं त्याचें कांहींच शहाणपण चालेना. इतक्यांत बादशाहाच्या सैन्यामध्यें सांथ उत्पन्न झाल्यामुळें तो अकलूज येथें जाऊन राहिला.

औरंगजेब तळ देऊन बसला असें पाहतांच त्यानें नुकत्याच काबीज केलेल्या मुलखांत मराठ्यांनीं चांगलाच धुमाकूळ मांडिला. तेव्हां त्यानें त्यांच्या बंदोबस्तासाठीं कांहीं सैन्य नाशकाकडे व कांहीं कोल्हापुराकडे पाठविलें. कोल्हापुराकडे गेलेल्या

सैन्यावर तकरीबखान नांवाचा सरदार मुख्य होता. खान कोल्हापुरानजीक पन्हाळ्यास असतां त्याला समजलें कीं, संभाजी थोडक्या लोकांनिशीं संगमेश्वरीं राहिला आहे. त्यावरून त्यानें कांहीं निवडक लोक बरोबर घेऊन संभाजीवर अचानक छापा घातला व त्यास कैद केलें.

ह्या वेळीं औरंगजेब तुळापुरास होता त्याठिकाणीं संभाजीला आणिल्यावर बादशाहानें त्यास सांगून पाठविलें कीं, 'जर तूं मुसलमान होशील तर तुला जीवदान मिळेल.' ह्यावर संभाजीनें बादशाहास, "जर आपण आपली मुलगी मला देत असाल तर मी मुसलमान होतो" असें अपमानकारक उत्तर पाठवून हजरत महंमद पैगंबर यांची निंदा केली. ह्या गोष्टीमुळें धर्माभिमानी औरंगजेब बादशाहास राग येऊन त्यानें संभाजीला इ.स. १६८९त हालहाल करून ठार मारविलें; आणि त्याची बायको येसूबाई व मुलगा शिवाजी ह्यांस पकडण्यासाठीं रायगडावर सैन्य पाठविलें.

---

## १९. स्वामिनिष्ठ खंडो बल्लाळ चिटणीस.

शिवाजीमहाराजांनीं मोठ्या प्रयासानें मराठी राज्याचा रचलेला पाया खचून जाण्याची वेळ आली असतां तो सांवरून धरण्याच्या कामीं ज्या पुरुषांनीं आपल्या प्राणांचीही पर्वा केली नाहीं अशा पुरुषांमध्यें खंडो बल्लाळ यांची गणना प्रमुखपणें होते. त्यानें आपल्या धैर्याची व स्वामिनिष्ठेची एका खडतर प्रसंगीं कमाल केली. तो प्रसंग असा:—

मोंगल सरदार झुल्फिकारखान यानें रायगडास वेढा घातला असतां तो कमकुवत व्हावा म्हणून धनाजी जाधव, संताजी घोरपडे वगैरे सरदारांनीं बादशाहाच्या फौजेवर चोहींकडून छापा घालून तीस पुरेपुरेंसें करून टाकिलें, इतक्यांत सूर्याजी

पिसाळ नांवाच्या जमादाराच्या दगलबाजीमुळें रायगड किल्ला आणि येसूबाई व शिवाजी शत्रूच्या हातीं लागल्याची दुःखकारक बातमी आली! रायगडाच्या मागोमाग पन्हाळा व मिरज हे दोन किल्ले मोंगलांनीं सर करून आपला मोर्चा विशाळगडाकडे फिरविल्याची खबर आली. ह्यावेळीं राजाराम विशाळगडास होता.

परंतु केवढाही बिकट प्रसंग आला तरी गडबडून न जातां त्यांतून सुटण्यासाठीं धैर्यानें एखादी तोड काढणें हें थोर पुरुषाचें मुख्य लक्षण आहे, असें जाणून सर्व प्रमुख मुत्सद्दी व सरदार विशाळगडास जमले. तेथें सर्वांच्या मतें असें ठरलें कीं, तूर्त मोंगलांनीं महाराष्ट्र व्यापिलें असल्यामुळें राजारामासह बहुतेक मुख्य मुख्य माणसांनीं कर्नाटकांत जावें आणि मागील बंदोबस्त पंतअमात्य रामचंद्रपंत बावडेकर ह्यांनीं ठेवावा.

ठरल्याप्रमाणें राजाराम, संताजी, धनाजी, खंडो बल्लाळ, प्रल्हाद निराजी वगैरे पंचवीस लोक लिंगाईत यात्रेकरूंच्या वेषानें निघाले. पुढें लवकरच राजाराम वगैरे मंडळी महाराष्ट्रांतून पळून गेल्याची बातमी बादशाहास समजली. तेव्हां त्यानें आपल्या जागोजागच्या ठाणेदारांस ताबडतोब पत्रें पाठवून ह्या लोकांस पकडण्याचा हुकूम केला.

बंगलोर शहरीं धर्मशाळेंत ह्या मंडळीचा मुक्काम असतां राजारामाचे पाय एक नोकर धुवूं लागला. तें पाहतांच भोंवतालच्या लोकांस त्यांचा संशय येऊन ते आपसांत कुजबुजूं लागले कीं, 'हे गरीब यात्रेकरू दिसतात, पण पाय धुवून घेणारा हा कोणी तरी थोर माणूस असून कांहीं कारणानें ह्यानें यात्रेकरूचें सोंग घेतलें असावें.'

ही लोकांची कुजबुज व संशयित मुद्रा चाणाक्ष खंडो बल्लाळाचे लक्षांत आली. तेव्हां आतां येथें एक क्षणही थांबणें सुरक्षित नाहीं असें जाणून संताजी, धनाजी व खंडेराव दाभाडे

थांसह राजाराम एका मार्गानें आणि प्रल्हादपंत व दुसरे कांहीं निराळयाच मार्गानें तेथून चालते झाले; खंडो बल्लाळ मात्र बाकीच्या लोकांसह तथेंच राहिला.

पाय धुण्यासंबंधाची खबर थोड्याच वेळांत ठाणेदारास समजली. लागलाच तो शिपाई बरोबर घेऊन तेथें आला. त्यानें खंडो बल्लाळास ' तूं कोण, कोठून आलास ? ' असें दरडावून विचारिलें. ' आम्ही सर्वजण यात्रेकरू असून रामेश्वरास जात आहों. ' असें चिटणिसानें शांतपणें उत्तर दिलें. परंतु या उत्तरानें ठाणेदाराचें समाधान न होतां त्यानें खंडोपंत व इतर लोक ह्यांस पुष्कळ मारहाण केली. तीनचार दिवस अंधारकोठडींत उपाशी कोंडून ठेविलें, शेवटीं त्यानें राखेचे तोबरेही दिले ! तथापि त्यांचा निश्चय रतीभरही ढळला नाहीं. स्वामिकार्यासाठीं प्रसंग पडल्यास मरूनही जावयाचें पण त्याला अपाय म्हणून करावयाचा नाहीं, असा त्यांचा पक्का निर्धार होता.

कितीही हाल केले तथापि ह्यांच्या बोलण्यांत फरक पडत नाहीं; तेव्हां हे खरोखरच यात्रेकरू असावे असें ठाणेदारास वाटून त्यानें सर्वांस सोडून दिलें. नंतर तें सर्वजण संकेताप्रमाणें जिंजीस गोळा झाले. आणि तेथें त्यांनीं मराठी राज्याची गादी स्थापून, संभाजीचा मुलगा शिवाजी बादशाहाच्या कैदेंत असल्यामुळ राजारामास इ० स० १६९१ सालीं राज्याभिषेक केला.

---

## २०. आपसांत फूट झाली ! ( इ० स० १७०८ ).

मुलांनो, मागील गोष्टींत सांगितलेलें जिंजीकडील वर्तमान बादशाहास समजतांच त्यानें झुल्फिकारखानास तिकडे पाठविलें. खान जिंजीस येऊन किल्ल्याास वेढा देऊन बसला. वेढ्याचें काम पांच वर्षे चालू होतें. शेवटीं इ० स० १६९८ सालीं खानानें तो किल्ला घेतला. परंतु त्यापूर्वींच राजाराम चोरवाटेनें

किल्ल्यांतून निसटून महाराष्ट्रांत आला होता. पुढें एकदोन वर्षें महाराष्ट्रांत धामधूम चालली होती. मराठ्यांनीं बाद-शाहाच्या फौजेवर गनिमी काव्यानें हल्ले करून तिला अगदीं सतावून सोडलें होतें. इतक्यांत इ० स० १७०० सालीं राजाराम सिंहगड येथें एकाएकीं तापानें मरण पावला.

राजारामाच्या अकालिक मृत्यूमुळेंही मराठ्यांचें पाऊल मागें पडलें नाहीं, कारण त्याची बायको ताराबाई ही मोठी धैर्याची व राजकारस्थानी स्त्री होती. तिनें आपला पुत्र शिवाजी यास गादीवर बसवून मोंगलांशीं निकरानें तोंड देण्याचें काम पूर्ववत् चालू केलें. ह्या वेळीं मराठ्यांनीं अशी पद्धत ठेविली होती कीं, विशेष त्रास पडल्याशिवाय किल्ला जितका वेळ लढवितां येईल तितका वेळ लढवावा, तितक्या वेळांत शत्रूचें होईल तितकें नुकसान करावें, अगदीं हातघाईवर आलें म्हणजे किल्ला सोडून चोरवाटेनें निघून जावें, आणि एकदां बादशाहाचें मुख्य सैन्य तेथून निघून गेलें म्हणजे पुन्हां तो किल्ला काबीज करावा. शिवाय किल्ल्याबाहेरील मराठ्यांनीं टोळ्याटोळ्यांनीं बादशाहाच्या छावणीभोंवतालीं घिरट्या घालून त्याचें सामान-सुमान लांबवावें किंवा बाहेरून येणारी दाणावैरण लुटावी.

अशा प्रकारची स्थिति इ० स० १७०७ पर्यंत चालू होती. ह्या वर्षीं औरंगजेब बादशाह अहमदनगर येथें मरण पावला. तंतर मोंगल सैन्य महाराष्ट्र सोडून दिल्लीस गेलें; आणि ज्या जुटीमुळें मराठेलोक एवढ्या नेटानें बादशाहाच्या सरदारांशीं टक्कर देत होते ती जूट मोडून आपापसांत फूट झाली; तो प्रकार असा:—

औरंगजेब मरण पावला तेव्हां त्याचा अजिमशाह नांवाचा एक मुलगा त्याजबरोबर होता. तो आपणास राज्य मिळावें म्हणून आपल्या भावाशीं लढण्यासाठीं दिल्लीकडे निघाला.

त्याच्याबरोबर शाहू ( संभाजीचा मुलगा शिवाजी ह्यास बाद-शाह शाहू म्हणे ) व येसूबाई हीं होतीं. अजिमशाह नर्मदा उतरून जातो न जातो तोंच मागें मराठ्यांनीं फार उचल केली. तेव्हां शाहू व ताराबाई ह्यांचे गादीबद्दल आपसांत तंटे लागून मराठ्यांची शक्ति कमी व्हावी म्हणून झुल्फिकार-खानाच्या सल्ल्यानें अजिमशाहानें शाहूस मराठ्यांचा राजा कबूल करून सोडून दिलें; व त्यानें आपल्याविरुद्ध वागूं नये म्हणून येसूबाईला मात्र आपल्या ताब्यांत ठेविलें.

शाहू मोकळा होतांच तो दक्षिणेंत यावयास निघाला. वाटेंत त्याला कित्येक मराठे सरदार येऊन मिळाले. त्यानें ताराबाईस पत्र पाठवून आपण येत असल्याचें कळविलें; परंतु तिला राज्य पाहिजे असल्यामुळें शाहूचें येणें तिला बरें वाटलें नाहीं. म्हणून तिनें 'हा खरा शाहू नव्हे, कोणी तरी तोतया आहे,' अशी हूल उठवून त्याच्या पारिपत्यासाठीं खंडो बल्लाळ, सेनापति धनाजी जाधव व प्रतिनिधि परशुराम त्र्यंबक यांस सैन्यासह पाठविलें.

पुणें जिल्ह्यांतील खेडाजवळ उभय पक्षांची गांठ पडली. शाहू वडील घराण्यांतला असल्यामुळें तोच राज्याचा खरा मालक असें जाणून खंडो बल्लाळ व धनाजी जाधव त्याला जाऊन मिळाले. प्रतिनिधि तसें करीना, म्हणून त्याशीं शाहूनें लढाई केली. तींत शाहूचा जय झाला. नंतर ताराबाईशीं लढून त्यानें सातारा घेतला. तेव्हां इ. स. १७०८ मध्यें सातारा येथें शाहूस राज्याभिषेक झाला.

ताराबाईस कांहीं लोक अनुकूल होतेच. त्यांच्या साह्यानें तिनें बरीच धडपड केली, पण कांहीं जमेना. तेव्हां तिनें इ. स. १७०८ त कोल्हापुरास नवीन राज्याची स्थापना करून आपला मुलगा शिवाजी ह्यास तेथें राज्याभिषेक करविला. हाच

किल्ल्यांतून निसटून महाराष्ट्रांत आला होता. पुढें एकदोन वर्षें महाराष्ट्रांत धामधूम चालली होती. मराठ्यांनीं बाद-शाहाच्या फौजेवर गनिमी काव्यानें हल्ले करून तिला अगदीं सतावून सोडलें होतें. इतक्यांत इ० स० १७०० सालीं राजाराम सिंहगड येथें एकाएकीं तापानें मरण पावला.

राजारामाच्या अकालिक मृत्यूमुळेंही मराठ्यांचें पाऊल मागें पडलें नाहीं, कारण त्याची बायको ताराबाई ही मोठी धैर्याची व राजकारस्थानी स्त्री होती. तिनें आपला पुत्र शिवाजी यास गादीवर बसवून मोंगलांशीं निकरानें तोंड देण्याचें काम पूर्ववत् चालू केलें. ह्या वेळीं मराठ्यांनीं अशी पद्धत ठेविली होती कीं, विशेष त्रास पडल्याशिवाय किल्ला जितका वेळ लढवितां येईल तितका वेळ लढवावा, तितक्या वेळांत शत्रूचें होईल तितकें नुकसान करावें, अगदीं हातघाईवर आलें म्हणजे किल्ला सोडून चोरवाटेनें निघून जावें, आणि एकदां बादशाहाचें मुख्य सैन्य तेथून निघून गेलें म्हणजे पुन्हां तो किल्ला काबीज करावा. शिवाय किल्ल्याबाहेरील मराठ्यांनीं टोळ्याटोळ्यांनीं बादशाहाच्या छावणीभोंवतालीं घिरट्या घालून त्याचें सामान-सुमान लांबवावें किंवा बाहेरून येणारी दाणावैरण लुटावी.

अशा प्रकारची स्थिति इ० स० १७०७ पर्यंत चालू होती. ह्या वर्षी औरंगजेब बादशाह अहमदनगर येथें मरण पावला. नंतर मोंगल सैन्य महाराष्ट्र सोडून दिल्लीस गेलें; आणि ज्या जुटीमुळें मराठेलोक एवढ्या नेटानें बादशाहाच्या सरदारांशीं टक्कर देत होते ती जूट मोडून आपापसांत फूट झालीं; तो प्रकार असा:—

औरंगजेब मरण पावला तेव्हां त्याचा अजिमशाह नांवाचा एक मुलगा त्याजबरोबर होता. तो आपणास राज्य मिळावें म्हणून आपल्या भावाशीं लढण्यासाठीं दिल्लीकडे निघाला.

त्याच्याबरोबर शाहू ( संभाजीचा मुलगा शिवाजी ह्यास बाद-शाह शाहू म्हणे ) व येसूबाई हीं होतीं. अजिमशाह नर्मदा उतरून जातो न जातो तोंच मागें मराठ्यांनीं फार उचल केली. तेव्हां शाहू व ताराबाई ह्यांचे गादीबद्दल आपसांत तंटे लागून मराठ्यांची शक्ति कमी व्हावी म्हणून झुल्फिकार-खानाच्या सल्ल्यानें अजिमशाहानें शाहूस मराठ्यांचा राजा कबूल करून सोडून दिलें; व त्यानें आपल्याविरुद्ध वागूं नये म्हणून येसूबाईला मात्र आपल्या ताब्यांत ठेविलें.

शाहू मोकळा होतांच तो दक्षिणेंत यावयास निघाला. वाटेंत त्याला कित्येक मराठे सरदार येऊन मिळाले. त्यानें ताराबाईस पत्र पाठवून आपण येत असल्याचें कळविलें; परंतु तिला राज्य पाहिजे असल्यामुळें शाहूचें येणें तिला बरें वाटलें नाहीं. म्हणून तिनें 'हा खरा शाहू नव्हे, कोणी तरी तोतया आहे,' अशी हूल उठवून त्याच्या पारिपत्यासाठीं खंडो बल्लाळ, सेनापति धनाजी जाधव व प्रतिनिधि परशुराम त्र्यंबक यांस सैन्यासह पाठविलें.

पुणें जिल्ह्यांतील खेडाजवळ उभय पक्षांची गांठ पडली. शाहू वडील घराण्यांतला असल्यामुळें तोच राज्याचा खरा मालक असें जाणून खंडो बल्लाळ व धनाजी जाधव त्याला जाऊन मिळाले. प्रतिनिधि तसें करीना, म्हणून त्याशीं शाहूनें लढाई केली. तींत शाहूचा जय झाला. नंतर ताराबाईशीं लढून त्यानें सातारा घेतला. तेव्हां इ. स. १७०८ मध्यें सातारा येथें शाहूस राज्याभिषेक झाला.

ताराबाईस कांहीं लोक अनुकूल होतेच. त्यांच्या साह्यानें तिनें बरीच धडपड केली, पण कांहीं जमेना. तेव्हां तिनें इ. स. १७०८ त कोल्हापुरास नवीन राज्याची स्थापना करून आपला मुलगा शिवाजी ह्यास तेथें राज्याभिषेक करविला. हाच

कोल्हापुरच्या गादीचा मूळ पुरुष होय. ह्या वेळेपासून मराठ्यांच्या सातारा व कोल्हापूर अशा दोन स्वतंत्र गाद्या होऊन त्यांच्यामध्यें पुढें कित्येक वर्षें वांकडें असल्यामुळें मराठ्यांच्या उत्कर्षास कांहींसा अडथळा झाला !

---

## २१. कुळकर्ण्याचा पेशवा झाला.

जंजिरा संस्थानांत श्रीवर्धन म्हणून एक गांव आहे. तेथें विश्वनाथपंत नांवाचा एक कोंकणस्थ ब्राह्मण राहात असे. त्याचें उपनांव भट असें होतें. विश्वनाथपंत हा त्या गांवचा कुळकर्णी होता. त्यास जनार्दन, बाळाजी वगैरे चार मुलगे होते.

इ० स० १७०१ च्या सुमारास जंजिऱ्याच्या सिद्दीची भटाच्या घराण्यावर कांहीं कारणामुळें गैरमर्जी होऊन त्यानें जनार्दनपंतास गोणत्यांत बांधून समुद्रांत बुडविलें ! तेव्हां पुढें-मागें आपणावरही असाच प्रसंग येईल अशी बाळाजीस धास्ती पडली. म्हणून तो आपल्या मुलांबाळांसह वेळास गांवीं भानूच्या घरीं आला. भानू व भट ह्यांचा फार दिवसांचा घरोबा होता. बाळाजीनें झालेलें वर्तमान भानूंस कळविलें. आणि तो म्हणाला, " आतां मला ह्या राज्यांत राहावयाचें नाहीं. देशावर दूर कोठें तरी रोजगारास जावयाचें. " तेव्हां भानू बोलले "आम्हीही तिघे बंधू आपणाबरोबर येतों." त्यावर बाळाजीनें उत्तर केलें, " ठीक आहे. आम्हास जी भाकर मिळेल, तींतला चतकोर तुम्हांस देऊं. "

ठरल्याप्रमाणें भट आणि भानू कोंकणांतून निघून प्रथम सासवडास अंबाजीपंत पुरंदरे यांजकडे आले. नंतर अंबाजीसह ते सर्वजण साताऱ्यास येऊन शंकराजी नारायण सचीव यांच्या हाताखालीं कारकून म्हणून राहिले. पुढें चार वर्षांनीं

बाळाजी व अंबाजी हे दोघे सचिवाकडून निघून धनाजी जाधवाच्या चाकरीस राहिले. धनाजीची ह्या दोघांवर, विशेषतः बाळाजीवर फार मर्जी बसली.

इ० स० १७०८ सालीं शाहूस गादी मिळाल्यावर त्यानें धनाजीकडे फौजेचें व वसुलाचें अशीं दोन्ही कामें सोंपविलीं. तेव्हां धनाजीनें वसुलाच्या कामावर ह्या दोघां कारकुनांचीं नेमणूक केली. ह्या कामीं बाळाजीनें फारच हुशारी दाखविली. त्यामुळें धनाजीचा त्याजवर इतका विश्वास बसला कीं, पुढील वर्षीं तो आजारी पडला असतां त्यानें आपला सर्व अधिकार प्रत्यक्ष आपल्या मुलास न देतां बाळाजीस दिला. ही गोष्ट धनाजीचा मुलगा चंद्रसेन ह्यास न आवडून तो बाळाजीचा द्वेष करूं लागला.

धनाजी मरण पावल्यावर चंद्रसेन सेनापति झाला. त्याचें व बाळाजीचें न पटल्यामुळें त्या दोघांमध्यें भांडणें सुरू झालीं; त्यांचा निकाल शाहूराजानें बाळाजीच्या तर्फें केल्यामुळें चंद्रसेन मोंगलांस जाऊन मिळाला. तथापि बाळाजीनें मागें कोणत्याही प्रकारें कमीपणा पडूं दिला नाहीं.

ह्या वेळीं मराठे सरदारांमध्यें तीन पक्ष होते. कांहीं शाहूराजास मिळाले होते, कांहीं ताराबाईचा पक्ष धरून होते व कांहीं स्वतंत्रपणें वागत होते. तेव्हां बाळाजीनें शाहूराजास मसलत दिली कीं, हे पक्ष मोडून सर्वांस आपल्या छत्राखालीं आणल्याखेरीज राज्यांत स्वस्थता होऊन त्यास बळकटी येणार नाहीं. शाहूराजास ही मसलत पसंत पडली, आणि त्यानें ही महत्त्वाची कामगिरी मुख्यत्वेंकरून बाळाजीकडेच सोंपविली.

हिंगणगांवचा देशमुख दमाजी थोरात व खटावचा कृष्णराव खटावकर हे दोघे स्वतंत्रपणें वागणारे सरदार होते. तेव्हां

प्रथम बाळाजीनें ह्यांच्याकडे आपला मोर्चा वळविला, आणि दोघांसही लढाईंत जिंकून अगदीं जमीनदोस्त करून टाकिलें.

अलिबागचा कान्होजी आंग्रे ताराबाईस जाऊन मिळाला होता. त्याला शिक्षा करण्यासाठीं शाहूराजानें आपला पेशवा बहिरोपंत पिंगळे यास पाठविलें; परंतु पेशव्यांस त्यांत यश न मिळतां उलट त्यास आंग्रयानें कैद केलें. तेव्हां ह्या कामगिरीवरही बाळाजीचीच नेमणूक झाली. त्यानें शहाणपणानें कान्होजीस वळवून त्याच्याशीं तह केला व पेशव्यास सोडविलें. ह्या सर्व कामगिऱ्यांमुळें शाहूराजा खुष होऊन त्यानें पिंगळे याजकडून पेशवाईचा हुद्दा काढून घेऊन तो इ० स० १७१४ सालीं बाळाजीस दिला.

अशा प्रकारें बाळाजी कुळकर्ण्याचा पेशवा बनला !

---

## २२. बाजीराव व निजाम यांची भेट.

मुलांनो, मागील गोष्टीवरून भट घराण्याकडे पेशवाईचा अधिकार आला हें तुम्हांस कळलें आहे. पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ यानें सहा वर्षें (इ० स० १७१४ ते १७२० पर्यंत) पेशवाई चालविली. तो इ० स० १७२० सालीं मरण पावला. त्याला बाजीराव व चिमाजीअप्पा असे दोन मुलगे होते. बाळाजीच्या मागें बाजीरावास पेशवाईचें पद प्राप्त झालें. बाजीराव हा जात्या शिपाईगडी असून शिवाय मोठा धोरणीही होता. हैदराबादचा नबाब निजामउल्मुल्क हा त्याचा मुख्य प्रतिस्पर्धी होता. त्याच्याशीं बाजीरावाची इ० स० १७२८ त पहिली झटापट झाली; तिचें वर्णन असें आहे :—

निजामाच्या मुलखांत चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मराठ्यांस होता, पण हा हक्क वसूल करण्याच्या सबबीनें मराठे त्याच्या मुलखांत शिरून फार उपद्रव देत असत.

तें बंद करण्यासाठीं निजामानें कांहीं वर्षांपूर्वीं त्या हक्काबद्दल उक्ती रक्कम देण्याचा करार केला होता. परंतु ही उक्ती रक्कमही मराठ्यांस द्यावी लागूं नये व आपसांत तंटे लागून त्यांचा नाश व्हावा, ह्या हेतूनें निजामानें असें बोलणें लाविलें कीं, ‘मराठ्यांचा खरा राजा कोण? सातारचा शाहू कीं कोल्हापूरचा संभाजी? ह्या गोष्टीचा निर्णय होईपर्यंत रक्कम मजकडे अनामत राहूं दे! मग ज्याची त्यास पोहोंचती करण्यांत येईल.’

निजामाचा हेतु बाजीरावानें तेव्हांच जाणला. तो शाहूराजास म्हणाला, ‘महाराज, दोघांचा तंटा लावून आपला कार्यभाग साधून घेण्याचा निजामाचा उद्देश आहे. दुसरें कांहीं नाहीं. तेव्हां याची चांगली खोड मोडली पाहिजे.’ बाजीरावाच्या ह्या बोलण्यावरून शाहूस निजामाचा फार राग आला व तो स्वतः त्याजवर स्वारी करण्यास निघाला. तेव्हां बाजीराव बोलला, ‘महाराजांनीं स्वतः एवढी तसदी घेण्याचें कारण नाहीं. मला आज्ञा द्यावी. मी त्याचा बंदोबस्त करून येतों.’

नंतर बाजीराव शाहूराजाच्या परवानगीनें निजामावर चालून गेला. निजामही त्याच्याशीं युद्ध करण्यासाठीं बाहेर पडला. जालना प्रांतांत उभयतांची गांठ पडून थोडेंसें लढाईचें तोंड सुरू होतें न होतें तोंच बाजीरावानें माघार घेऊन, आपण बऱ्हाणपुरावर हल्ला करणार, असें निजामास भासविलें. तेव्हां निजाम त्याच्यामागें लागला. खानदेशांत शिरतांच निजाम पाठीवर आहे असें पाहून बाजीरावानें त्यास फसविण्यासाठीं कांहीं लोक बऱ्हाणपूरच्या रोखानें पाठविले, आणि स्वतः गुजराथेंत जाऊन लुटालूट केली!

बाजीरावाची ही हुलकावणी निजामाच्या लक्षांत येतांच

आपणास त्यानें फसविल्याबद्दल त्याचा त्यास मोठा राग आला आणि तो बाजीरावानें नुकतेंच बांधिलेलें पुणें शहर पाडून जमीनदोस्त करण्यासाठीं निघाला; परंतु तो अहमदनगरापर्यंत येतो तोंच बाजीरावही त्याच्या मागोमाग आला. तेव्हां निजाम माघारा वळून गोदावरी उतरून पलीकडे गेला. तेथें बाजीरावानें त्यांच्याशीं थोडथोडी लढाई चालू करून त्यास आपल्या अंगावर घेत घेत ज्या ठिकाणीं त्यास पाणीही मिळणार नाहीं, अशा अडचणीच्या जागीं त्याच्या सैन्यास कोंडून धरिलें. तेव्हां निजामाचा निरुपाय होऊन त्यानें तहाचें बोलणें लाविलें!

नंतर उभयतांच्या विचारें तह होऊन त्यांचा सलोखा झाला. मग निजामानें बाजीरावास आपल्या छावणींत मेजवानीस बोलाविलें, आणि त्याचा मोठा सन्मान करून त्याचें चातुर्य व लष्करी डावपेंच ह्यांबद्दल त्याची फार वाखाणणी केली. बाजीरावानेंही त्याचे आभार मानून त्याच्या मुत्सद्दीपणाची फार तारीफ केली.

---

## २३. उजव्या व डाव्या हातांमधील लढा.

पेशव्याची दिवसानुदिवस भरभराट होत गेल्यामुळें दाभाडे, गायकवाड, पवार, कदम वगैरे जुन्या मराठे सरदारांच्या मनांत त्याच्याविषयीं मत्सर उत्पन्न झाला. पुढें पुढें तर हा मत्सरभाव इतका वाढला कीं, ते कांहीं तरी कुरापत काढून पेशव्याची खोड मोडण्यास तयार झाले; तेव्हां इ. स. १७३१ सालीं पेशवा व सेनापति ह्यांच्यामध्यें मोठी लढाई झाली. तो प्रकार असा:—

दाभाडे, गायकवाड वगैरे मराठे सरदार कित्येक वर्षें मोंगलांचा गुजराथ प्रांत लुटून त्याची नासाडी करीत असत.

त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं तेथील सुभेदारानें दिल्लीच्या बादशाहाकडे मदत मागितली. परंतु दिल्लीच्या दरबारांतच फार अव्यवस्था माजलेली होती म्हणून सुभेदारास तिकडून मदत मिळाली नाहीं. तेव्हां त्यानें ह्या मराठे सरदारांनाच गुजराथची चौथाई देऊं करून त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण ते एवढ्या लहानशा देणगीनें वळेनात. सरतेशेवटीं त्या सुभेदारानें बाजीरावाकडे संधान बांधून त्याजकडून ह्या लुटारू सरदारांचा बंदोबस्त केला. ह्यामुळें बाजीरावास गुजराथची चौथाई व सरदेशमुखी मिळाली.

ह्या गोष्टीमुळें, त्या सरदारांच्या मनांत बाजीरावाविषयीं जो द्वेषाग्नि धुमसत होता त्यांत तेल पडल्यासारखें होऊन त्यानें एकदम पेट घेतला. सेनापति त्र्यंबकराव दाभाडे यानें बाजीरावाचा सूड घेण्यासाठीं आपल्या हाताखालीं जास्त लोक ठेविले. गायकवाड, पवार, कदम वगैरे सरदार आपापल्या सैन्यासह त्यास येऊन मिळाले. त्यामुळें सेनापतीच्या निशाणाभोंवतीं पस्तीस हजार फौज जमली. शिवाय निजामानेंही त्यास गुप्तपणें साह्य करण्याचें कबूल केलें. कारण, निजामानें बाजीरावाशीं बाहेरून सलोखा केला होता, तथापि मनांतून तो त्याचा द्वेष करीत असे. अशा तयारीनें सेनापति पेशव्यावर चाल करून आला. तो लोकांना लढाईचें उघड कारण असें सांगूं लागला कीं, “ बाजीरावानें आमचे धनी शाहूमहाराज ह्यांचें राज्य बळकावलें आहे, तें परत घेण्याकरितां मी जात आहे. ”

हें वर्तमान बाजीरावास समजतांच त्यानेंही लढाईची तयारी केली. त्यानेंही लोकांत असें प्रसिद्ध केलें कीं, “ सेनापति निजामास फितुर होऊन राज्यास अपाय करूं पाहतो; यास्तव त्यावर शस्त्र धरणें मला भाग पडत आहे. ”

अशा रीतीनें तीं दोन्हीं सैन्यें एकमेकांवर चालू झालीं. वास्तविक पेशवा हा शाहूराजाचा उजवा हात असून सेनापति हा डावा हात. तेव्हां एका देहाच्या दोन हातांमध्यें भांडण सुरू होणें हा केवढा अविचार !

असो. त्या दोन्हीं सैन्यांची गांठ बडोदें व डभई ह्या दोन गांवांच्या दरम्यान पडली. प्रथमच्या हल्लयांत बाजीरावास माघार घ्यावी लागली, परंतु त्यामुळें घाबरून न जातां त्यानें शत्रूशीं मैदानांत समोरासमोर लढण्याचा निश्चय केला. सामान्यतः मराठे लोक अशा प्रकारें समोरासमोर न लढतां शत्रूवर आडून छपून हल्ले करून त्यास जेरीस आणीत असत. ह्यामुळें सेनापतीकडील कदम व दुसरे सरदार त्यास सोडून गेले. तथापि त्र्यंबकरावानें न डगमगतां राहिलेल्या सैन्यानिशींच लढाईस प्रारंभ केला. स्वतः तो हत्तीवर बसून झपाट्यानें बाण सोडीत होता व मधून मधून आपल्या लोकांस वीरश्रीच्या भाषणानें धीर देत होता. बाजीरावही आपल्या घोड्यावर बसून फौजेंत विजेप्रमाणें चमकत होता आणि आपल्या लोकांस उत्तेजन देत होता. बराच वेळपर्यंत निकराची लढाई झाली. दोहोंकडील बरेच लोक पडले व पुष्कळ जखमी झाले. शेवटीं त्र्यंबकरावास गोळी लागून तो मरण पावला ! तेव्हां त्याच्या फौजेची दाणादाण होऊन बाजीरावाचा जय झाला !

मुलांनो, हा अनर्थ कशामुळें घडून आला ? आपसांतील द्वेषामुळें !

---

## २४. बाजीरावाचे सरदार.

मुलांनो, बाजीरावाचें शौर्य आणि लष्करी डावपेंच ह्यांबद्दल तुम्हांस मागील गोष्टीवरून माहिती झाली आहे. ह्या गुणां

बरोबर दुसऱ्याची खरी पारख करून लायक माणसास उत्तेजन देण्याची बुद्धीही त्याच्या ठिकाणीं परिपूर्ण होती. त्यानें कित्येक लोकांस त्यांच्या अंगच्या गुणावरून मोठ्या योग्यतेस चढविलें. त्यांत राणोजी शिंदे व मल्हारराव होळकर हे मुख्य होत. त्यांची हकीकत अशी:—

साताऱ्याजवळ कण्हेरखेड म्हणून एक गांव आहे. त्या गांवची पाटिलकी शिंदे आडनांवाच्या मराठे घराण्याकडे होती. शिंदे हे बहामनी राजापासून शिलेदारी करीत आले होते. औरंगजेब बादशाहाच्या कारकीर्दींत शिंदे घराण्याची विशेष भरभराट होती. त्यावेळीं बादशाहाच्या फौजेंत शिंदे हे एक मनसबदार* होते. बादशाहानें शिंद्याच्या एका मुलीशीं शाहूचें लग्न लावून दिलें होतें. पुढें एकाएकीं ह्या घराण्यास कांहीं कारणामुळें वाईट दिवस येऊन त्यांतील राणोजी नांवाचा पुरुष बाळाजी विश्वनाथाच्या सैन्यांत बारगीर म्हणून राहिला. पुढें तो बाजीरावापाशीं हुजऱ्या म्हणून कांहीं दिवस होता. एक दिवस तो पेशव्याचे जोडे उराशीं घट्ट धरून निजला असतां बाजीरावाच्या नजरेस पडला! ती त्याची विलक्षण स्वामिनिष्ठा पाहून बाजीरावानें त्यास सैन्यांत हवालदाराची जागा दिली. नंतर राणोजी प्रत्येक लढाईत शौर्य दाखवून दिवसानुदिवस मोठ्या योग्यतेस चढूं लागला. बाजीरावानें त्यास ग्वाल्हेरच्या आसपासचा मुलूख जहागीर दिला. राणोजी इ० स० १७५० सालीं मरण पावला. त्यावेळीं त्याची जहागीर सुमारें ३७॥ लाखांची असून ग्वाल्हेर हें त्याचें मुख्य ठिकाण होतें. त्याला जयाप्पा, दत्ताजी, महादजी वगैरे सात मुलगे होते. तेही बापाप्रमाणें शूर व स्वामिनिष्ठ निघाले. पेश-

*घोडेस्वारांतील मुख्य अधिकारी.

वाईची भरभराट होण्यासाठीं त्यांनीं आपले प्राण खर्च केले. जयाप्पाचा १७५५ सालीं खून झाला व दत्ताजी इ० स० १७६० सालीं लढाईंत पडला! जयाप्पाचा मुलगा जनकोजी केवळ सतरा वर्षांचा असतां इ० स० १७६१ मध्यें पानपतच्या लढाईत मोठ्या शौर्यानें लढून मरण पावला! महादजीनेंही पानपतास आपली तरवार चांगली चालविली, परंतु शेवटीं फौजेची पळापळ झाल्यावर तोही दक्षिणेंत पळून आला. तथापि पानपतास मराठे–शाहीस लागलेला कलंक त्यानें पुढें आपल्या पराक्रमानें साफ धुवून टाकला.

पुणें जिल्ह्यांत निरानदीच्या कांठीं होळ म्हणून एक गांव आहे. त्या गांवच्या चौगुल्यास मल्हारी नांवाचा एक मुलगा होता. हा जातीचा धनगर असून लहानपणीं आपल्या मामाकडे मेंढ्या पाळीत असे. त्यावेळची अशी एक दंतकथा ऐकण्यांत आहे कीं, मेंढ्यांच्या मागून चालतां चालतां मल्हारी थकून एका झाडाखालीं विश्रांति घेत पडला असतां त्यास झोंप लागली. त्यावेळीं उन्हाचा एक कवडसा त्याच्या तोंडावर पडला होता. त्यापासून त्याला त्रास होऊं नये म्हणून एका नागानें आपल्या फणांचें त्याजवर छत्र धरिलें. ह्यावरून मल्हारी हा मोठा भाग्यवान् पुरुष आहे असें लोक म्हणूं लागले. असो. मल्हारी मोठा झाल्यावर तो कंठाजी कदम बांडे ह्यांच्या सैन्यांत शिलेदार राहिला. पुढें बाजीराव व कदम ह्यांचें कांहीं कारणावरून भांडण लागलें असतां मल्हारीचें शौर्य बाजीरावाच्या नजरेस आलें. तेव्हां बाजीरावानें त्यास मागून घेऊन आपल्या पदरीं प्रथम पांचशें स्वारांची सरदारी दिली. पुढें हा मल्हारी आपल्या पराक्रमावर वाढतां वाढतां 'सुभेदार मल्हारराव होळकर' बनला. इ० स० १७६९ पर्यंत मराठ्यांनीं ज्या मोठमोठ्या स्वाऱ्या मारिल्या, त्यांत मल्हाररावानें चांगली कामगिरी

बजाविली होती. हा इ० स० १७६६ सालीं मरण पावला. ह्याची जहागीर सुमारें ७५ लाखांची असून इंदूर हें त्याचें राहण्याचें मुख्य ठिकाण होतें. प्रसिद्ध साध्वी अहल्याबाई होळकरीण ही त्याची सून होय त्याचा मुलगा अगोदरच मरण पावला होता. म्हणून त्याच्यामागें अहल्याबाईच जहागिरीची व्यवस्था पाहूं लागली.

ह्या मुख्य सरदारांशिवाय बडोद्याचा दमाजी गायकवाड, धारचा उदाजी पवार, झांशीचा गोविंदपंत बुंदेले व विंचुरकर हे बाजीरावाच्या वेळींच उदयास आले.

---

## २५. दिल्लीचा बादशाह चकित झाला.

बाजीराव पेशवा प्रसंगीं खाण्यापिण्याची पर्वा न करितां जोंधळा व मका यांचा हुरडा आणि चणेकुरमुरे ह्यांचे फांके मारून लांबलांब मजला मारीत असे. एका वेळीं कांहींच अटकळ नसतां तो एकदम दिल्लीच्या दरवाज्यापुढें दाखल झाला ! त्यास पाहतांच बादशाह फार चकित झाला ! तो वृत्तांत असा:—

बाजीराव नेहमीं स्वारींत असल्यामुळें प्राप्तीपेक्षां त्याचा खर्च मोठा असे. यास्तव त्याला वरचेवर कर्जासाठीं सावकाराचें घर पाहावें लागे. त्याच्या फार मोठ्या खर्चामुळें सालोसाल कर्जाचा बोजा वाढत चालला. मागील बाकी थकल्यामुळें सावकारही आणखी कर्ज देण्यास कांकूं करूं लागले तेव्हां पैशाच्या तुटीमुळें सैन्याचा पगार थकून तें त्यास तगादा करूं लागलें !

ह्या अडचणींतून पार पडण्यासाठीं बाजीराव माळव्याकडे चौथाई व सरदेशमुखी वसूल करीत चालला. माळव्याचा सुभेदार जयसिंग व बाजीराव ह्यांचा स्नेह होता. म्हणन त्यानें

जयसिंगामार्फत संपूर्ण माळवा प्रांत आणि गुजराथच्या सरदेशमुखीच्या हक्कांची सनद, ह्यांची बादशाहाकडे मागणी केली.

मागणीप्रमाणें बादशाहानें सनद करून ती आपल्या वकिलाहातीं बाजीरावाकडे पाठवून दिली. बादशाहानें आपलें बोलणें बिनहरकत मान्य केलेलें पाहून बाजीरावास जास्त लोभ सुटला आणि त्यानें पूर्वीपेक्षां फारच मोठी मागणी केली! अर्थात् ती बादशाहास मान्य झाली नाहीं, इतकेंच नव्हे तर बाजीरावाचा दरबारच्या लोकांस राग येऊन त्यांनीं त्याची खोड मोडण्याचा निश्चय केला, आणि दिल्लीच्या आसपास सैन्याची जमवाजमव चालविली!

दिल्लींत आपल्या पारिपत्याची तयारी चालू आहे हें बाजीरावास समजतांच तो ताबडतोब तिकडे चालला. आग्र्याच्या दक्षिणेस यमुना नदीच्या कांठीं त्याच्या सैन्याचा तळ पडला असतां होळकर वगैरे सरदार नदी उतरून दुआबांतील प्रदेशांत लुटालूट करूं लागले. त्यांच्यावर अयोध्येचा सुभेदार चाल करून आला. तेव्हां ते सरदार नदी उतरून परत आपल्या छावणींत आले. हें पाहतांच मराठे आपणांस भिऊन पळाले असें त्या सुभेदारास वाटलें. म्हणून त्यानें आपल्या नसत्या पराक्रमाची हकीकत तिखटमीठ लावून बादशाहास कळविली तेव्हां दिल्लींत आनंदीआनंद झाला!

ह्या गोष्टीची बाजीरावास मोठी चीड येऊन तो त्यांच्या आनंदास विरजण घालण्याकरितां दररोज चाळीस चाळीस मैलांच्या मजला मारून दिल्लीच्या दरवाजापुढें एकदम दाखल झाला, आणि आपण आल्याबद्दल त्यानें बादशाहास निरोप पाठविला.

बाजीरावाच्या येण्याबद्दल बादशाहास मुळींच अटकळ नव्हती म्हणून तो ह्या निरोपामुळें फार चकित झाला! त्याची

बाजीरावाशीं लढाई करण्याची मुळींच तयारी नव्हती, म्हणून आपण तह करण्यास तयार आहों, असा त्यानें बाजीरावास उलट निरोप पाठविला.

ह्या निरोपानंतर आपल्या सैन्यापासून दिल्लीच्या रयतेस उपद्रव होऊं नये म्हणून बाजीराव आपलें सैन्य घेऊन काहींसा मागें सरला. तेव्हां तो आपणांस भ्याला असें समजून बादशाहाच्या सरदारांनीं तहाचा विचार एकीकडे ठेवून आठ हजार लोकांनिशीं त्याजवर हल्ला केला; पण त्यात त्यांचाच पराभव होऊन एक मुख्य सरदार व पुष्कळ लोक मरण पावले.

थोड्या वेळानें मोगलांनीं पुन्हा एक हल्ला केला; पण त्याचाही पहिल्याप्रमाणेंच शेवट झाला. तेव्हां उभयतांच्या विचारें तह ठरला. त्यामुळें बाजीरावास बादशाहाकडून माळवा प्रांत व स्वारीच्या खर्चाबद्दल तेरा लक्ष रुपये मिळाले. ही गोष्ट इ० स० १७३६ सालीं झाली.

---

## २६. चिमाजीअप्पाचा पक्का निर्धार.

मुलानो, ‘ निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंचि फळ’ हें तुकाराममहाराजांचें वाक्य तुह्मांस माहीत आहे ना ? त्याची सत्यता प्रत्येक बाबतींत आपणांस दिसून येतेच. इ० स० १७३९ सालीं चिमाजी अप्पानें घातलेल्या वसईच्या वेढ्यामध्येंही ह्याचाच खरेपणा अनुभवास आला. म्हणून त्या वेढ्याचें बोधपर व मनोरंजक वर्णन मी आज तुम्हांस सांगणार आहे. मराठ्यांच्या इतिहासांत ह्या वेढ्याचें महत्त्व मोठें मानतात; कारण त्या वेळीं मराठ्यांच्या आंगचें विलक्षण धैर्य व पक्का निर्धार दिसून आला.

युरोपखंडांत पोर्तुगाल म्हणून एक देश आहे. त्यांतील

लोकांस पोर्टुगीज म्हणतात. ते लोक इ० स० १५०० च्या सुमारास हिंदुस्तानच्या पश्चिम किनाऱ्यावर व्यापार करण्यासाठीं म्हणून आले. व्यापार करितां करितां ह्या लोकांनीं लवकरच मुंबई इलाख्याचा पश्चिम किनारा काबीज केला! गोवें, ठाणें, वसई इत्यादि ठिकाणीं त्यांचीं मुख्य ठाणीं होतीं. हे लोक हिंदी प्रजेस फार त्रास देत व तिला जुलमानें बाटवीतही असत! या गोष्टीची कागाळी पेशव्यांचे कानीं वारंवार येऊं लागली. शिवाय हे लोक मराठ्यांच्या आरमारावरील अधिकारी लोकांच्या नेहमीं कुरापती काढीत. या सर्व कारणांमुळें पेशव्यास त्या लोकांवर शस्त्र धरणें जरूर पडलें. ह्या कामावर चिमाजीअप्पाची नेमणूक झाली. त्यानें सैन्य व आरमार यांची तयारी करून पोर्टुगीजांचा वसईचा किल्ला घेण्याचा बेत केला. हा किल्ला घेण्याचें काम सोपें नव्हतें. कारण, किल्ल्याची तटबंदी आणि त्याच्यावरील बंदोबस्त यांच्या योगानें हा किल्ला अजिंक्य आहे, अशी सर्व लोकांची समजूत होती. तेव्हां असला किल्ला काबीज करण्याचा निश्चय करणें हें लहानसहान धाडस काय?

मराठी सैन्यानें कित्येक दिवसपर्यंत मोठ्या निकराचा हल्ला चालविला; पण पोर्टुगीज किल्लेदारानें कांहींच दाद लागूं दिली नाहीं. मराठे अगदीं दांत ओंठ खात किल्ल्यावर तुटून पडत; पण त्यांचा कांहींच उपाय चालेना! कारण, किल्ल्याचे तीन बाजूंस पाणी, आणि जमिनीकडील चौथ्या बाजूनें हल्ला करून जावें तर किल्ल्यावरून तोफांनीं व बंदुकांनीं केवळ आगीचा पाऊस पडत असे. यामुळें मराठी सैन्य अगदीं जेरीस आलें. तथापि किल्ला सर करण्याविषयीं अप्पाचा निश्चय लेशही ढळेना!

इतक्यांत इराणचा बादशाह नादीरशाह ह्यानें हिंदुस्ताना-

वर स्वारी केली. त्याशीं तोंड देण्यासाठीं बाजीराव सैन्यासह दिल्लीकडे निघाला. तेव्हां त्यानें अप्पास किल्ला सर करण्याचें सोडून आपणास तावडतोब येऊन मिळण्याविषयीं निकडीचें पत्र लिहिलें. त्यामुळें अप्पाची ' इकडे आड व तिकडे विहीर ' अशी अवस्था झाली. जावें तर आपला निश्चय ढळतो, न जावें तर बंधूच्या आज्ञेचा भंग होतो. शेवटीं जातां जातां आणखी एकवार अगदीं निकराचा हल्ला करण्याचें ठरवून त्यानें आपल्या सरदारांस जवळ बोलावून म्हटलें, " आपले पाय किल्ल्यास लागतील असें चिन्ह दिसत नाहीं. ह्यासाठीं माझें डोकें तरी तोफेच्या धडाक्यानें उडवून किल्ल्यांत जाऊन पडेल असें करा, म्हणजे माझा हेतु पूर्ण होईल. "

अप्पाच्या ह्या निर्वाणीच्या भाषणानें त्या सरदारांस विलक्षण आवेश चढून ते सर्व ' मारीन किंवा मरेन ' ह्या निर्धारानें शत्रूवर तुटून पडले. त्यांनीं तोफांच्या व बंदुकांच्या गोळ्यांस न जुमानतां वाळूंत चर खणून बुरुजाखालीं सुरुंग खोदण्याचें काम सुरू केलें व त्यापैकीं दोन सुरुंग उडवून तटास मोठें खिंडार पाडलें. खिंडार पडतांच मराठे ' हरहर महादेव, ' ! म्हणून आंत घुसले. त्यांच्यावर पोर्टुगीजांनीं आगीचा अतोनात मारा केला पण त्यास न जुमानतां मराठ्यांनीं किल्ल्यावर आपला बावटा फडकाविलाच.

---

## २७. राज्याच्या मुखत्यारीची सनद.

मुलांनो, शाहूमहाराजांचें पूर्ववय औरंगजेब बादशाहाच्या छावणींत चैनींत गेल्यामुळें त्यांना कामाचा बहुतेक कंटाळाच असे. तशांत, बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांसारखे कर्ते व पराक्रमी पुरुष त्यांना मिळाल्यामुळें तर ते राज्यकारभाराकडे फारच दुर्लक्ष करूं लागले. तथापि ते शाहाणे व दूरदर्शी

होते. त्यांना मुलगा नव्हता. तेव्हां कोणी तरी दत्तक मुलगा घेऊन त्याला आपल्या मागें राज्याचा मालक केलें तरी त्याच्या हातून आपल्या वाढत्या राज्याचा उरक होणार नाहीं, असें जाणून त्यांनीं आपल्या सर्व राज्याच्या मुखत्यारीची सनद बाजीरावाचा मुलगा नानासाहेब पेशवा यास दिली. त्याची हकीकत अशी आहे:—

इ. स. १७४८ मध्यें शाहूमहाराज आजारी पडले. या वेळीं बाजीराव मरून आठ वर्षें झालीं होतीं. त्याच्यामागें पेशवाईचा अधिकार त्याचा वडील पुत्र नानासाहेब यास मिळाला होता. असो. शाहूमहाराज आजारांतून बरे होण्याचें चिन्ह दिसेना. त्यांचा एकुलता एक मुलगा यापूर्वींच मरण पावला असल्यामुळें ताराबाईचा नातू रामराजा याला मांडीवर घेण्याचा विचार ठरला; व तो ताराबाईलाही पसंत पडला.

ह्या वेळीं रामराजा सुमारें २६ वर्षांचा होता. एवढा मोठा व ताराबाईच्या संबंधाचा मुलगा दत्तक न घेतां लहानसा दुसरा एकादा मुलगा दत्तक घेऊन आपण स्वतः कारभार चालवावा असें शाहूमहाराजांची बायको सकवारबाई हिच्या मनांत होतें. हा आपला बेत तडीस नेण्यासाठीं तिनें गुप्तपणें सैन्याची तयारी चालविली व दमाजी गायकवाडास आपल्या मदतीस बोलाविलें; पण बाहेरून मात्र ती ‘ आपण शाहूमहाराजांच्या इच्छेविरूद्ध मुळींच नाहीं, इतकेंच नव्हे तर नवऱ्याबरोबर आपण सती जाणार ’ असें म्हणत असे.

शाहूमहाराज विशेष आजारी असल्याचें समजतांच नानासाहेब २५००० सैन्यासह पुण्याहून साताऱ्यास आला. रामराजास दत्तक घेण्याचा विचार त्यालाही मान्य झाला. हें राणी सकवारबाई हिला समजतांच ती नानासाहेबाचा मनांतून द्वेष करूं लागली. तिनें त्यास मारेकरी घालून ठार मारण्याचाही

घाट घातला होता पण तो साधला नाहीं. शाहूमहाराज व नानासाहेब ह्यांची एकांतांत गांठ पडू नये याबद्दलही तिनें फार खबरदारी घेतली होती. परंतु त्यांतुनही संधि साधून नानासाहेबानें शाहूमहाराजांची भेट घेतली. तेव्हां सकवारबाई जवळ नव्हती. शाहूमहाराजांनीं नानासाहेबास सहीशिक्क्यासह सनद करून दिली कीं, यापुढें मराठी राज्याचा कारभार पेशव्यानें कुलमुखत्यारीनें चालवावा, फक्त सातारच्या गादीवर नांवाला राजा बसवून त्याचा मानमरातब पूर्वींप्रमाणेंच राखावा. कोल्हापूर व सातारा हीं दोन राज्यें एक करूं नयेत. ही गोष्ट इ. स. १७४९ सालीं घडली.

सनद हातीं पडतांच नानासाहेब निर्धास्त झाला. सकवारबाईस ज्या ज्या लोकांची मदत होती त्यांचा बंदोबस्त करण्याकडे आतां नानासाहेब लक्ष पुरवूं लागला. पुढें लवकरच शाहूमहाराज मरण पावले ! त्यांच्या मरणामुळें नानासाहेबास फार वाईट वाटलें. पण दुःख करीत न बसतां धैर्यानें तो लागलाच पुढील व्यवस्थेस लागला. कारण ती वेळ मोठ्या आणीबाणीची होती. शहरांत दंगा होण्याचा फार संभव होता. परंतु नानासाहेब पूर्वींपासून सावध होताच. त्यानें ताबडतोब आपली फौज शहरांत आणून बंदोबस्त केला. सकवारबाईचा सर्व बेत फसल्यामुळें ती नवऱ्याबरोबर सती गेली. ज्या ठिकाणीं ही सती गेली त्या ठिकाणीं तिचें स्मारक म्हणून एक पाषाणाची मूर्ति व लिंग ह्यांची स्थापना केली आहे. तीं अद्याप माहुलीस दृष्टीस पडतात.

ह्याप्रमाणें पेशवे मराठी राज्याचे मुख्य सत्ताधारी झाले. पुढें सर्व राज्यकारभार पुण्यास चालूं लागल्यामुळें इ० स० १७५० पासून पुणें महाराष्ट्राची राजधानी झालें.

## २८. महादाजीपंताचा थोरपणा.

मुलांनो, जे लोक पुष्कळ माणसांच्या कल्याणाकरतां आपल्या स्वतःच्या हितावर पाणी सोडतात अशा लोकांची गणना कवि सत्पुरुषांमध्यें करीत असतात. अशा प्रकारच्या एका थोर मनुष्याची गोष्ट आज तुम्हास सांगावयाची आहे.

बाजीराव पेशवाईचा अधिकार चालवीत असतां त्याचा सर्व कारभार चिमाजीअप्पाच पाहात असे. पुढें हे दोघे पुरुष थोड्याच अंतरानें इ० स० १७४० मध्यें मरण पावले. बाजीरावाचे मागें त्याचा वडील मुलगा नानासाहेब हा पेशवा झाला. परंतु चिमाजीअप्पाचा मुलगा सदाशिवराव हा अल्पवयी असल्यामुळें त्याला पेशव्याचा कारभार न मिळतां त्या कामावर महादाजीपंत पुरंदरे या गृहस्थाची योजना झाली.

इ० स० १७५० मध्यें राणोजी शिंदे मरण पावला. त्याच्या मागें त्याचा वडील मुलगा जयाप्पा ह्याला सरदारीचीं वस्त्रें मिळालीं. जयाप्पा व त्याचा दिवाण रामचंद्रबाबा यांच्यामध्यें बेबनाव झाल्यावरून जयाप्पानें दिवाणजीस कामावरून दूर केलें.

रामचंद्रबाबा हा वेंगुर्लें तालुक्यांतील आरवली गांवचा कुळकर्णी. हा बाजीरावाच्या कारकीर्दींत सातार्‍यास आला व पेशव्याचे पदरीं नोकरीस राहिला. पुढें यानें कारकुनी व शिपाईगिरी ह्या दोहींतही चांगला लौकिक मिळविल्यामुळें बाजीराव पेशव्याचे शिफारशीवरून त्यास राणोजी शिंद्याची दिवाणगिरी मिळाली होती, असो.

दिवाणगिरी जातांच रामचंद्रबावानें सदाशिवरावभाऊस वश करून घेतलें; व नानासाहेबाकडून आपणास शिंद्याची दिवाणगिरी देववावी म्हणून त्याच्याजवळ विनंति केली. भाऊसाहेबानें

रामचंद्रबाबाच्या विनंतीप्रमाणें नानासाहेबापाशीं भीड खर्च केली, पण खुद्द जयाप्पाच या कामीं विरुद्ध असल्यामुळें नानासाहेबास कांहीं करतां येईना. शेवटीं रामचंद्रबाबास शिंद्याच्या ऐवजी भाऊसाहेबाची दिवाणगिरी पत्करून राहावें लागलें.

ह्या कामीं नानासाहेबाची मुळींच कसूर नव्हती; पण रामचंद्रबाबास वाटलें कीं, आपणास दिवाणगिरी मिळाली नाहीं ती केवळ नानासाहेबानें ह्या गोष्टींत विशेष लक्ष घातलें नाहीं म्हणून. तेव्हां तो पेशव्याची चांगली खोड मोडण्याच्या विचारास लागला. रामचंद्रबाबा चतुर पुरुष होता, पण त्यानें आपलें चातुर्य भांडणें उत्पन्न करण्याकडे खर्च केल्यामुळें तें कवडीमोल ठरलें, असो. त्यानें भाऊसाहेबाची उठावणी करून त्याजकडून पेशव्यास निरोप पाठविला कीं, ' माझे वडील चिमाजीअप्पा यांजकडे पेशव्याची दिवाणगिरी होती, ती आपण देत असाल तर मी पुण्यास राहातों. नाहींतर कोल्हापुरचा राजा मला आपली पेशवाई देत आहे तिकडे जातों. '

ह्या निरोपामुळें पेशव्यास मोठा पेंच पडला. इकडे भावास तोडवेना व तिकडे महादाजीपंतासारख्या विश्वासू, प्रामाणिक व प्रसंगीं उपयोगी पडलेल्या मनुष्यास कामावरून काढवेना. त्याला ' इकडे आड व तिकडे विहीर ' अशी स्थिति प्राप्त झाली ! परंतु महादाजीपंतांनीं ह्या वेळीं मनाचा मोठेपणा दाखविला; सबब ते स्तुतीस पात्र आहेत. पेशव्यांचे कुळांत भांडणें सुरू करण्याचा रामचंद्रबाबाचा प्रयत्न आहे हें त्यांनीं ओळखलें. तेव्हां त्यांनीं आपण होऊनच दिवाणगिरीचा राजीनामा दिला व तंट्याचें मूळ साफ काढून टाकलें.

पुढें भाऊसाहेबास पेशव्याची दिवाणगिरी मिळून तो

रामचंद्रबाबाच्या मदतीनें कारभार चालवूं लागला आणि महादाजीपंताच्या थोरपणाबद्दल त्यांची सर्वत्र वाहवा होऊं लागली.

---

## २९. लेखणी व तरवार ह्यांची अदलाबदल,

मुलांनो, नानासाहेबानें मराठी राज्याचा सर्व मुलकी कारभार आपला चुलतभाऊ सदाशिवराव ऊर्फ भाऊसाहेब याजकडे सोंपविला, हें तुम्हांस मागील गोष्टीवरून समजलें आहेच. त्याचप्रमाणें त्यानें सैन्याची व्यवस्था आपला धाकटा भाऊ रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा याजकडे दिली. या दोन्ही नेमणुका अगदीं योग्य अशा झाल्या होत्या. परंतु पुढील कारणानें त्या व्यवस्थेंत पालट झाला.

भाऊसाहेब बुद्धिमान्, पाणीदार व मानी पुरुष होता. त्यानें रामचंद्रबाबाच्या मदतीनें राज्याच्या वसुलाची नीट व्यवस्था लाविली व सर्व लोकांस योग्य न्याय मिळेल अशी तजवीज केली. सारांश, भाऊसाहेबाच्या कारभारामुळें प्रजेची आबादानी होती.

रघुनाथरावाच्या आंगीं बापाचा शूरपणा पूर्णपणें उतरला होता. परंतु त्याला राज्यकारभार चालविण्याचें धोरण फारसें नव्हतें. तो आपला शिपाईगडी होता. मारीन किंवा मरेन हें त्याला माहीत. लढाईत त्याला अपयश असें कधींच आलें नाहीं. त्यानें कृष्णाकांठच्या घोड्यांना सिंधुनदाचें पाणी पाजलें ! फौजेची हालचाल व्यवस्थित व नियमित करण्याची हातोटी त्याला उत्तम साधली होती. स्वारींत असतां तो मजलाही लांबलांबच्या मारीत असे. आज पुण्यांत तर उद्यां त्याच्या फौजेचा तळ तेथून निदान तीस मैलांवर पडाव-

याचाच. रेंगाळत राहाणें त्याला मुळींच आवडत नसे. ह्या त्याच्या गुणांमुळें ' राघोबादादा भरारी ' हें नांव त्यास पडलें होतें.

इ० स० १७५६ सालच्या अखेरीस राघोबानें पुण्याहून उत्तरेस भरारी मारली, आणि माळव्यापासून दिल्लीपर्यंत खंडणी वसूल करून शेवटीं दिल्लीही घेतली. ह्या वेळीं पंजाब प्रांतांत अफगाणिस्तानचा अहमदशाह दुराणी ह्याचा सुभेदार राज्य करीत होता. ह्या सुभेदाराच्या हाताखालीं आदीना बेग नांवाचा एक माणूस होता. त्याचें व सुभेदाराचें कांहीं कारणावरून वांकडें आल्यामुळें त्यानें रघुनाथरावास आपल्या मदतीस बोलाविलें. तेव्हां रघुनाथराव दिल्लीहून पंजाबांत शिरला.

राघोबानें बेगच्या इच्छेप्रमाणें त्या सुभेदाराचा पराभव करून बेगला त्याच्या जागीं सुभेदार नेमिलें, आणि त्याच्या संरक्षणासाठीं लाहोर येथें कांहीं सैन्य ठेवून तो इ० स० १७५८ सालीं परत पुण्यास आला.

ह्या स्वारींत रघुनाथरावानें सर्व हिंदुस्तानभर मराठ्यांच्या नांवाचा दरारा बसवून मोठा लौकिक मिळविला खरा, पण तींत त्यास द्रव्यलाभ न होतां उलट पुष्कळ कर्ज मात्र झालें. त्यामुळें सदाशिवराव व रघुनाथराव यांची बोलाचाली झाली. ' मुलुखगिरी करून लूट आणावयाची कीं कर्ज करून यावयाचें ? ' असें भाऊसाहेब त्यास खोंचून बोलला. त्यावर रघुनाथरावानें उत्तर केलें, ' एवढें चातुर्य तुम्हांस असेल तर ह्यापुढें तुम्हीच स्वारीस जावें. ' शेवटीं ह्या तंट्याचा निकाल पेशव्यानें असा केला कीं, ' रघुनाथरावानें मुलकी कारभार पाहावा, व भाऊसाहेबानें स्वारीस जावें. ' अशा प्रकारें लेखणी व तरवार यांची अदलाबदल झाली.

पुढें लवकरच पेशवे व निजाम यांच्यामध्यें बेबनाव

उत्पन्न झाला. तेव्हां भाऊसाहेबानें निजामावर चाल करून उद्गीर येथें त्याचा इ० स० १७६० त पराभव केला.

---

## ३०. पानपतची भयंकर लढाई ( इ० स० १७६१ )

श्रीवर्धनच्या भट घराण्याकडे पेशवाई आल्यापासून सुमारें पन्नास वर्षें मराठी राज्याचा उत्कर्ष होत गेला. परंतु पुढें ज्या भयंकर लढाईच्या योगानें मराठ्यांचें एकसारखें पुढें पडत जाणारें पाऊल कांहीं काळपर्यंत जागच्या जागीं थांबून राहिलें; त्या पानपतच्या भयंकर लढाईचें वर्तमान खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

पंजाबांतील आपल्या सुभेदारास रघुनाथरावानें हांकून लाविलें हें अहमदशाहास समजतांच तो फार रागावला आणि लागलीच पंजाबावर चाल करून त्यानें लाहोर येथील मराठ्यांच्या सैन्यास उधळून लाविलें.

ही अपमानाची गोष्ट पुण्याच्या दरबारीं समजतांच तिच्याबद्दल अहमदशाहाचा पुरा सूड घेण्याची मसलत सुरू झाली. भाऊसाहेबाकडे सैन्याचा अधिकार येऊन त्यानें नुकताच निजामअल्लीवर उद्गीर येथें एक मोठा जयही मिळविला होता. तेव्हां नानासाहेबानें या स्वारीवर भाऊसाहेबाचीच नेमणूक केली.

वास्तवीक अहमदशाहासारख्या प्रबळ शत्रूवर राघोबासारख्या कसलेल्या वीराचीच योजना झाली पाहिजे होती. कारण भाऊसाहेबास लढाईचा फारसा अनुभव नसून उत्तरहिंदुस्तानची तर त्याला कांहींच माहिती नव्हती.

असो. भाऊसाहेब व नानासाहेबाचा वडील पुत्र विश्वासराव हे दोघे बरोबर मोठी फौज घेऊन पुण्याहून दिल्लीच्या रोखानें निघाले. वाटेंत त्यांना शिंदे, होळकर, गायकवाड,

बुंदेले वगैरे मराठे सरदार व रजपूत राजे सैन्यासह जागोजाग येऊन मिळाले. त्यामुळें एकंदर सुमारें दोन लाख लोक मराठ्यांच्या भगव्या झेंड्याभोंवतीं गोळा झाले.

मराठ्यांकडे लढाईची अशी तयारी चालली असतां अहमदशाह कांहीं स्वस्थ बसलेला नव्हता. त्यानेंही मराठ्यांशीं दोन हात करण्याची कडेकोट तयारी चालविली होती. त्याला अयोध्येचा नबाब, रोहिले लोक व मोंगल बादशाहींतील कित्येक मुसलमान सरदार यांची पूर्ण मदत होती.

आडून छपून शत्रूवर हल्ले करून त्यास जेरीस आणावयाचे अशी मराठ्यांची नेहमींची लढाईची पद्धत असे. तिला अनुसरून मल्हारराव होळकर व दुसरे सरदार भाऊसाहेबास लढण्या विषयीं मसलत देऊं लागले. परंतु ती त्यास न रुचून त्यानें मैदानांत शत्रूशीं समोरासमोर लढण्याचा निश्चय केला, व तो सैन्यासह दिल्लीस जाऊन तेथें तळ देऊन राहिला.

मराठ्यांच्या सैन्याचा तळ दिल्लीस पडला असतां अहमदशाह सैन्यासह जवळच यमुना नदीच्या पलीकडे होता. भाऊसाहेबास त्याच्या आंगावर चालून जावयाचें होतें पण त्यापूर्वींच अहमदशाह नदी उतरून मराठ्यांच्या सैन्याच्या दक्षिणभागीं येऊन राहिला. तेव्हां मराठ्यांचें सैन्य मागें हटत हटत पानपतपर्यंत गेलें. तेथें भाऊसाहेबानें आपल्या सैन्याभोंवती एक खोल खंदक खणविला. अहमदशाहानेंही मोठमोठीं झाडें तोडून तीं आपल्या सभोंवतीं रचून कोट बनविला.

अशा प्रकारें दोन्ही सैन्यें सज्ज होऊन राहिलीं; पण लढाईला कोणीही सुरवात करीना. पुढे मराठ्यांच्या छावणीत दाणावैरणीची तूट पडून लोकांची उपासमार सुरू झाली. तेव्हां अन्नावांचून मरण्यापेक्षां शत्रूवर हल्ला करून लढाईचा काय तो निकाल लावून टाकावा, अशा निश्चयानें मराठे ता १४. जानेवारी

इ. स. १७६१ रोजीं सकाळीं खंदकाबाहेर पडले व उभयपक्षीं लढाई सुरू झाली.

सूर्योदयापासून तिसऱ्या प्रहरापर्यंत भयंकर लढाई झाली. तींत मराठ्यांची सरशी असल्याचें दिसून आलें. इतक्यांत दुर्दैवानें विश्वासराव गोळी लागून पडला ! त्यामुळें भाऊसाहेबाचा धीर खचला. आतां नानासाहेबास तोंड कसें दाखवावें ! ह्या विचारानें तो जो एकदां गर्दींत शिरला तो लवकरच दिसेनासा झाला. दोघेही नायक नाहींतसे होतांच सैन्याचा धीर सुटून तें वाट फुटेल तिकडे पळूं लागलें. तेव्हां अहमदशाहाच्या घोडेस्वारांनीं त्याजवर चाल करून त्यांची कत्तल सुरू केली ! अशा प्रकारें अहमदशाहास जय मिळून मराठ्यांची अतोनात प्राणहानि झाली. त्यामुळें सर्व महाराष्ट्र दुःखानें व्यापून गेला !

## ३१. माधवराव बल्लाळ. ( १७६१–१७७२ ).

पानपतच्या पराभवाच्या हकीकतीनें नानासाहेब पेशव्याचें सर्व अवसान गळून तो दिवसानुदिवस झुरणीस लागला; व पुढें लवकरच पुण्यानजीक पर्वतीच्या देवळांत ' भाऊ ! भाऊ ! ' म्हणत त्यानें इ. स. १७६१ च्या जून महिन्यांत प्राण सोडला. त्यानें इ. स. १७४१ पासून १७६१ पर्यंत पेशवाई चालविली. त्याला माधवराव व नारायणराव असे दोन पुत्र होते.

नानासाहेबाच्या मृत्यूनंतर दोन तीन महिन्यांनीं रघुनाथराव आपला पुतण्या माधवराव यास बरोबर घेऊन साताऱ्यास गेला. तेथें साताराचे महाराज रामराजे यांजकडून माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. ह्या वेळीं माधवराव केवळ सतरा वर्षांचा होता.

पेशवा लहान असल्यामुळें सर्व कारभार स्वतां रघुनाथराव व त्याचा मित्र सखाराम बापू बोकील हे पेशव्यास न विचारतां

केवळ आपल्या मुखत्यारीनें पाहूं लागले. ही गोष्ट त्या बाल, पण तेजस्वी, पेशव्यास खपेना. ह्यामुळें त्या चुलत्यापुतण्यांमध्यें वांकडें उत्पन्न झालें.

शिवाय रघुनाथरावाची बायको आनंदीबाई हिला राज्याची फार हांव होती. माधवरावाकडून अर्धें राज्य घेण्याविषयीं तिनें नवऱ्याच्या मनांत भरवून दिलें. ह्या गोष्टीनें तर मूळच्या वांकडेपणांत जास्तच भर पडली.

तेव्हां एका म्यानांत दोन सुऱ्या असणें चांगलें नाहीं, असें जाणून माधवरावानें रघुनाथरावास, तो धोरप नांवाच्या किल्ल्याजवळ असतां, कैद करून आणिलें, व वाड्यामध्येंच नजरकैदेंत ठेविलें.

ह्यानंतर माधवराव निर्धास्तपणें आपल्या राज्याच्या व्यवस्थेस लागला. पानपताच्या पराभवामुळें मराठ्यांच्या लौकिकास जो कलंक लागला होता तो साफ धुवून टाकण्याचें त्याच्या मनांत होतें. परंतु ही गोष्ट त्याच्या थोड्या मुदतीच्या कारकीर्दींत सर्वांशीं शेवटास गेली नाहीं. तथापि त्यानें कर्नाटकांत स्वाऱ्या करून हैदरअल्लीवर आपला दरारा चांगला बसविला.

माधवरावास माणसाची पारख चांगली होती. त्यानें आपणाभोंवतीं नाना फडणवीस, हरिपंत फडके, त्र्यंबकराव पेठे, बजाबा पुरंदरे वगैरे माणसें गोळा केलीं. हे सर्व लोक प्रसंगीं कसास उतरून त्यांनीं पुढें पडत्या काळीं पेशव्यांची राज्यरूपी इमारत आपल्या हयातीपर्यंत सावरून धरिली.

माधवरावाचें आपल्या प्रजेवर फार प्रेम असे. मोठमोठे सरकारी अधिकारी गोरगुरीब लोकांस वेठीस धरून त्यांजकडून फुकट काम करून घेतात, हें त्यास समजतांच त्यानें ह्या गोष्टीस सक्त मनाई केली. असें असतां एका अधि-

काऱ्यानें हा त्याचा हुकूम मोडिला म्हणून त्यानें त्यास कडक शिक्षा दिली.

माधवरावाचा स्वभाव पाणीदार असल्यामुळें त्याचा सर्व सरदारांवर वचक होता. एकदां महादजी शिंद्यास कामगिरीवर जाण्याविषयीं हुकूम झाला असतां तो कांहीं दिवस वानवडीस तसाच तळ देऊन राहिला. एक दिवस माधवराव पुण्याहून थेउरास गणपतीच्या दर्शनास जात असतां त्यानें शिंद्याचें लष्कर पाहिलें; तेव्हां लागलेंच त्यानें महादजीस बोलावून आणून म्हटलें, " महादजी, तुमचें हें धिटाईचें व अवज्ञेचें वर्तन पाहून मी थक्क झालों. असो, मी थेउराहून परत येतांना जर मला येथें तुमचा एक मनुष्य दिसला तर तुमची जहागीर व सरदारी सरकारजमा होतील हें पक्कें ध्यानांत ठेवा. " हें ऐकून महादजी सैन्यासह निमुटमणें लागलाच चालता झाला.

चांगली वस्तु सर्वांस आवडते, त्याप्रमाणें मृत्यूला हा पेशवा आवडला, असें वाटतें. इ. स. १७७२ सालीं माधवरावाची प्रकृति एकाएकीं बिघडली, ती पुन्हां सुधारली नाहीं. तींतच त्याचा अंत झाला. त्याजबरोबर त्याची बायको रमाबाई सती गेली.

## ३२. नारायणराव पेशव्याचा खून ( इ. स. १७७३ )

माधवरावाच्या मरणकाळच्या इच्छेप्रमाणें रघुनाथराव व इतर कारभारी नारायणरावासह साताऱ्यास गेले. रामराजानें नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें दिलीं, व सखारामबापूला त्याचा कारभारी नेमिलें. नंतर सर्वजण पुण्यास येऊन कारभार चालवूं लागले.

ह्या चुलत्यापुतण्यांची प्रथम कांहीं दिवस गोडी होती. परंतु पुढें गोपिकाबाई ( नारायणरावाची आई ) व आनंदीबाई ह्यांचें

भांडण विकोपास जाऊन पेशव्यानें आपल्या आईच्या सांगण्यावरून रघुनाथरावास शनवारवाड्याच्या एका खोलींत प्रतिबंधांत ठेविलें, ह्या गोष्टीस सखारामबापूशिवाय इतर सर्व कारभाऱ्यांची संमति होती. ह्या वेळेपासून रघुनाथरावाच्या तर्फेच्या मंडळीमध्यें नारायणरावाविरुद्ध गुप्त कट चालू झाला.

पेशव्याची सखारामबापूवर फारशी मर्जी नव्हती, कारण बापूचा रघुनाथरावाकडे विशेष ओढा होता. म्हणून सर्व राज्यकारभार नानाफडणवीस, बजाबा पुरंदरे, हरिपंत फडके यांच्या हातूनच चालला होता.

पुढें पावसाळा सुरू झाला. तो संपतांच कर्नाटकावर स्वारी करण्याचा नारायणरावाचा विचार होता; म्हणून सैन्य वगैरेची तयारी चालली होती. परंतु ईश्वराच्या मनांत कांहीं निराळेंच होतें !

ऑगष्ट महिन्याच्या विसाव्या तारखेस सकाळीं खड्या पायदळापैकीं गारदी लोकांमध्यें कांहीं अस्वस्थता दिसूं लागली. तिच्या कारणाची चौकशी करण्यास पेशव्यानें, पर्वतीचें दर्शन घेऊन परत येत असतां, हरिपंतास सांगितलें. परंतु त्या वेळीं फार उशीर झाला असल्यामुळें जेवणानंतर तिसऱ्या प्रहरीं तपास करूं, असें सांगून हरिपंत घरीं निघून गेला. त्या दिवशीं तिसराप्रहर येण्यापूर्वीच वाड्यांत अनर्थ गुदरणार होता हें त्यास कोठून कळणार ! परंतु आतांचें काम घटकेवर टाकल्यानें कधीं कधीं अनर्थ घडतात, एवढा ह्यावरून बोध घेतां येईल.

दोनप्रहरीं नारायणराव जेवण आटोपून आपल्या महालांत निजला असतां एकदम दचकून उठला. कारण, त्या वेळीं वाड्यांत मोठी गडबड चालली होती. हजार दीड हजार गारदीलोक हातांत नागव्या तरवारी घेऊन आपला थकलेला पगार मागण्यासाठीं 'दीन दीन' करीत वाड्यांत घुसले होते,

आणि त्यांचे नायक सुमेरसिंग, खरकसिंग व महमद यूसफ हे तर खवळून पेशव्याचा तपास करीत फिरत होते.

हा भयंकर देखावा पाहतांच नारयाणराव घाबरला, व रघुनाथरावाकडे धांवत गेला तोंच तेथें सुमेरसिंग वगैरे लोक आले. त्यास पाहतांच पेशवा चुलत्याच्या कमरेस मिठी मारून 'काका, काका, मला वांचवा, मला वांचवा.' असें दीनवाणीनें म्हणूं लागला. तेव्हां रघुनाथरावास दया येऊन त्यानें पेशव्यास सोडण्याविषयीं सुमेरसिंगास नानाप्रकारें सांगितलें; पण सर्व फुकट गेलें.

सुमेरसिंग म्हणाला, 'दादासाहेब, आतां जर आम्ही पेशव्यास सोडूं तर एका घटकेच्या आंत हाच पेशवा आम्ही धन्यावर उठलों म्हणून आह्मां सर्वांस हत्तीच्या पायीं देण्यास कमी करणार नाहीं, करतां तुम्ही दूर सरा, नाहीं तर त्याच्याबरोबर तुम्हांलाही छाटून टाकतों.'

तेव्हां रघुनाथरावाचा निरुपाय होऊन स्वतःचा प्राण वांचविण्यासाठीं तो नारायणरावाची मिठी सोडवून तेथून निघून गेला. त्याच्या पाठोपाठ नारायणराव जाऊं लागला, पण रघुनाथरावाचा हुजऱ्या त्रल्लुचा पवार ह्यानें त्यास मागें ओढिलें तेव्हां नारायणरावाची शुद्धी जाऊन तो भूमीवर पडला. तोंच सुमेरसिंगानें त्याजवर वारावर वार करून त्यास ठार मारिलें! ह्या वेळीं पेशव्याचा प्राण वांचविण्यासाठीं एकदोन स्वामिनिष्ठ नोकर पुढें आले पण त्यांचीहि तीच गति झाली.

---

## ३३. रामशास्त्री प्रभुणे.

माधवराव पेशव्याच्या कारकीर्दींत पुण्याच्या दरबारांत रामशास्त्री प्रभुणे नांवाचे कोणी एक गृहस्थ मुख्य न्यायाधीश होते. रामशास्त्र्यांचा जन्म माहुली गावीं झाला. माहुली हें

साताऱ्यानजीक कृष्णानदीच्या कांठीं एक पुण्यक्षेत्र आहे. घरची गरीब स्थिति असल्यामुळें व आंगीं कांहीं विद्याही नसल्यामुळें रामाला लहानपणीं एका श्रीमंत गृहस्थाच्या घरीं शागीर्दपणा पत्करावा लागला. याच ठिकाणीं त्याचा जन्म हलकीसलकीं कामें करण्यांमध्यें जावयाचा, पण मध्यें कांही अकल्पित गोष्ट घडून आल्यावरून लोकांनीं ज्याला जन्मभर ‘ रामा शागीर्द, रामा शागीर्द ’ म्हणून तुच्छतेनें म्हटलें असतें, त्यालाच सर्व लोक ‘ रामशास्त्री ’ ‘ रामशास्त्री ’ असें आदरानें म्हणूं लागले.

एक दिवस रामाचे यजमान पाय धूत असतां तो त्यांचे पायावर पाणी घालीत होता. यजमानांच्या कानांत उत्तम मोत्यांचा एक ठसठशीत चौकडा लटकत होता; त्याजकडे रामाचें मन गेल्यामुळें पाण्याची धार भलतीकडेच पडूं लागली. म्हणून यजमान रागावून बोलले “ अरे, तुझें लक्ष कोठें आहे ! ” रामा निर्भीड व स्पष्टवक्ता होता. तो खरी गोष्ट सांगण्यास कचरला नाहीं. तो म्हणाला, “ माझें लक्ष आपल्या चौकड्याकडे गेलें होतें. आपल्याप्रमाणें माझ्या कानांतही एक सुंदर चौकडा असावा असें मला वाटलें. ” यजमान बोलले, “ हा वेड्या, तुजसारख्या शागीर्दाला काय असला चौकडा मिळतो ! तो मिळविण्याला लढाईत समशेर गाजवावी किंवा सभेंत विद्या दाखवावी लागते. ” हें बोलणें रामाच्या मनास फार झोंबलें. विद्येवांचून आपलें जिणें व्यर्थ असें त्यास वाटून तो विद्याभ्यासासाठीं काशीस निघून गेला. काशी हें त्या वेळीं विद्या शिकण्याचें मुख्य ठिकाण होतें.

पुढें रामचंद्र काशींत बारा वर्षें पर्यंत काळजीनें अभ्यास करून सर्व शास्त्रांत इतका निपुण झाला कीं, त्याच्या तोडीचा विद्वान् दुसरा कोणीही आढळून येईना; त्यामुळें

त्याची सर्वत्र कीर्ति पसरली. तेव्हां रामशास्त्र्यांस माधवराव पेशवे यांनीं मुख्य न्यायाधीशाची जागा दिली. कोणतेंही काम कळकळीनें केल्यावर त्यांत सिद्धि अशीच मिळावयाची !

रामशास्त्र्यांचा मुख्य गुण निस्पृहता हा होय. न्यायाचे कामीं ते कोणाचीही पर्वा करीत नसत. राजा व रंक हे दोन्ही समान मानून योग्य तो न्याय देत असत. रामशास्त्र्यांइतका निस्पृह, स्पष्टवक्ता, बाणेदार व न्यायी असा गृहस्थ पेशवाईत दुसरा कोणी निपजला नाहीं.

शास्त्रीबुवांची निस्पृहता व स्पष्टवक्तेपणा ह्यांविषयीं पुष्कळ गोष्टी सांगतात. एकदां ते कांहीं जरूरीच्या सरकारी कामासाठीं श्रीमंत माधवराव पेशव्याला भेटण्यास गेले होते. पण पेशवे त्या वेळीं स्नानसंध्येंत गुंतले होते म्हणून भेट झाली नाहीं. पुढें दुसऱ्या वेळीं भेट झाली तेव्हां शास्त्रीबुवा म्हणाले " श्रीमंत, स्नानसंध्या, जपजाप्य इत्यादि कर्में करणें हें आम्हां ब्राह्मणांचें कर्तव्य खरें; पण सध्यां आपण राज्य करूं लागलों आहों, म्हणून प्रजापालन हेंच आपलें मुख्य कर्तव्य झालें आहे. तिकडे दुर्लक्ष करून ब्रह्मकर्मांत वेळ घालविणें योग्य नव्हे. स्नानसंध्येंत वेळ घालवावयाचा असेल तर राज्य सोडून मजबरोबर काशीयात्रेस चलावें. "

दुसरी गोष्ट रघुनाथराव पेशवे असतां घडली. नारायणरावाच्या खुनांत रघुनाथरावाचें आंग किती आहे,ह्याचा शास्त्रीबुवांनीं बारीक शोध चालविला होता. खुनानंतर सहा आठवड्यांनीं त्यांस कांहीं पुरावा सांपडला. त्यावरून त्यांनीं रघुनाथरावास खुनासंबंधीं समक्ष खुलासा विचारिला, तेव्हां ' नारायणरावास धरावें ' असें आपण सुमेरसिंगाला पत्र लिहिल्याचें त्यानें कबूल करून या अपराधास प्रायश्चित्त काय, म्हणून शास्त्रीबुवांस विचारिलें. शास्त्रीबुवा म्हणाले " दादासाहेब,

तुम्हीं राज्यलोभानें ब्रह्महत्त्या करविली. ह्या पातकाला देहान्त प्रायश्चित्त आहे. आतां तुम्हीं पंशवे आहां, तुम्हाला शासन कोण करणार ! हें खरें; पण तुम्ही अधिकारावर आहां तोंवर पुण्यांत राहाणें अयोग्य. " असें स्पष्ट सांगून ते पुणें सोडून लागलेच निघून गेले.

## ३४. बारभाईचें कारस्थान.

नारायणरावाचा खून करण्यांत रघुनाथरावाचें आंग निःसंशय असावें असें प्रत्येकास पहिल्या दिवसापासून वाटत होतें; परंतु सबळ पुरावा नसल्यामुळें कोणीही उघडपणें बोलेना. तथापि सर्वजण राघोबाचा मनापासून तिटकारा करूं लागले. त्याचा मित्र व पक्षपाती सखारामबापू ह्यालाही त्याचा कंटाळा आला. अशा स्थितींत गारदी व रघुनाथरावाच्या पक्षाचे दुसरे कांहीं लोक ह्यांशिवाय प्रत्येक मनुष्याचे मनांत नारायणरावाच्या मृत्यूबद्दल रघुनाथरावाचा सूड घेण्याची बुद्धि उपजणें साहाजिक होतें. असें सांगतात कीं, सखारामबापू, नानाफडणवीस, हरिपंत फडके, त्र्यंबकरावमामा वगैरे माधवरावाच्या वेळच्या कारभारी लोकांनीं आपसांत आणाशपथा घेऊन ठरविलें होतें कीं, " नानासाहेबाचा वंश चालवावयाचा. त्या वंशाशिवाय कारभार करावयाचा नाहीं. " ह्या गुप्त कटास बखरकार ' बारभाईचें कारस्थान ' असें म्हणतात.

असें होतें तरी रघुनाथरावासारख्या तरवारबहाद्दराशीं इतक्यांत उघडपणें वैर करण्याचें सामर्थ्य ह्या कटवाल्यांमध्यें नव्हतें; म्हणून नारायणरावाच्या मागून इ० स० १७७३ च्या नोव्हेंबरांत रघुनाथरावास बिनहरकत पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. शिवाय, त्याच्यावांचून दुसरा कोणी योग्य वारसदारही नव्हता.

रघुनाथराव पेशवा झाल्यावर त्याच्या पूर्ण विश्वासांतल्या मंडळीच्या हातून कारभार चालू झाला; त्यामुळें जुनें कारभारी असून नसून सारखेच झाले. त्यांजवर त्याचा मुळींच विश्वास नव्हता. सखारामबापूबद्दल त्याच्या मनांत संशय नव्हता; पण बापूच आपण होऊन कारभारांत मन घालीनात.

पण बापू कांहीं स्वस्थ बसले नव्हते. बारभाईचें कारस्थान कसें तडीस न्यावें या विचारांत त्यांचें डोकें गढून गेलें होतें. त्यांना रघुनाथरावास पुण्याबाहेर काढावयाचें होतें. तेव्हां त्यांनीं निजामाशीं कारस्थान करून त्याजकडून पेशव्यांच्या मुलखांत बंडाळी माजविली. अर्थात् तिच्या बंदोबस्तासाठीं रघुनाथरावास स्वारीवर जाणें भाग पडलें.

स्वारीस निघतांना रघुनाथरावानें बापूसह सर्व जुने कारभारी आपणाबरोबर घेतले होते. पुढें निजामाचा बंदोबस्त करून रघुनाथरावानें आपला मोर्चा हिंदुस्तानाकडे फिरविला. इसवी सन १७७३ च्या डिसेंबर महिन्यांत सैन्याचा तळ बऱ्हाणपुरीं पडला असतां बापूंनीं परत पुण्यास जाण्याची परवानगी काढिली, आणि " जुन्या कारभारी लोकांस स्वारीबरोबर फिरविणें म्हणजे पदरांत निखारे बांधण्यासारखें आहे, हे केव्हां घात करतील याचा नियम नाहीं; करितां त्यांना पुण्यांत ज्याच्या त्याच्या घरीं ठेवून दारावर सक्त पहारा ठेवणें बरें, " असे त्यांनीं मोठ्या युक्तीनें रघुनाथरावाच्या मनांत भरविलें. तेव्हां त्यानें बापूबरोबर त्या सर्वांची पुण्यास रवानगी केली.

पुण्यांत आल्यावर बापू वगैरे लोकांनीं आपला बेत तडीस नेण्यास चांगलीच सुरवात केली. प्रथम त्यांनीं पुण्यांतील सैन्यास वश करून घेतलें. नारायणरावाची बायको गंगाबाई हिला शनवारवाड्यांतून काढून मजबूत अशा पुरंदर किल्ल्या-

वर नेऊन ठेविलें. आणि तेथें चांगला बंदोबस्त करून श्रीमंत गंगाबाईसाहेब यांच्या नांवें कारभार चालू केला.

नारायणरावास मारिलें तेव्हां गंगाबाई गरोदर होती. ती पुढें नऊ मास पूर्ण होऊन ता. १८ एप्रिल सन १७७४ रोजीं बाळंत झाली व तिला मुलगा झाला. त्यामुळें जिकडे तिकडे आनंद झाला. गांवांत हत्तीवरून साखर वांटली. गुढ्यातोरणें उभारलीं. मोठा उत्सव केला, व मुलाचें नांव माधवराव ठेविलें. पण लोक याला सवाईमाधवराव असें म्हणूं लागले.

आतां बारभाईंच्या कारस्थानास चांगलाच रंग आला. त्यांनीं माधवरावास चाळिसाव्या दिवशींच साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आणून दिलीं, आणि गांवांत माधवरावाच्या नांवानें द्वाही फिरवून रघुनाथराव हा बंडखोर आहे, त्याला कोणी सामील होऊं नये, असें जाहीर केलें. त्याप्रमाणें ठिकठिकाणच्या सरदारांसहि कळविलें, व रघुनाथरावाच्या पारिपत्यासांठीं सैन्य पाठविलें.

पुढें रघुनाथरावानें पेशवाई मिळविण्यासाठीं इंग्लिशांचे मदतीनेंही पुष्कळ प्रयत्न केला पण तो सर्व फुकट गेला.

---

## ३५. नाना फडणवीस.

बाळाजी विश्वनाथाबरोबर जे तिघे भानूबंधु साताऱ्यास आले, त्यांत बाळाजी महादेव भानू म्हणून एक होते. त्यांचा नातू बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणवीस होय. नानांचा जन्म इ. स. १७४१ सालीं झाला.

नानांची मुंज होईपर्यंत त्यांचें विद्येकडे फारसें लक्ष नव्हतें. देवांच्या मूर्ति बनवून त्यांची पूजा करणें व देव आणि साधुसंत ह्यांच्या गोष्टी श्रवण करणें ह्यांचा त्यांना मोठा छंद असे. पण मुंज झाल्यावर ही स्थिति लवकरच बदलली; कारण खुद्द भाऊ-

साहेब त्यांच्या शिक्षणावर नजर ठेवूं लागले. विश्वासराव, माधवराव, मोरोबादादा, बजाबा पुरंदरे हे नानांच्या बरोबर शिकत होते. ह्यांच्या संगतींत नानांनीं लक्ष लावून अभ्यास करून वाहवा मिळविली. ह्यांची बुद्धि फार चलाख असे.

अक्षर वळणदार असून जलद लिहितां येणें, हिशेब व जमाखर्च ह्यांचें ज्ञान असणें, मराठी राज्याचा इतिहास जाणणें, घोड्यावर बसणें, तरवार, भाला, बंदूक ह्यांचा उपयोग करतां येणें, तालीम करणें आणि धर्मसंबंधीं संध्या, रुद्र वगैरेची माहिती असणें इतक्या गोष्टी त्या वेळच्या ब्राह्मणसरदार व मुत्सद्दी ह्यांच्या मुलांस शिकाव्या लागत. ह्या सर्वांत नाना तेराव्या वर्षींच निपुण झाले. त्यामुळें नानासाहेब व भाऊसाहेब ह्यांचीं नानांवर मर्जी असे.

नाना पंधरा वर्षांचे असतां त्यांचे वडील वारले, तेव्हां नानासाहेबांनीं त्यांना फडणविशीचीं वस्त्रें, पालखी वगैरे इतमाम दिला. सर्व राज्याच्या जमाखर्चाच्या लिहिण्यावर देखरेख ठेवणें हें फडणविसाचें मुख्य काम असे.

भाऊसाहेब पानपतच्या स्वारीवर निघाले तेव्हां नाना उत्तरहिंदुस्तानांत तीर्थयात्रा करण्याचे हेतूनें आई व बायको यांसह त्यांच्याबरोबर निघाले. लढाईच्या दिवशीं नाना सकाळपासून भाऊसाहेबांच्या शेजारीं होते. पुढें मराठ्यांचे सैन्याची दाणादाण होऊन लोक पळूं लागल्यावर नानाही बैराग्याच्या रूपानें पळून आले, व त्यांची बायको बैरागिणीच्या वेषांतरानें प्राण बचावून आली. पण आई मात्र पळतां पळतां मुसलमानांच्या हातीं लागली !

माधवरावाचे नाना हे बालमित्र असल्यामुळें त्यांच्यावर माधवरावाचा बहुत लोभ व विश्वास होता. तो प्रत्येक महत्वाच्या कामांत नानांची मसलत घेत असे. महादजी शिंदे व

तुकोजी होळकर ह्यांना नानांच्या सांगण्यावरूनच अधिकार मिळाले होते. नाहीं तर शिंदे व होळकर ह्यांच्या दौलतीस निराळेच मालक करण्याचें रघुनाथरावाच्या मनांत होते; पण माधवरावाजवळ नानांचें वजन चांगलें असल्यामुळें तें सिद्धीस गेलें नाहीं.

लहानपणापासून नानांचा ओढा नानासाहेब व त्यांचा वंश ह्यांजकडेच होता. माधवरावाच्या कारकीर्दींत राज्यास अपाय करण्याचें रघुनाथरावाचें अप्पलपोटी धोरण व नारायणरावास कैद करण्यांत असलेलें आंग हीं दिसून आल्यामुळें नानांच्या मनांत रघुनाथराव व त्यांचा वंश ह्यांबद्दल अत्यंत तिटकारा उत्पन्न झाला होता.

नानांचें खरें कौशल्य सवाईमाधवरावाच्या कारकीर्दींत दिसून आलें. ह्या वेळीं ते मुख्य कारभारी होते. रघुनाथरावाच्या पक्षाच्या लोकांनीं सवाईमाधवरावाविरुद्ध ज्या ज्या मसलती केल्या त्या त्या नानांनीं आपल्या हुशारीनें आणि महादजी शिंदे, हरिपंत फडके व परशुरामपंत पटवर्धन ह्यांच्या लष्करी सामर्थ्यानें हाणून पाडिल्या.

रघुनाथरावाचा बंदोबस्त केल्यावर नानांचें लक्ष मराठी-राज्याचा उत्कर्ष करण्याकडे लागलें आणि पांचदहा वर्षांच्या अवकाशांत निजाम, म्हैसूरचा टिपू व उत्तर हिंदुस्तानांतील रोहिले, जाट आणि रजपूत यांस पादाक्रांत करून त्यांनीं मराठी राज्याचें वैभव बरेंच वाढविलें.

ह्या सर्व गोष्टी नानांनीं जरी आपल्याच शहाणपणावर केल्या होत्या तरी ‘ हें सर्व पेशव्यांचे पुण्याईनें होत आहे ’ असें ते म्हणत असत. इतकी त्यांच्याठायीं पेशव्यांबद्दल पूर्ण निष्ठा होती. नानांच्या स्वामिनिष्ठेबद्दल असें सांगतात कीं, हे रोज

सरकारी कामास आरंभ करण्यापूर्वीं ' ईश्वरा, पेशव्यांचें कल्याण कर ' असें मनोभावानें म्हणत असत.

अशा प्रकारचा हा थोर पुरुष इ० स० १८०० सालीं मरण पावला. तेव्हां त्या वेळचे पुण्याचे इंग्लिश रेसिडेंट कर्नल पामरसाहेब म्हणाले, " नाना गेले व त्यांच्याबरोबर मराठेशाहींतील शहाणपणा व बातबेतही गेला ! "

---

## ३६. महादजी शिंदे.

मुलांनो, पानपतच्या लढाईंत मराठ्यांची दणादाण झाल्यावर महादजी इतरांबरोबर पळूं लागला, हें तुम्हांला मागील एका गोष्टींत कळलें आहे. यानंतरची त्याची हकीकत अशी आहे:—

महादजीनें सर्व सैन्याची दाणादाण झालेली पाहून इतरांबरोबर रणांतून पळ काढिला; तोंच त्याच्यावर एका पठाणाची नजर जाऊन तो त्याचा पाठलाग करूं लागला. महादजी पुढें व पठाण मागें याप्रमाणें ते बराच वेळ पळत होते. शेवटीं महादजीची घोडी एका नाल्यावरून उडी मारीत असतां उडी चुकून नाल्यांत पडली. अर्थात् महादजी पठाणाच्या हातीं लागला तेव्हां तो महादजीच्या डाव्या पायावर वार करून त्याच्या आंगावरील दागिने व त्याची घोडी घेऊन परत निघून गेला. ह्या वारामुळें महादजी जन्माचा लंगडा झाला.

महादजी त्या नाल्यांत कण्हत पडला असतां मराठ्यांच्या सैन्यांतून पळून आलेला राणाखान नांवाचा एक शिंद्याच्याच फौजेंतील शिपाई भिस्त्याचे वेषानें येत होता, त्यानें महादजीस ओळखिलें व आपल्या बैलावर बसवून दक्षिणेंत आणिलें. राणाखानाचे हे उपकार महादजी जन्मभर विसरला नाहीं. त्यानें त्यास एक गांव इनाम देऊन अंबारींत आपल्या शेजारीं बस-

ण्याचा मान दिला. तें इनाम व तो मान अद्याप त्याचे वंशज उपभोगित आहेत.

पानपतच्या लढाईनंतर महादजीनें आपणास शिंदे-घराण्याच्या सरदारीचीं वस्त्रें मिळावीं म्हणून पेशव्याकडे विनंति केली. रघुनाथरावाच्या मनांत महादजीस सरदारी देण्याचें नव्हतें, तथापि माधवरावानें त्याचें न ऐकतां राणोजीचा महादजीशिवाय दुसरा कोणी जवळचा वारस जिवंत नाहीं असें जाणून त्यालाच सरदारी दिली. सवाई-माधवरावाविरुद्ध रघुनाथरावास महादजी मिळाला नाहीं, त्याचें हेंच कारण असावें.

महादजीच्या आंगीं उत्तम युद्धकौशल्य होतें. त्यानें सैन्यास युरोपियन पद्धतीची कवाईत शिकविली व तोफ-खाना वाढविला, आणि त्याच्या बळावर रजपूत राजे, रोहिले व मोंगल ह्यांच्यावर दरारा बसवून त्यांजकडून भरपूर खंडणी वसूल केली. अठराव्या शतकाच्या अखेरीस महादजीचें प्रस्थ हिंदुस्तानांत फारच वाढलें होतें. दिल्लीचा बादशाह दुसरा शाहाअलम ह्याचा वजीर गुलाम कादर इतका प्रबल व उन्मत्त झाला होता कीं, त्यानें प्रत्यक्ष बाद-शाहाचे डोळे काढविले. त्याचें पारिपत्य करण्याचें सामर्थ्य बादशाहामध्यें राहिलें नव्हतें. तेव्हां त्यानें त्या वजिरास पकडून देण्याविषयीं महादजीस सांगितलें. त्याप्रमाणें महादजीनें काम फत्ते केल्यावर बादशाह खूष होऊन त्यानें महादजीस आपला वजीर नेमिलें. परंतु स्वामिनिष्ठ महा-दजीनें तो मान स्वतः न स्वीकारतां, आपले धनी श्रीमंत पेशवेसरकार यांस तो देण्याविषयीं विनंति केली. तेव्हां बाद-शाहानें सवाईमाधवरावाचे नांवानें वजिरातीचा पोशाक

दिला, व महादजीस पेशव्याचा मुतालिक म्हणून नेमिलें. ही गोष्ट इ० स० १७९० सालीं झाली.

हा पोशाक पेशव्यास अर्पण करण्याठीं महादजी इ० स० १७९२ सालीं पुण्यास आला. नंतर मोठा दरबार भरवून पेशव्यानें तो पोशाक आंगावर घातला. तेव्हां श्रीमंत महादजीवर बहुत खूष झाले.

अशा प्रकारचा हा विजयशाली पुरुष इ० स० १७९४ सालीं वानवडीस एकाएकी नवज्वरानें मरण पावला.

---

## ३७. खर्ड्याची लढाई. (इ० स० १७९५)

बाजीरावाच्या वेळेपासून निजामाकडून पेशव्यास चौथाई व सरदेशमुखी ह्या दोन हक्कांबद्दल पैसा मिळत असे. हा पैसा थोरल्या माधवरावाच्या मृत्यूपर्यंत दरसाल सुरळीतपणें आला. पुढें नारायणरावाचा खून होऊन राज्यांत सर्वत्र अव्यवस्था झाल्यामुळें निजामानें पैसा पाठविण्याची टाळाटाळ केली. तथापि रघुनाथरावाच्या धांदलीमुळें तिकडे पेशव्यांचें दुर्लक्षच झालें. पुढें रघुनाथरावाचा पूर्ण बंदोबस्त केल्यावर नाना फडणविसानें पैसा पाठविण्याबद्दल वकिलामार्फत निजामास वरचेवर कळविलें. पण निजामानें कांहींना कांहीं सबब सांगून पैसा पाठविण्याचें लांबणीवर टाकिलें.

शेवटीं लढाईशिवाय पैसा वसूल होत नाहीं, असें स्पष्ट दिसूं लागलें. तेव्हां निजामावर स्वारी करण्याचा नाना व महादजी ह्यांचा बेत ठरला. पण तो तडीस जाण्यापूर्वीं नानांचे इतकेंच नव्हे, तर मराठी राज्याचे मुख्य आधारस्तंभ महादजी शिंदे व हरिपंत फडके एकाएकीं मरण पावले. तेव्हां लढाईचा बेत काहीं दिवस लांबणीवर टाकणें नानांस भाग पडलें

पण पुढें लवकरच लढाई उपस्थित होण्यास एक आकस्मिक कारण असें झालें कीं, दरसालप्रमाणें नानांनीं बाकीबद्दल यादी तयार करून आपल्या वकिलामार्फत ती निजामाकडे पाठविली. तेव्हां हिशोबासंबंधानें वकील व निजामाचा दिवाण मशीरउलमुल्क ह्यांमध्यें मोठा वाद झाला. दिवाण म्हणाला, " या यादीवरून आमची कांहीं समजूत पडत नाहीं. स्वतः नानानें इकडे येऊन हिशोबाचा उलगडा करावा." तेव्हां वकिलांनीं उत्तर केलें, " नानांस पुणें सोडून इकडे कसें येतां येईल ? त्यांना दुसरीं महत्त्वाचीं कामें पुष्कळ आहेत." त्यावर दिवाण खोंचून बोलला, " कसें येतां येईल ! दम धरा, दाखवितों कसा येत नाहीं तो." याशिवाय आणखीही कित्येक गोष्टी नाना व पेशवे यांच्या इभ्रतीस कमीपणा आणण्याजोग्या निजामाच्या दरबारांत घडून आल्यामुळें पेशव्यांचे वकील रागानें पुण्यास निघून आले, व त्यांनीं हें सर्व वर्तमान नानांस निवेदन केलें. तेव्हां नानांस त्याची चीड येऊन त्यांनीं लढाईची तयारी चालविली.

पेशव्यांमध्यें बरींच वर्षें यादवी माजून राहिली होती, तेव्हां तिच्यामुळें त्यांची शक्ति बरीच क्षीण झाली असावी, असें जाणून ती एकदां कसास लावून पाहावी आणि आपला कांहीं नफा झाल्यास तो साधून घ्यावा या हेतूनें निजामाचे मनांत पेशव्यांशीं लढाई करण्याचें फार दिवस होतेंच. म्हणून पेशवे लढाईचे तयारीला लागतांच निजामही त्या कामाला लागला.

दोघांनींही आपापल्या परीनें कडेकोट तयारी केली; व दोन्हीं सैन्यें एकमेकांवर चाल करून निघालीं. उभयतांची निजामसरकारच्या हद्दींत खर्डें गांवीं गांठ पडली. लढाईचें

तोंड सुरू होऊन लहानसहान चकमकीही झडल्या, त्यांत कधीं पेशव्यास तर कधीं निजामास जय येई.

अशी स्थिति असतां एक दिवस रात्रीं दोन्हीं सैन्यें विश्रांति घेत पडलीं असून सर्वत्र सामसूम झालें होतें. तों मध्यरात्रीच्या सुमारास मराठ्यांकडील कांहीं स्वार पाण्यासाठीं एका ओढ्या- पाशीं आले. तेथें जवळच शत्रूकडील एक टोळी उतरलेली होती. तिनें त्या स्वारांवर गोळ्या झाडल्या. ते बार ऐकतांच निजामाची फौज खडबडून जागी झाली व शत्रूचा छापा आला या धास्तीनें वाट फुटेल तिकडे पळत सुटली. उठे तो दुसरा पळतो म्हणून आपणही पळत सुटे. कोणीही खऱ्या कारणाचा तपास करीना. स्वतः निजामही थोड्याशा लोकां- निशीं खर्ड्यांच्या किल्ल्यांत शिरला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मराठ्यांनीं किल्ल्यास वेढा दिला. निजाम दोन दिवस लढला, पण पुढें निभाव लागेना. तेव्हां तो तह करण्यास तयार झाला. " मशीर उल्मुल्कास पहिल्यानें आमच्या स्वाधीन करा मग तहाचें बोलणें, " असा निरोप नानांनीं पाठविला. तेव्हां निरुपाय होऊन निजामानें मरा- ठ्यांच्या गोटांत वजिराची रवानगी केली, नंतर तह झाला. मराठ्यांस लढाईचा खर्च व वसुलाची बाकी मिळाली.

---

## ३८. वसईचा तह ( इ० स० १८०२ ).

खर्ड्याच्या लढाईनंतर लवकरच मराठी राज्याच्या इमा- रतीस एक फार मोठा धक्का बसला व त्यानें ती इमारत पुढें थोडक्याच काळांत ढांसळून पडून जमीनदोस्त झाली. तो धक्का म्हणजे सवाईमाधवरावाचा अकाली मृत्यु हा होय.

रघुनाथरावाला सवाईमाधवरावाच्या वयाचा बाजीराव म्हणून एक मुलगा असून तो शिवनेरी किल्ल्यावर नजरकैदेंत

होता त्याचा व पेशव्याचा पत्रद्वारें स्नेह जमला. ही गोष्ट नानांस समजली. तेव्हां त्यांनीं पेशव्यास नीट समजावून सांगितलें कीं, "श्रीमंत, आपल्या वडिलांचा ज्या आनंदीबाईनें खून करविला तिचा बाजीराव हा मुलगा असल्यामुळें आपण त्याच्याशीं अगदीं संघट्टन ठेवूं नये, त्यापासून आपणास अपाय होईल." हा नानांचा उपदेश पेशव्यास रुचला नाहींच, पण उलट नानांचा आपणावर या कामीं जुलूम आहे असा त्याचा दृढ समज झाला; त्यामुळें त्याचा स्वभाव दिवसानुदिवस त्राशिक होत जाऊन शेवटीं इ०स० १७९५ सालीं एक दिवस त्यानें शनवारवाड्याच्या तिसऱ्या मजल्यावरून खालीं चौकांत उडी टाकून आत्महत्या केली! ह्यानें इ० स० १७७४ पासून १७९५ पर्यंत पेशवाई चालविली.

सवाईमाधवरावास पुत्रसंतान नव्हतें. म्हणून त्याच्यामागें पेशवाईचा अधिकार कोणास द्यावा याबद्दल नानांस मोठा विचार पडला. बाजीराव हा जवळचा वारस होता; पण तो राज्यास अपाय करणाऱ्या रघुनाथरावाचा मुलगा असल्यामुळें 'खाण तशी माती' ह्या म्हणीप्रमाणें तोही राज्यास अपायच करील म्हणून त्याला पेशव्याच्या गादीवर बसविण्याचें नानांस योग्य वाटेना. त्यांच्या मनांत सवाईमाधवरावाच्या बायकोच्या मांडीवर दत्तक पुत्र बसवून त्याला पेशवा करण्याचें होतें, परंतु महादजीचा दत्तक पुत्र दौलतराव शिंदे यानें बाजीरावाचा पक्ष उचलला. शिंद्याचें सामर्थ्य मोठें होतें, तेव्हां जी गोष्ट शिंदे पुढें निश्चयानें करणार ती आपणच पूर्वीं कां करूं नये, हा विचार मनांत आणून नानांनीं इ० स० १७९६ सालीं बाजीरावास शिवनेरीहून आणवून पेशवाईपदावर स्थापिलें.

पुढें इ० स० १८०० मध्यें नाना मरण पावले. नंतर

बाजीराव आपल्या मनास येईल तसा वागूं लागला. पूर्वीं रघुनाथरावास जे जे लोक प्रतिकूळ होते त्या सर्वांना त्यानें बंदिखाना दाखविला, ह्यामुळें लोकांमध्यें त्याच्याविषयीं अप्रीति उत्पन्न झाली.

ह्याच संधीस बाजीराव व यशवंतराव होळकर यांमध्यें बेबनाव झाला. यशवंतराव हा इंदूरच्या तुकोजीराव होळकराचा मुलगा. यशवंतरावाचा भाऊ मल्हारराव ह्याची बायको व मुलगा हीं दोघें पुण्यास होतीं; त्यांना बाजीराव यशवंतरावाच्या स्वाधीन करीना हें बेबनावाचें कारण होतें.

तेव्हां यशवंतरावानें पुण्यावर स्वारी केली. पेशवे व होळकर ह्यांमध्यें लढाई होऊन तींत पेशव्याचा पराभव झाला. पेशवा पुणें सोडून कोंकणाकडे पळत सुटला. यशवंतरावानें पेशव्यास परत पुण्यास बोलाविलें, पण त्यास होळकराचा विश्वास पटेना, म्हणून तो परत आला नाहीं. तेव्हां होळकरानें बाजीरावाचा भाऊ अमृतराव ह्यास पेशवा होण्याबद्दल विनंति केली. पण तिला तो मान्य होईना. तेव्हां यशवंतरावानें अमृतरावाचा मुलगा विनायकराव ह्यास पेशवा करून अमृतरावास त्याचा कारभारी नेमिलें, आणि आपण उत्तरेकडे निघून गेला.

इकडे बाजीराव पुण्याहून निघाला तो वसईस इंग्लिशांकडे आला. तेथें राज्यांतील बंडबखेडे मोडून आपणास पुनः पेशवाईपद मिळावें म्हणून त्यानें इंग्लिशांबरोबर इ० स० १८०२ सालच्या अगदीं अखेरीस तह केला. त्यांत असें ठरलें कीं, " इंग्लिशांनीं आपली दहा हजार फौज पेशव्याचे रक्षणासाठीं पुण्यास ठेवावी, व पेशव्यानें तिच्या खर्चासाठीं २६ लक्षांचा मुलुख इंग्लिशांस द्यावा, इतर युरोपियन चाकरीस ठेवूं नयेत आणि इंग्लिशांच्या सल्लयाशिवाय कोणाशीं तह किंवा लढाई करूं नये. "

पुढें इंग्लिशांचे मदतीनें बाजीराव पेशवा झाला; व त्यामुळें पेशव्यांच्या राज्यकारभारांत इंग्लिशांचा बराच हात शिरला.

---

## ३९. पेशवाईचा शेवट ( इ० स० १८१८. ).

बाजीरावास इंग्लिशांच्या मदतीनें पेशवाई मिळाली व त्यांच्याच बळावर त्यानें दहाबारा वर्षें राज्य चालविलें. पण त्याच्या मनांत इंग्लिशांविषयीं स्नेहभाव मुळींच नव्हता. त्याचा स्वभाव चंचल व कपटी होता. त्यानें इंग्लिशांच्या नाशाबद्दल गुप्तपणें तयारी चालविली होती.

अशा स्थितींत एक गोष्ट घडली. तिजमुळें इंग्लिश व पेशवा यांमध्यें उघडपणें लढाई सुरू झाली व तींत पेशवाईचा शेवट झाला. ती गोष्ट अशी:—

पेशवा व गायकवाड ह्यांच्यामध्यें खंडणीसंबंधानें कांहीं लढा उत्पन्न झाला होता. तो तोडण्यासाठीं गायकवाडाकडून गंगाधरशास्त्री नांवाचा एक वकील पुण्यास आला. त्याच्या प्राणाची हमी इंग्लिशांनीं घेतली होती; तथापि इ. स. १८१८ सालीं पंढरपुरीं त्याचा खून झाला ! ह्या खुनाचा तपास लावितां तो त्र्यंबकजी डेंगळे यानें करविला असें इंग्लिशांस कळून आलें. त्र्यंबकजी हा पेशव्याचा आवडता असून मुख्य सल्लागार होता. त्याला आपल्या ताब्यांत देण्याविषयीं इंग्लिशांनीं पेशव्यास मोठी निकड लाविली. तेव्हां निरुपाय होऊन पेशव्यानें त्यास त्यांच्या हवालीं केलें. इंग्लिशांनीं त्र्यंबकजीस ठाण्याच्या किल्ल्यांत ठेविलें, पण तेथून तो पळून गेला व सह्याद्रींत भिल्ल व रामोशी यांच्या आश्रयानें राहिला. अद्यापही त्र्यंबकजीस पेशवा गुप्तपणें साह्य करितो असें इंग्लिशांस वाटल्यावरून त्यांनीं त्याचा पत्ता लावून देण्याविषयीं पेशव्यास फारच निकड

लाविली तेव्हां पेशव्यानें त्यास पकडून आणण्याविषयीं जाहीरनामे लाविले.

नंतर सन १८१७ सालीं इंग्लिश व पेशवे ह्यांचा पुन्हा तह झाला. त्यामुळें पेशव्याचा आणखी कांहीं मुलूख इंग्लिशांकडे जाऊन त्यांचें वर्चस्वही पुण्याच्या दरबारावर विशेष बसलें. ही गोष्ट बाजीरावास मुळींच आवडली नाहीं. तेव्हां तो इंग्लिशांच्या नाशाची उघडपणें तयारी करूं लागला.

त्यानें आपली सर्व फौज सज्ज करून तिच्यावर बापू गोखले नांवाच्या शूर व धाडसी सरदाराची नेमणूक केली; आणि शिंदे, होळकर व भोंसले यांजकडे वकील पाठवून त्यांची इंग्लिशांविरुद्ध उठावणी केली.

पुण्यास मुळा आणि मुठा ह्या दोन नद्यांच्या संगमावर इंग्लिशांचा रेसिडेंट एल्फिन्स्टन् साहेब राहात असे. त्याजवर हल्ला करण्याचा पेशव्याचा विचार होता. परंतु ह्या कामास पेशव्याच्या हलगर्जीपणामुळें विलंब लागला, म्हणून तो विचार त्याच्या मनांतच राहिला. कारण पेशव्याची लढाई विषयीं तयारी पाहतांच रेसिडेंटानें ही गोष्ट मुंबईसरकारास कळवून मदतीस सैन्य जरूर पाठविण्यास विनंति केली होती. तीप्रमाणें सैन्य पुण्यास येऊन दाखल झालें.

मुंबईहून कुमक येतांच रेसिडेंट संगमावरील आपलें ठाणें उठवून खडकीच्या मैदानांत सैन्यासह येऊन राहिला. नंतर पेशव्यानें बापू गोखले ह्याजकडून त्याजवर हल्ला करविला. इंग्लिशांच्या सैन्यापेक्षां मराठ्यांचें सैन्य पुष्कळ होतें. परंतु इंग्लिश शिपायांच्या हातांत लांब लांब पल्लयाच्या बंदुका असल्यामुळें शेवटीं मराठ्यांनाच पळ काढावा लागला !

झालें ! ह्या पराजयामुळें बाजीरावाचें अवसान गळून तो पुणें सोडून पंढरपुराकडे पळून गेला, कारण इंग्लिश

पुण्यावर हल्ला करणार असें त्याला समजलें होतें; त्याच्यामागें इंग्लिशांचें सैन्य होतेंच. त्याची व पेशव्याच्या सैन्याची सन १८१८ सालीं पुणें जिल्ह्यांतील कोरेगांवीं गांठ पडून लढाई झाली. तींत पेशव्याचा पराभव झाला. नंतर पंढरपुराजवळ अष्टे येथें आणखी एक लढाई झाली. तींत बापू गोखले मारला गेला, व पेशव्याच्या सैन्याची दाणादाण होऊन तें वाट फुटेल तिकडें पळत सुटलें !

बाजीरावाचा सर्व भरंवसा कायतो बापू गोखले याजवर होता. तो मृत्यु पावतांच त्यानें भोंसले, शिंदे किंवा होळकर यांची मदत घेण्यासाठीं नागपुरची वाट धरिली. पण तिकडेही पूर्ण निराशा ! कारण बाजीरावाच्या उठावणीवरून ह्या सरदारांनीं इंग्लिशांशीं लढाई सुरू केली होती, पण त्यांचाही पेशव्याप्रमाणेंच पराभव झाला होता. तेव्हां पुढें काय करावें हा विचार पेशव्यास येऊन पडला. इंग्लिशांचें सैन्य पाठीवर होतेंच. बरोबरचे लोक पळतां पळतां थकले. म्हणून त्यांतील बरेचसे त्यास सोडूनही गेले. तेव्हां निरुपाय होऊन इंदुराजवळ मालकम साहेबाचा मुक्काम होता तेथें त्यास पेशवा शरण गेला, आणि त्यानें इ. स. १८१८ सालीं सर्व राज्य इंग्लिशांच्या हवालीं केलें.

नंतर इंग्लिशांनीं शनवारवाड्यावर आपला बावटा लाविला आणि इंग्लिश अंमल सुरू झाल्याबद्दल शहरांत जाहीर केलें. बाजीरावास दरसाल आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन त्याच्या इच्छेप्रमाणें त्यास त्याचीं माणसें व आश्रित ह्यांसह गंगातीरीं ब्रह्मावर्त येथें नेऊन ठेविलें

---

## ४०. ब्रिटिश–अंमल.

महाराष्ट्राची सत्ता पेशव्यांकडून इंग्लिशांकडे आल्यावर

त्यांनीं सातारा येथील शिवाजीच्या वंशाची गादी पूर्वींप्रमाणें चालू ठेवून वारणा व निरा या नद्यांमधील सुमारें १४ लक्ष रुपये उत्पन्नाचा प्रदेश त्या गादीस तोडून दिला. ही गादी इ० स० १८४८ पर्यंत चालली. पुढें गादीस औरस वारस नसल्यामुळें तो मुलूख इंग्लिशांच्या राज्यांत सामील झाला.

बाकीच्या प्रदेशावर इ० स० १८१८ मध्यें एल्फिन्स्टन् साहेबास प्रथम कमिशनर म्हणून नेमिलें. ह्या साहेबांस इकडील लोकांची चांगली माहिती होती. त्यानीं प्रांतामध्यें स्वस्थता होण्यासाठीं एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्यें असा मजकूर होता कीं, " पूर्वींच्या सरकारानें दिलेल्या जहागिरी, इनामें, वतनें, व नेमणुका पूर्वींप्रमाणेंच ज्याच्या त्याच्याकडे चालू राहातील. धर्मसंबंधांत कोणावरही जुलूम होणार नाहीं. लोकांचे जीवित व मालमत्ता सुरक्षित राखण्याबद्दल योग्य खबरदारी ठेविली जाऊन लोकांच्या भरभराटीचे उपाय ह्या सरकारकडून योजिले जातील. "

पुढें लवकरच देशांतील दंगा बंद होऊन शेतीचीं कामें सुरू झालीं. त्यामुळें महाराष्ट्रांतील मोठा वर्ग जो शेतकरी लोकांचा तो सुखी झाला. त्याचप्रमाणें मध्यम–स्थितींतील लोकांचीहि कमिशनरसाहेबांनीं सोय लाविली. पेशवाईंत जे लाक विद्या शिकून दरबारांत कारकुनी वगैरे करीत होते त्यांस सरकारी नोकरी देण्याची तजवीज केली, व सैन्यामध्यें शिपाई होते त्यांस इंग्रजी पटलणींत घेतलें.

अशा प्रकारें कोणत्याही वर्गाच्या लोकांस पेशवाई बुडाल्याचें दुःख वाटूं नये अशी योजना त्या शाहाण्या व दूरदर्शी एल्फिन्स्टन् साहेबांनीं केली. या कारणामुळें त्यांना इ० स० १८१९ मध्यें मुंबईचे गव्हर्नर नेमिलें. हल्लीं या

साहेबांच्या नांवानें मुंबईंत एक इंग्रजी हायस्कूल व एक इंग्रजी कॉलेज चालू आहे.



## एलिफन्स्टन् साहेब

पेशव्याकडून जो मुलूख इंग्लिशांस मिळाला, त्याचे त्यांनीं खानदेश, मध्यभाग व कर्नाटक असे तीन भाग केले आणि त्यांजवर तीन पोटकामगार नेमून त्यांच्यामार्फत व्यवस्था चालविली. होतां होईतों बहुतेक जुन्या गोष्टी तशाच ठेवावयाच्या; फरक करणें झाल्यास तो थोडा व बेताबातानें करावयाचा, अशी त्यांची पद्धत होती. त्यामुळें नवा अंमल झाला तरी लोकांस वाईट वाटलें नाहीं.

देशांत स्वस्थता होऊन लोक आपआपल्या धंद्यास लागल्यावर इंग्रज सरकारनें लोकांच्या उपयोगाच्या अशा गोष्टी केल्या. त्यांपैकीं कांहीं पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत:—

१ सर्व जमिनीची मोजणी करून प्रत्येक कुळानें सारा

किती द्यावयाचा हें ठरवून टाकिलें. ह्या बाबतींत तीस वर्षांनीं फेरतपासणी होत असते.

२. लोकांच्या मुलांस शिक्षण मिळण्याकरितां साधारण मोठ्या अशा प्रत्येक गांवीं शाळा घातली असून जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं इंग्रजी शाळा ठेविली आहे.

३. सर्वांस योग्य न्याय मिळून कोणावरही जुलूम होऊं नये म्हणून जागोजाग न्यायाच्या कचेऱ्या स्थापिल्या.

४. टपाल, तारायंत्र, आगबोटी आणि आगगाड्या ह्यांची देशामध्यें सुरुवात केल्यामुळें व्यापार व वदळणवळण ह्याची मोठी सोय झाली आहे.

५. 'सार्वजनिक कामाचें खातें' काढून त्याजकडून देशांत सडका, कालवे, धर्मशाळा, तलाव, विहिरी वगैरे लोकोपयोगी कामें चालू केलीं आहेत.

६. मोठमोठ्या शहरांत दवाखाने घालून गरीब लोकांस फुकट औषधें मिळण्याची तजवीज केली आहे.

# परिशिष्ट—अ.

## मराठेराजे.

( शिवाजीचा आजा मालोजी, जन्म इ० स० १५५०, मृत्यु इ० स० १६१९. शिवाजीचा बाप शहाजी, जन्म इ० स० १५९४, मृत्यु इ० स० १६६४. )

| | |
|---|---|
| १ शिवाजी—१६७४—१६८० | पर्यंत राज्य केलें. |
| २ संभाजी—१६८०—१६८९ | ,, |
| ३ राजाराम—१६८९—१७०० | ,, |
| ४ शिवाजी व ताराबाई—१७००—१७०८ | ,, |
| ५ शाहू—१७०८—१७४९ | ,, |
| ६ रामराजा—१७४९—१७७७ | ,, |
| ७ ( दुसरा ) शाहू—१७७७—१८०८ | ,, |
| ८ प्रतापसिंह—१८०८—१८३९ | ,, |
| ९ शहाजी—१८३९—१८४८ | ,, |

## पेशवे.

१ मोरोपंत पिंगळे—१६५९—१६८२.
२ निळोपंत पिंगळे—१६८९—१७०८.
३ बहिरोपंत पिंगळे—१७०८—१७१४.
४ बाळाजी विश्वनाथ—१७१४—१७२०.
५ बाजीराव—१७२०—१७४०.
६ बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब—१७४१—१७६१.
७ माधवराव—१७६१—१७७२.
८ नारायणराव—१७७२—१७७३.
९ रघुनाथराव—१७७३—१७७४.
१० सवाईमाधवराव—१७७४—१७९५.
११ (दुसरा) बाजीराव—१७९६—१८१८.

किती द्यावयाचा हें ठरवून टाकिलें. ह्या बाबतींत तीस वर्षांनीं फेरतपासणी होत असते.

२. लोकांच्या मुलांस शिक्षण मिळण्याकरितां साधारण मोठ्या अशा प्रत्येक गांवीं शाळा घातली असून जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं इंग्रजी शाळा ठेविली आहे.

३. सर्वांस योग्य न्याय मिळून कोणावरही जुलूम होऊं नये म्हणून जागोजाग न्यायाच्या कचेऱ्या स्थापिल्या.

४. टपाल, तारायंत्र, आगबोटी आणि आगगाड्या ह्यांची देशामध्यें सुरुवात केल्यामुळें व्यापार व दळणवळण ह्याची मोठी सोय झाली आहे.

५. 'सार्वजनिक कामाचें खातें' काढून त्याजकडून देशांत सडका, कालवे, धर्मशाळा, तलाव, विहिरी वगैरे लोकोपयोगी कामें चालू केलीं आहेत.

६. मोठमोठ्या शहरांत दवाखाने घालून गरीब लोकांस फुकट औषधें मिळण्याची तजवीज केली आहे.

# परिशिष्ट—अ.

## मराठेराजे.

(शिवाजीचा आजा मालोजी, जन्म इ० स० १५५०, मृत्यु इ० स० १६१९. शिवाजीचा बाप शहाजी, जन्म इ० स० १५९४, मृत्यु इ० स० १६६४.)

| | | |
|---|---|---|
| १ | शिवाजी-१६७४-१६८० | पर्यंत राज्य केलें. |
| २ | संभाजी-१६८०-१६८९ | ,, |
| ३ | राजाराम-१६८९-१७०० | ,, |
| ४ | शिवाजी व ताराबाई-१७००-१७०८ | ,, |
| ५ | शाहू-१७०८-१७४९ | ,, |
| ६ | रामराजा-१७४९-१७७७ | ,, |
| ७ | (दुसरा) शाहू-१७७७-१८०८ | ,, |
| ८ | प्रतापसिंह-१८०८-१८३९ | ,, |
| ९ | शहाजी-१८३९-१८४८ | ,, |

## पेशवे.

१ मोरोपंत पिंगळे-१६५९-१६८२.
२ निळोपंत पिंगळे-१६८९-१७०८.
३ बहिरोपंत पिंगळे-१७०८-१७१४.
४ बाळाजी विश्वनाथ-१७१४-१७२०.
५ बाजीराव-१७२०-१७४०.
६ बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब-१७४१-१७६१.
७ माधवराव-१७६१-१७७२.
८ नारायणराव-१७७२-१७७३.
९ रघुनाथराव-१७७३-१७७४.
१० सवाईमाधवराव-१७७४-१७९५.
११ (दुसरा) बाजीराव-१७९६-१८१८.

## ध्यानांत ठेवावयाजोग्या गोष्टींचा काळ.

१२९४ अलाउद्दीनाचा देवगिरीवर हल्ला.

१३१२ दक्षिणेंत मुसलमानी अंमल सुरू झाला.

१३४४ गुजराथेंत बंड झालें.

१३४७ बहामनी राज्याची स्थापना.

१५२६ बहामनी राज्य मोडून त्याचीं पांच राज्यें होतात.

१५९५ मुरादनें अहमदनगरास वेढा दिला.

१५९९ जाधवरावाकडील रंगपंचमीचा समारंभ.

१६०४ शहाजी व जिजाबाई ह्यांचें लग्न.

१६१२ तुकाराममहाराजांचा जन्म.

१६२७ शिवाजीचा जन्म.

१६४६ शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला.

१६४७ दादोजी कोंडदेवाचा मृत्यु.

१६४८ शिवाजीनें कल्याण प्रांत घेतला.

१६४९ शहाजीस कैद केलें व तुकाराममहाराजांचा मृत्यु.

१६५३ शहाजीस पुन्हां कर्नाटकांत पाठविलें.

१६५९ अफझुलखानाचा वध.

१६६० सीदी जोहरची पन्हाळ्यावर चाल.

१६६२ शिवाजी व विजापूरकर यांचा तह. शाहिस्तेखानाची शिवाजीवर स्वारी

१६६५ दिलीरखान व मुरारबाजी यांचें युद्ध.

१६६६ शिवाजी दिल्लीस जातो.

१६७० तानाजीची सिंहगडावर स्वारी व तींत त्याचा मृत्यु.

१६७४ शिवाजीस रायगडावर राज्याभिषेक होतो.

१६८० शिवाजीचा मृत्यु.

१६८१ रामदासस्वामींचा मृत्यु.

१६८३ औरंगजेब बादशाहाची दक्षिणेंत स्वारी.

१६८६-८७ विजापूर व गोवळकोंडा हीं राज्यें खालसा होतात.

१६८९ संभाजीचा वध.

१६९१ राजारामास जिंजीस राज्याभिषेक होतो.

१६९८ मोंगलांनीं जिंजी किल्ला घेतला.

१७०० राजारामाचा मृत्यु.

१७०७ औरंगजेब बादशाहाचा मृत्यु.

१७०८ कोल्हापूरच्या गादीची स्थापना.

१७१४ बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळते.

१७२० बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु.

१७२८ बाजीराव व निजाम यांचें युद्ध.

१७३१ डुभईची लढाई.

१७३६ बाजीराव माळवा प्रांत जिंकितो.

१७३९ वसईचा वेढा. नादीरशाहाची हिंदुस्तानावर स्वारी.

१७४० बाजीराव व चिमाजीअप्पा यांचा मृत्यु.

१७४१ नाना फडणविसाचा जन्म.

१७४९ पेशव्याकडे मराठी राज्याची मुखत्यारी येते.

१७५० पुणें मराठी राज्याची राजधानी होते. राणोजी शिंद्याचा मृत्यु.

१७५६ रघुनाथरावाची उत्तरेकडे स्वारी.

१७५८ रघुनाथरावाची पंजाबांत स्वारी.

१७६० उद्गीरची लढाई.

१७६१ पानपतची लढाई. नानासाहेब पेशव्याचा मृत्यु.

१७६६ मल्हारराव होळकराचा मृत्यु.

१७७२ माधवरावाचा मृत्यु.
१७७३ नारायणराव पेशव्याचा खून.
१७९० पेशव्यास दिल्लीची वजिरी मिळते.
१७९२ महादजीचें पुण्यास आगमन.
१७९४ महादजीचा मृत्यु.
१७९५ खर्ड्याची लढाई. सवाईमाधवरावाचा मृत्यु.
१८०० नाना फडणविसाचा मृत्यु.
१८०२ वसईचा तह.
१८१५ गंगाधरशास्त्रयाचा खून.
१८१७ पेशवे व इंग्रज यांमध्यें तह.
१८१८ कोरेगांव व अष्टे येथील लढाया.
१८१९ एल्फिन्स्टन् साहेब मुंबईचे गव्हर्नर होतात.
१८४८ साताराचें राज्य खालसा होतें.

# परिशिष्ट—ब.

## पुस्तकांतील कांहीं कठीण शब्दांचें स्पष्टीकरण.

देशमुख—परगण्याचा (महालाचा) वसूल करणारा अंमलदार. पूर्वीं हा अधिकार वंशपरंपरेनें चालत असे.

पाटील—गांवचा वसूल करणें व इतर कामें ह्यांची व्यवस्था ठेवणारा अंमलदार.

शिलेदार—स्वतांचा घोडा व हत्यारें बाळगून उक्त्या पगारावर सरकारची चाकरी करणारा घोडेस्वार.

बारगीर—सरकारचा घोडा व हत्यारें वापरून कमी पगारावर सरकारची चाकरी करणारा घोडेस्वार.

देशपांडे—महालाच्या वसुलाचा हिशेब ठेवणारा देशमुखाच्या हाताखालचा कामगार.

कुळकर्णी—गांवच्या वसुलाचा हिशेब ठेवणारा पाटलाच्या हाताखालचा कामगार.

फडणवीस—सर्व राज्याच्या जमाखर्चाचा हिशेब ठेवणारा व राजाचे हुकूम, सनदा इत्यादि कागदपत्रांची व्यवस्था पाहणारा मुख्य कामगार.

मुलुखगिरी—देश जिंकणें व लूट मिळविणें ह्या उद्देशानें केलेली स्वारी.

बिचवा—कट्यारीचा एक प्रकार.

वाघनख—वाघाच्या पंजाच्या आकाराचें एक लोखंडी हत्यार.

चौथाई—वसुलाचा चौथा भाग.

सरदेशमुखी—वसुलाचा दहावा भाग

# परिशिष्ट—क.

## परीक्षेकरितां कांहीं प्रश्न.

१ अनार्य लोकांचें वर्णन करा. २ ह्या देशास महाराष्ट्र असें नांव कां पडलें? ३ ह्यूएनशॉंग ह्यानें ह्या देशासंबंधीं काय लिहून ठेविलें? ४ हसननें आपल्या नांवापुढें गंगू असें पद कां जोडिलें ? ५ चांद-बिबीच्या शौर्याबद्दल तुम्हांला काय माहीत आहे? ६ मालोजीला 'राजे' ही पदवी कशी मिळाली ? ७ शिवाजी नांव ठेवण्याचें कारण सांगा. ८ शिवाजीला कोणकोणत्या गोष्टींचें शिक्षण दिलें होतें ? ९ शिवाजीनें कल्याण प्रांत कसा मिळविला ? १० शहाजीला कैद करण्याचें कारण सांगा. ११ शिवाजीनें बापाची सुटका कशी केली ? १२ शिवाजीनें अफझुलखानास कोणती विनंति केली ? १३ बाजी देशपांड्याची मह-त्वाची कामगिरी कोणती ? १४ शाहिस्तेखानावर छापा घालण्यासाठीं शिवाजीनें काय युक्ति केली ? १५ शिवाजीनें दिल्लींतून आपली सुटका कशी करून घेतली ? १६ शिवाजीच्या अष्ट—प्रधानांचीं नांवें व त्यांचीं कामें सांगा. १७ शिवाजीच्या लष्कराचें वर्णन करा. १८ औरंगजे-बाच्या सैन्याचें वर्णन करा. १९ खंडोबल्लाळाच्या स्वामिनिष्ठेचें वर्णन करा. २० मराठ्यांची आपसांत फूट होण्याचें कारण काय ? २१ बाळाजी विश्वनाथ व चंद्रसेन जाधव यांच्या भांडणाचें कारण सांगा. २२ पिंगळे घराण्याकडून भट घराण्याकडे पेशवाई येण्याचें कारण काय ? २३ पेशवा व सेनापति यांच्यामध्यें युद्ध कां झालें ? २४ राणोजी व मल्हारराव ह्यांचें थोडक्यांत चरित्र सांगा. २५ पेशव्यांकडे राज्याची मुखत्यारी कशी आली ? २६ महादजीनें कोणतें मोठें कृत्य केलें? २७ भाऊसाहेब व रघुनाथराव यांच्या गुणांचें वर्णन करा. २८ रघुनाथ-रावांच्या स्वारीचें वर्णन करा. २९ रघुनाथराव व भाऊसाहेब यांचें भांडण होण्याचें कारण सांगा. ३० पानपतच्या लढाईचें कारण सांगा. ३१ ह्या लढाईच्या वेळीं भाऊसाहेबानें कोणती चूक केली ? ३२ रघुनाथराव व माधवराव ह्यांच्यामध्यें भांडण कां सुरू झालें ? ३३ माधवरावास प्रजेची फार कळकळ असे व त्याचा सरदारांवर वचक असे ह्याबद्दल उदाहरणें सांगा. ३४ रामशास्त्र्यांच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल उदाहरणें सांगा. ३५ बारभाईंनीं काय कारस्थान केलें ? ३६ खर्ड्यांच्या लढाईचें कारण सांगा. ३७ वसईच्या तहांत काय ठरलें ? ३८ इंग्रजसरकारनें लोको-पयोगी अशा मुख्य गोष्टी कोणकोणत्या केल्या ?

2442

REFBK-0002552